# 'स्व'-रूपवर्धिनी

कार्यवृत्त २००२






JM INCOME FUND (Rated AAAf by CRISIL)*
Investment Objective: To generate stable long term returns with low risk strategy and capital appreciation through investment in debt instruments and related securities besides preservation of capital*.

JM MUTUAL

Your friend in the new world of risk

J.M. Capital Management Private Ltd.
112, Jolly Maker Chambers No. 2, Nariman Point, Mumbai - 400 021 • Tel. : 022-2826474
• Fax : 022-2881154 • E-mail : mktg@jmmutual.com • Visit us at www.jmmutual.com

• Ahmedabad 6576334 / 6581831 • Bangalore 5092761 / 62 • Chennai 8513026 / 8513257 • Hyderabad 6664436
• Kolkata 2816670 • Mangalore 218476/ 218561/ 218737 • New Delhi 3327432/ 33 • Patna 211556
• Pune 4023667 / 4025617 • Surat 7427146 / 7424103

Trustee : J. M. Trustee Company Private Ltd. • Investment Manager : J.M. Capital Management Private Ltd.
Sponsor : J.M. Financial & Investment Consultancy Service Private Ltd. • Co-Sponsor : J.M. Share & Stock Brokers Ltd.

*(JM INCOME FUND has won the CRISIL Best Fund Awards 2002 for best performing, open-end general debt scheme. This is based on CRISIL CPR score over quarter-ended Sept`01, Dec`01, Mar`02 and Jun`02. The CPR is based on risk adjusted returns (2 years ended Sept`01, Dec`01, Mar`02 and Jun`02), diversification, liquidity and asset-size among 16 funds considered for ranking. The CRISIL CPR is no indication of the performance that can be expected from the scheme in the future.)

*Exit Load - Income Fund: 0.40%, on fresh purchases upto and including Rs. 5 lacs in value if redeemed/switched out within 90 days from the date of the investment.

RISK FACTORS: All Investments in mutual funds and securities are subject to market risks and the NAV of the schemes may go up or down depending upon the factors and forces affecting the securities market and there can be no assurance that the objectives of the schemes will be achieved. The above information is not necessarily indicative of future results and may not necessarily provide a basis for comparison with other investments. JM Income Fund is only the name of the scheme and do not in any manner indicate either the quality of the scheme, its future prospects or returns. The sponsors are not responsible or liable for any loss resulting from the operation of the fund/s beyond the initial contribution made by them of an aggregate amount of Rupees Two lacs towards setting up of the Mutual Fund, which has been invested in JM Equity Fund. Please read the Offer Document before investing. Past performance is no guarantee of future results.


# 'स्व'-रूपवर्धिनी

## कार्यवृत्त २००२

## ✤✤✤ अं त रं ग ✤✤✤


- हृदगत्
- वार्षिकवृत्त
- गजाआडची दिवाळी अश्रु ओघळले गाली
- टिपणे अभ्यासदौऱ्यातील
- अर्थतज्ज्ञ डॉ. आंबेडकरांचा आर्थिक दृष्टीकोन
- विजय निश्चित हमारा है ।
- असा खर्च झाला प्रत्येक रूपया



संपादक : श्री. जयंत कवटेकर

मुद्रण : प्रबोध उद्योग, शुक्रवार पेठ, पुणे - २.
अभय मुद्रणालय, टिळक रोड,
पुणे - ३०.

मुखपृष्ठ : श्री. अवधूत फडणीस

मुखपृष्ठ सहाय्य : श्री. संजय पुरंदरे

रेखांकने : श्री. शेखर साने
: कै. अरूण फडणीस

## 'स्व'-रूपवर्धिनी कार्यकारिणी


### सन्माननीय सभासद

**पद्मभूषण डॉ. श्रीमती बानुबाई कोयाजी** | **श्री. अविनाश वारदेकर**

### कार्यकारी समिती

| | |
|---|---|
| **अध्यक्ष** | **कार्यकारी अध्यक्ष** |
| श्री. जयसिंहभाई मरिवाला | श्री. पु. व. श्रॉफ |
| **कार्याध्यक्ष** | **कोषाध्यक्ष** |
| श्री. कृ. गो. लवळेकर | श्री. श्री. शं. सामळ |
| **सहकार्याध्यक्षा** | **सहकार्याध्यक्ष** |
| श्रीमती कुंतला मुजुमदार | श्री. व. ना. दाते |
| **कार्यवाह** | **सहकार्यवाह** |
| श्री. रा. प. देसाई | श्री. शिरीष रा. पटवर्धन |

### सभासद

| | |
|---|---|
| श्री. प्रतापराव पवार | श्री. वा. दे. संचेती |
| श्री. कां. गि. शहा | श्री. कृ. ल. पटवर्धन |
| प्रा. श्रीमती उषःप्रभा देसाई | श्री. उदय गुजर |
| श्री. पुखराज जैन | सौ. चंद्राताई दलाया |
| श्रीमती पुष्पाताई नडे | श्री. नंदकिशोर सोंडूर |
| श्री. संजय विष्णू तांबट | श्री. कन्हैय्यालाल बलदोटा |



**पंजिकृत न्यास रजि. नं.एफ/१६९४, पुणे**

**फॉरेन कॉन्ट्रीब्युशन रेग्यु. ॲक्टनुसार नोंदणी क्र. ०८३९३०६०**

**आयकर सवलत आयकराच्या कलम ८० जी प्रमाणे व १००% सवलत कलम ३५ अेसी प्रमाणे.**



**संपर्काचा पत्ता :-** 'स्व-'रूपवर्धिनी, २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११०११.

दूरध्वनी : - (कार्यालय) - ६१२१७०४, ६१३४३१० (निवास) - ५६५५८३५, ४२२१७७०

ई मेल : swaroopwardhinee@vsnl.net


**धनादेश 'स्व'-रूपवर्धिनी या नावाने काढावेत.**





## हृदगत्

दार उघड ! बया दार उघड !!

एक नाही, दोन नाही, सतत ३०० वर्षे महाराष्ट्र तीन-तीन सुलतानांच्या जाचात जगत होता. महाराष्ट्राची मसनवट झाली होती. महाराष्ट्रात लाचारीचे पीक फोफावत होते. क्षत्रिय, ब्राम्हण सारेच आपली कर्तव्ये विसरले. 'बादशाह हाच देव' आणि त्याची मनोभावे सेवा हाच 'धर्म' झाला. भाषा, वेषभूषा, आचार, विचार सर्व बिघडून गेले. एकेकाळचे खरोखरीचे राजे, खरोखरीचे सरदार लाचार झाले होते. कुणी स्वार्थात बुडाला होता, कुणी अश्रूत. सामान्य जनांना कोणाचाही आधार नव्हता. ही समाजाची स्थिती होती.

एकनाथांना ही स्थिती पहावत नव्हती. अभंग, कीर्तन भारूडांच्या माध्यमातून ते समाजाला एकत्र करायचा प्रयत्न करीत होते. त्यांच्यातील पराक्रमाला, कर्तव्याला हलवून हलवून जागे करण्याचा प्रयत्न करीत होते. ते परमेश्वराला जशी आर्त हाक मारीत होते तसे समाजाच्या चित्शक्तीला ओरडून आवाहन करीत होते. महाराष्ट्राच्या सर्व देवतांना आदिशक्तीच्या स्वरूपात पाहून नाथ परिस्थितीच्या भयाण अंधारात दार ठोठावत होते. विचारत होते आदिशक्तीला हे जगदंबे ! लोक कामक्रोधादि सहा शत्रुंच्या तडाख्यात सापडले आहेत, आणि तरी तू मौन धारण करून बसली आहेस ? काय हे ! माऊली धाव, कृपा कर, दार उघड ! बया दार उघड !!

आज सुलतानशाही जरी नसली तरी आदिशक्तीला पुनः आवाहन करावे अशी परिस्थिती मात्र भोवती दिसते आहे ! अतिरेक्यांचे मंदिरांवर हल्ले होत आहेत. लोकशाहीच्या मंदिरावरही असा हल्ला झाला तरी त्याची स्वाभाविक प्रतिक्रिया जागृत, संघटीत समाजातून जशी उठली असती तशी आपल्या देशात उमटली नाही. साऱ्या आघातांना शांतपणे सहन करणे हा आम्ही समाजाचा स्वभावच बनवून टाकलाय. असे का घडावे? चीड-संताप येऊन प्रतिक्रिया प्रकट करण्याइतपत सामाजिक-राष्ट्रीय अस्मितेच्या जाणीवेचाच अभाव आणि व्यक्तिगत उन्नतीच्या स्पर्धेत देशाचे हित, समाजाची गरज याकडे संपूर्ण दुर्लक्ष. समाजातला खूप मोठा वर्ग असा आहे की ज्याची सर्व शक्ती जगण्यासाठीच्या धडपडीतच संपून जाते पण ज्यांना असा प्रश्न नाही त्यांच्यामध्ये अपवाद वगळता राष्ट्रीय अस्मितेचा अभाव जाणवतो. अतिरेक्यांचे हल्ले सोडा, दारिद्र्यासारख्या आणखी कितीतरी शत्रुंचा सामना समाज म्हणून सर्वांनी मिळून करायला हवा आहे. त्यासाठी हवे आहे लोक जागरण, अस्मितेचे जागरण आणि त्यासाठी या आदिशक्तीला आवाहन

दार उघड ! बये दार उघड !!

एकनाथांच्या आधी आणि नंतरही अनेक संतांनी, क्रांतिकारकांनी, समाजसुधारकांनी असा जागरणाचा प्रयत्न केला. एकेका विषयासाठी आयुष्य पणाला लावले या कार्यवृत्ताच्या प्रत्येक पानावर तळटीपेत या सर्व श्रेष्ठ पुरूषांच्या कार्याचे स्मरण अगदी मोजक्या शब्दात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. या सर्व श्रेष्ठ पुरूषांनी दाखविलेल्या वाटेवरून आणि काळाची आव्हाने ओळखून आज शेकडो संस्था संघटना अस्मिता जागरणाचे काम देशात करीत आहेत. 'स्व'-रूपवर्धिनीने या वाटेवरून केलेल्या कामाचा २००२ मधील हा आढावा.

**आद्य श्री शंकराचार्य** - तत्त्वज्ञानाच्या रक्षणासाठी देशाच्या चार भागात मठांची स्थापना. पंथभेद मिटविण्यासाठी पंचायतन पूजेचा प्रारंभ केला. वेदांत दर्शनांना नवचैतन्य देऊन देशात सांस्कृतिक एकता निर्माण करण्यात मोठे योगदान.

# 'स्व'-रूपवर्धिनी कार्यकारिणी


**सन्माननीय सभासद**

**पद्मभूषण डॉ. श्रीमती बानुबाई कोयाजी** | **श्री. अविनाश वारदेकर**

**कार्यकारी समिती**

**अध्यक्ष**
श्री. जयसिंहभाई मरिवाला

**कार्यकारी अध्यक्ष**
श्री. पु. व. श्रॉफ

**कार्याध्यक्ष**
श्री. कृ. गो. लवळेकर

**कोषाध्यक्ष**
श्री. श्री. शं. सामळ

**सहकार्याध्यक्षा**
श्रीमती कुंतला मुजुमदार

**सहकार्याध्यक्ष**
श्री. व. ना. दाते

**कार्यवाह**
श्री. रा. प. देसाई

**सहकार्यवाह**
श्री. शिरीष रा. पटवर्धन

**सभासद**

श्री. प्रतापराव पवार
श्री. कां. गि. शहा
प्रा. श्रीमती उषःप्रभा देसाई
श्री. पुखराज जैन
श्रीमती पुष्पाताई नडे
श्री. संजय विष्णू तांबट
श्री. वा. दे. संचेती
श्री. कृ. ल. पटवर्धन
श्री. उदय गुजर
सौ. चंद्राताई दलाया
श्री. नंदकिशोर सोंडूर
श्री. कन्हैय्यालाल बलदोटा



**पंजिकृत न्यास रजि. नं.एफ/१६९४, पुणे**
**फॉरेन कॉन्ट्रीब्युशन रेग्यु. ॲक्टनुसार नोंदणी क्र. ०८३९३०६०**
**आयकर सवलत आयकराच्या कलम ८० जी प्रमाणे व १००% सवलत कलम ३५ एसी प्रमाणे.**



**संपर्काचा पत्ता :-** 'स्व-'रूपवर्धिनी, २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११०११.
दूरध्वनी : - (कार्यालय) - ६१२१७०४, ६१३४३१० (निवास) - ५६५५८३५, ४२२१७७०
ई मेल : swaroopwardhinee@vsnl.net


**धनादेश 'स्व'-रूपवर्धिनी या नावाने काढावेत.**





## हृदगत्

दार उघड ! बया दार उघड !!

एक नाही, दोन नाही, सतत ३०० वर्षे महाराष्ट्र तीन-तीन सुलतानांच्या जाचात जगत होता. महाराष्ट्राची मसनवट झाली होती. महाराष्ट्रात लाचारीचे पीक फोफावत होते. क्षत्रिय, ब्राम्हण सारेच आपली कर्तव्ये विसरले. 'बादशाह हाच देव' आणि त्याची मनोभावे सेवा हाच 'धर्म' झाला. भाषा, वेषभूषा, आचार, विचार सर्व बिघडून गेले. एकेकाळचे खरोखरीचे राजे, खरोखरीचे सरदार लाचार झाले होते. कुणी स्वार्थात बुडाला होता, कुणी अश्रूत. सामान्य जनांना कोणाचाही आधार नव्हता. ही समाजाची स्थिती होती.

एकनाथांना ही स्थिती पहावत नव्हती. अभंग, कीर्तन भारूडांच्या माध्यमातून ते समाजाला एकत्र करायचा प्रयत्न करीत होते. त्यांच्यातील पराक्रमाला, कर्तव्याला हलवून हलवून जागे करण्याचा प्रयत्न करीत होते. ते परमेश्वराला जशी आर्त हाक मारीत होते तसे समाजाच्या चित्शक्तीला ओरडून आवाहन करीत होते. महाराष्ट्राच्या सर्व देवतांना आदिशक्तीच्या स्वरूपात पाहून नाथ परिस्थितीच्या भयाण अंधारात दार ठोठावत होते. विचारत होते आदिशक्तीला हे जगदंबे ! लोक कामक्रोधादि सहा शत्रुंच्या तडाख्यात सापडले आहेत, आणि तरी तू मौन धारण करून बसली आहेस ? काय हे ! माऊली धाव, कृपा कर, दार उघड ! बया दार उघड !!

आज सुलतानशाही जरी नसली तरी आदिशक्तीला पुनः आवाहन करावे अशी परिस्थिति मात्र भोवती दिसते आहे ! अतिरेक्यांचे मंदिरांवर हल्ले होत आहेत. लोकशाहीच्या मंदिरावरही असा हल्ला झाला तरी त्याची स्वाभाविक प्रतिक्रिया जागृत, संघटीत समाजातून जशी उठली असती तशी आपल्या देशात उमटली नाही. साऱ्या आघातांना शांतपणे सहन करणे हा आम्ही समाजाचा स्वभावच बनवून टाकलाय. असे का घडावे? चीड-संताप येऊन प्रतिक्रिया प्रकट करण्याइतपत सामाजिक-राष्ट्रीय अस्मितेच्या जाणीवेचाच अभाव आणि व्यक्तिगत उन्नतीच्या स्पर्धेत देशाचे हित, समाजाची गरज याकडे संपूर्ण दुर्लक्ष. समाजातला खूप मोठा वर्ग असा आहे की ज्याची सर्व शक्ती जगण्यासाठीच्या धडपडीतच संपून जाते पण ज्यांना असा प्रश्न नाही त्यांच्यामध्ये अपवाद वगळता राष्ट्रीय अस्मितेचा अभाव जाणवतो. अतिरेक्यांचे हल्ले सोडा, दारिद्र्यासारख्या आणखी कितीतरी शत्रुंचा सामना समाज म्हणून सर्वांनी मिळून करायला हवा आहे. त्यासाठी हवे आहे लोक जागरण, अस्मितेचे जागरण आणि त्यासाठी या आदिशक्तीला आवाहन दार उघड ! बये दार उघड !!

एकनाथांच्या आधी आणि नंतरही अनेक संतांनी, क्रांतिकारकांनी, समाजसुधारकांनी असा जागरणाचा प्रयत्न केला. एकेका विषयासाठी आयुष्य पणाला लावले या कार्यवृत्ताच्या प्रत्येक पानावर तळटीपेत या सर्व श्रेष्ठ पुरूषांच्या कार्याचे स्मरण अगदी मोजक्या शब्दात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. या सर्व श्रेष्ठ पुरूषांनी दाखविलेल्या वाटेवरून आणि काळाची आव्हाने ओळखून आज शेकडो संस्था संघटना अस्मिता जागरणाचे काम देशात करीत आहेत. 'स्व'-रूपवर्धिनीने या वाटेवरून केलेल्या कामाचा २००२ मधील हा आढावा.

**आद्य श्री शंकराचार्य** - तत्त्वज्ञानाच्या रक्षणासाठी देशाच्या चार भागात मठांची स्थापना. पंथभेद मिटविण्यासाठी पंचायतन पूजेचा प्रारंभ केला. वेदांत दर्शनांना नवचैतन्य देऊन देशात सांस्कृतिक एकता निर्माण करण्यात मोठे योगदान.

# वार्षिक शाखावृत्त

वर्षभर एकही सुट्टी न घेता चालणाऱ्या शाखा म्हणजे उत्साहाचा अखंड स्त्रोत असतो. शाखेच्या दैनंदिन कार्यक्रमाबरोबरच सुट्टीच्या कालावधीत चालणारे कार्यक्रम म्हणजे विद्यार्थ्यांच्या/कार्यकर्त्यांच्या प्रतिभाशक्तीला, संघटन कौशल्याला मिळालेली संधी असते. एखादा कार्यक्रम ठरतो. आयत्या वेळेस काहीतरी अडचणी येतात, कार्यक्रमाची जबाबदारी असलेल्या कार्यकर्त्यांची धावपळ सुरू होते. काहीतरी पर्याय सापडतो, अडचण दूर होते. अशा वेळी झालेल्या कार्यक्रमादरम्यान असणारी कार्यकर्त्यांची, विद्यार्थ्यांची मनस्थिती पहाण्यासारखी असते. एखाद्या कार्यक्रमाला मिळालेल्या यशाचा आनंद संबंधितांच्या चेहऱ्यावर उमटत असतात. या सर्व छोट्या-मोठ्या अनुभवातून, धक्क्यातून कार्यकर्ता उभा रहात असतो.



वर्धिनीच्या सर्व शाखांमध्ये चालणारे कार्यक्रम याचीच अनुभूती देत असतात. आज वर्धिनीच्या मुलांच्या ६, मुलींच्या २, बालांची १ अशा सायंकालीन शाखा आहेत, तर 'आजोळ' प्रकल्प या नावाने दुपारच्या वेळात चालणारी मुला-मुलींची एक शाखा आहे. या सर्वच शाखांमध्ये वर्षभर विविध कार्यक्रम चालू असतात. त्यात अनेकदा सारखेपणाही असते आणि नावीन्यही. कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण जसे या कार्यक्रमांच्या निमित्ताने होत असते, तसेच वर्धक-वर्धिकांचेही होत असते. विशेषतः समाजाला थेट जाऊन भिडण्याचे जेव्हा प्रसंग येतात, तेव्हा मिळणारी अनुभूती काही वेळा वर्णन करून सांगता येत नाही.

शाखांवर होणाऱ्या काही प्रमुख कार्यक्रमांचे संकलित वृत्त या ठिकाणी देत आहोत.

## संवाद पालकांशी

वर्धिनीच्या शाखेत येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या घरी नियमित संपर्क होत असतोच. कार्यकर्त्यांशी पालकांच्या होणाऱ्या गप्पांमधून त्यांना पाल्याची वाटणारी चिंता, पाल्याच्या सवयी याविषयी मनमोकळे बोलणे होत असते. तरीसुध्दा सर्व पालकांसमोर वर्धिनीच्या कामामागील प्रेरणा, कामातील अनुभव, पाल्यांमधील कार्यकर्त्यांना जाणवणारे बदल अशा गोष्टींसंबंधी संवाद करण्यासाठी पालकसंवाद सभांचे आयोजन शाखा विभागात होत असते. या वर्षी या संवाद सभांपुढील विषय खालीलप्रमाणे होते.

१) शाखा - एक प्रभावी संस्कार केंद्र
२) परीक्षेची तयारी घरी कशी करून घ्यावी?
३) मुलांच्या वागण्यातील बदल
४) शिबिर संयोजन - पालकांकडून अपेक्षा
५) घरी अभ्यास घ्यायचा म्हणजे नेमके काय?

**दधीचि ऋषी** - लोकहितार्थ स्वतःच्या शरीराचा त्याग करून आपल्या अस्थी इंद्राला देऊन टाकल्या. आत्मविलोपी वृत्तीने केलेल्या त्यागाचा एक परमोच्च आदर्श निर्माण केला.





एका शाखेने पालकसभेला सर्व पालक उपस्थित रहावे म्हणून वर्धकांसाठी पालकसंपर्क स्पर्धा ठेवली होती. शिबिरांपूर्वीही पालकसभा घेतल्याचा फायदा काही शाखांनी अनुभवला. अशा शाखांमधील वर्धकांची शिबिरातील उपस्थिती, पालकांच्या शिबिराला भेटी, पालकांचा शिबिर आयोजनात, कार्यक्रमांच्या आयोजनात सहभाग वाढता असल्याचा अनुभव कार्यकर्त्यांना मिळाला.

## व्याख्याने

क्रमिक पुस्तकांच्या पलिकडील जगाची ओळख करून देणारा हा उपक्रम. मनातील प्रश्नांना वाट करून देणारे हे व्यासपीठ आहे. खूप काही विचारायचे असते, ते व्याख्यानानंतर होणाऱ्या प्रश्नोत्तरांच्या निमित्ताने विचारले जाते. दररोजच्या शाखेच्या कार्यक्रमांच्या जोडीने वर्षभरात काही कार्यक्रम व्याख्यानांचे व्हावेत असा आग्रह असतो. या वर्षी शाखा विभागात झालेल्या काही व्याख्यानांची ही सूची -

| | **विषय** | **वक्ते** |
|---|---|---|
| १) | कीर्तन | श्री. वाडेकर सर व ह. भ. प. श्री. विजय अपामार्जिने |
| २) | अभ्यासाच्या पाऊलवाटा | सुजय पैलवान |
| ३) | निबंध लेखन | सचिन सनगरे |
| ४) | समयसूचकता (नाटिका) | |
| ५) | कथाकथन | र. ज. नरवणे सर |
| ६) | स्लाईड शो - स्वामी विवेकानंद | |
| ७) | ओळख संगणकाची | विजय महिंद्रकर |
| ८) | 'बटाट्याची चाळ' ध्वनीफीत श्रवण कार्यक्रम | |
| ९) | गमतीजमती गणितातील | सागर कुलकर्णी |
| १०) | विज्ञान वस्तु शोध | नकुल थावरे |
| ११) | डॉ. हेडगेवार चरित्रकथन | शिरीष आपटे |
| १२) | संस्कृतीरक्षक श्री. शिवछत्रपती | |
| १३) | आग्र्याहून सुटकेचे उकललेले गूढ | अजीत जोशी |
| १४) | स्लाईड शो - अंटार्टिका | देशपांडे |
| १५) | कथाकथन | शंकर शास्त्री |
| १६) | आहाराचे महत्त्व | आयुर्वेदवाचस्पती विनेश नगरे |
| १७) | रसग्रहण कवितेचे | शब्दमित्र संस्था |
| १८) | महत्त्व नियोजनाचे | नकुल थावरे |



**श्री. परशुराम** - अत्याचाराचा प्रतिशोध आणि अनीतिचा प्रतिकार हे वैशिष्ट्य. पर्वत फोडून ब्रम्हपूत्र महानंदाचा ओघ भारताच्या दिशेने वळवला.

# वार्षिक शाखावृत्त

वर्षभर एकही सुट्टी न घेता चालणाऱ्या शाखा म्हणजे उत्साहाचा अखंड स्त्रोत असतो. शाखेच्या दैनंदिन कार्यक्रमाबरोबरच सुट्टीच्या कालावधीत चालणारे कार्यक्रम म्हणजे विद्यार्थ्यांच्या/कार्यकर्त्यांच्या प्रतिभाशक्तीला, संघटन कौशल्याला मिळालेली संधी असते. एखादा कार्यक्रम ठरतो. आयत्या वेळेस काहीतरी अडचणी येतात, कार्यक्रमाची जबाबदारी असलेल्या कार्यकर्त्यांची धावपळ सुरू होते. काहीतरी पर्याय सापडतो, अडचण दूर होते. अशा वेळी झालेल्या कार्यक्रमादरम्यान असणारी कार्यकर्त्यांची, विद्यार्थ्यांची मनस्थिती पहाण्यासारखी असते. एखाद्या कार्यक्रमाला मिळालेल्या यशाचा आनंद संबंधितांच्या चेहऱ्यावर उमटत असतात. या सर्व छोट्या-मोठ्या अनुभवातून, धक्क्यातून कार्यकर्ता उभा रहात असतो.



वर्धिनीच्या सर्व शाखांमध्ये चालणारे कार्यक्रम याचीच अनुभूती देत असतात. आज वर्धिनीच्या मुलांच्या ६, मुलींच्या २, बालांची १ अशा सायंकालीन शाखा आहेत, तर 'आजोळ' प्रकल्प या नावाने दुपारच्या वेळात चालणारी मुला-मुलींची एक शाखा आहे. या सर्वच शाखांमध्ये वर्षभर विविध कार्यक्रम चालू असतात. त्यात अनेकदा सारखेपणाही असते आणि नावीन्यही. कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण जसे या कार्यक्रमांच्या निमित्ताने होत असते, तसेच वर्धक-वर्धिकांचेही होत असते. विशेषतः समाजाला थेट जाऊन भिडण्याचे जेव्हा प्रसंग येतात, तेव्हा मिळणारी अनुभूती काही वेळा वर्णन करून सांगता येत नाही.

शाखांवर होणाऱ्या काही प्रमुख कार्यक्रमांचे संकलित वृत्त या ठिकाणी देत आहोत.

## संवाद पालकांशी

वर्धिनीच्या शाखेत येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या घरी नियमित संपर्क होत असतोच. कार्यकर्त्यांशी पालकांच्या होणाऱ्या गप्पांमधून त्यांना पाल्याची वाटणारी चिंता, पाल्याच्या सवयी याविषयी मनमोकळे बोलणे होत असते. तरीसुध्दा सर्व पालकांसमोर वर्धिनीच्या कामामागील प्रेरणा, कामातील अनुभव, पाल्यांमधील कार्यकर्त्यांना जाणवणारे बदल अशा गोष्टींसंबंधी संवाद करण्यासाठी पालकसंवाद सभांचे आयोजन शाखा विभागात होत असते. या वर्षी या संवाद सभांपुढील विषय खालीलप्रमाणे होते.

१) शाखा - एक प्रभावी संस्कार केंद्र
२) परीक्षेची तयारी घरी कशी करून घ्यावी?
३) मुलांच्या वागण्यातील बदल
४) शिबिर संयोजन - पालकांकडून अपेक्षा
५) घरी अभ्यास घ्यायचा म्हणजे नेमके काय?

**दधीचि ऋषी** - लोकहितार्थ स्वतःच्या शरीराचा त्याग करून आपल्या अस्थी इंद्राला देऊन टाकल्या. आत्मविलोपी वृत्तीने केलेल्या त्यागाचा एक परमोच्च आदर्श निर्माण केला.





एका शाखेने पालकसभेला सर्व पालक उपस्थित रहावे म्हणून वर्धकांसाठी पालकसंपर्क स्पर्धा ठेवली होती. शिबिरांपूर्वीही पालकसभा घेतल्याचा फायदा काही शाखांनी अनुभवला. अशा शाखांमधील वर्धकांची शिबिरातील उपस्थिती, पालकांच्या शिबिराला भेटी, पालकांचा शिबिर आयोजनात, कार्यक्रमांच्या आयोजनात सहभाग वाढता असल्याचा अनुभव कार्यकर्त्यांना मिळाला.

## व्याख्याने

क्रमिक पुस्तकांच्या पलिकडील जगाची ओळख करून देणारा हा उपक्रम. मनातील प्रश्नांना वाट करून देणारे हे व्यासपीठ आहे. खूप काही विचारायचे असते, ते व्याख्यानानंतर होणाऱ्या प्रश्नोत्तरांच्या निमित्ताने विचारले जाते. दररोजच्या शाखेच्या कार्यक्रमांच्या जोडीने वर्षभरात काही कार्यक्रम व्याख्यानांचे व्हावेत असा आग्रह असतो. या वर्षी शाखा विभागात झालेल्या काही व्याख्यानांची ही सूची -

| विषय | वक्ते |
|---|---|
| १) कीर्तन | श्री. वाडेकर सर व<br>ह. भ. प. श्री. विजय अपामार्जिने |
| २) अभ्यासाच्या पाऊलवाटा | सुजय पैलवान |
| ३) निबंध लेखन | सचिन सनगरे |
| ४) समयसूचकता (नाटिका) | |
| ५) कथाकथन | र. ज. नरवणे सर |
| ६) स्लाईड शो - स्वामी विवेकानंद | |
| ७) ओळख संगणकाची | विजय महिंद्रकर |
| ८) 'बटाट्याची चाळ' ध्वनीफीत श्रवण कार्यक्रम | |
| ९) गमतीजमती गणितातील | सागर कुलकर्णी |
| १०) विज्ञान वस्तु शोध | नकुल थावरे |
| ११) डॉ. हेडगेवार चरित्रकथन | शिरीष आपटे |
| १२) संस्कृतीरक्षक श्री. शिवछत्रपती | |
| १३) आग्राहून सुटकेचे उकललेले गूढ | अजीत जोशी |
| १४) स्लाईड शो - अंटार्टिका | देशपांडे |
| १५) कथाकथन | शंकर शास्त्री |
| १६) आहाराचे महत्त्व | आयुर्वेदवाचस्पती विनेश नगरे |
| १७) रसग्रहण कवितेचे | शब्दमित्र संस्था |
| १८) महत्त्व नियोजनाचे | नकुल थावरे |



**श्री. परशुराम** - अत्याचाराचा प्रतिशोध आणि अनीतिचा प्रतिकार हे वैशिष्ट्य. पर्वत फोडून ब्रम्हपूत्र महानंदाचा ओघ भारताच्या दिशेने वळवला.

| विषय | वक्ते |
|---|---|
| १९) सामाजिक अध्ययन | मिलींद सबनीस |
| २०) व्यक्तिमत्त्व विकास | श्रीमती पाटणकर |
| २१) कथाकथन (पाडवा गोड झाला) | अरविंद केळकर |
| २२) प्रेरणासत्र (गरुड व्हा) | अरविंद केळकर |
| २३) दैनंदिन शाखेचे महत्त्व | मिलींद शेटे |
| २४) अमेरिका वास्तव्यातील अनुभव | ज्ञानेश पुरंदरे |
| २५) वैशिष्ट्ये अमेरिकन नागरिकांची | प्रभाताई नाफडे |
| २६) सणांचे शास्त्रीय महत्त्व | मंजुषाताई कुलकर्णी |
| २७) गमती जमती वर्धिनीच्या कामातील | बागेश्री पोंक्षे |
| २८) लोकमान्य टिळकांचे चरित्र (स्वरचित कवितांमधून) | स्नेहलताई कुलकर्णी |

## वर्धापनदिन कार्यक्रम

शाखांचा वर्धापनदिन हा दरवर्षी संस्कार जागवणारा कार्यक्रम. वर्धापनदिनाच्या निमित्ताने झालेल्या कामांचा जसा आढावा घेतला जातो, तसा सामूहिकतेचे भान जागविणारा संकल्पही केला जातो. अशा कार्यक्रमातूनच कळत नकळत संघभावना विकसित होत रहाते. अशा कार्यक्रमांच्या निमित्ताने होणारे प्रमुख वक्त्यांचे मार्गदर्शनही तितकेच विचार करायला लावणारे असते. या वर्षी योगानंद शाखेच्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमासाठी प्रा. शिरीष आपटे हे प्रमुख मार्गदर्शक होते. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण कार्यक्रमाचे संयोजन पालकांनी केले होते.

सुबोधानंद शाखेच्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमाला डॉ. देवपूरकर हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. शाखेतील वर्धकांनी पोस्टाच्या तिकिटांचे, तसेच देशीविदेशी चलनांचे प्रदर्शन मांडले होते. विवेकानंद शाखेच्या वर्धापनदिनाला सौ. बागेश्री पोंक्षे यांचे मार्गदर्शन लाभले. वर्धिनीच्या कामातील आपल्या आठवणींना उजाळा देत त्यांनी शाखा वयात आली म्हणजे आता अपेक्षित काय आहे ह्याचे उद्बोधक विवेचन केले. निवेदिता शाखेने वर्धापन दिनाच्या दिवशी ओंकारेश्वर मंदिरात उपासना केली आणि वर्धिकांशी 'शाखेचे काम' या विषयावर गप्पा मारल्या. अखंडानंद शाखेच्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने शाखेतील वर्धकांच्या जुन्या स्मृती जागविण्यासाठी विविध प्रसंगातील छायाचित्रांचे प्रदर्शन मांडले होते. या वर्धापनदिनाला वर्धिनीचे एक सभासद आणि प्रतिथयश नामक्रोम इंडिया लिमिटेड कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक श्री. रमेश जोशी हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनाचा हा सारांश......

'रामलीला मैदानावरील प्रसंग. तेथील एका रेस्टॉरंटमध्ये तरूण-तरूणी डिस्को-ड्रग्जच्या आहारी जाऊन धिंगाणा घालीत होते. देशाची तरूण पिढी अशी वाया जात असलेली पाहून अस्वस्थता वाटू लागली. रात्री झोप आली नाही. सकाळी उठून सहज खोलीबाहेर रामलीला मैदानात पाहिले, तर ५००-६०० मुले व्यायाम करीत

> **भगीरथ** - कठोर प्रयत्न करून गंगेचा प्रवाह भारताच्या दिशेला वळवला व भूमी सुजलाम् सुफलाम केली.





होती. खेळत होती. या मुलांकडे पाहून वाटले की या मुलांच्या हातात देशाचे भवितव्य आहे.

माणूस विचार करू शकतो. प्राणी विचार करू शकत नाही. माणूस स्वतःची प्रगती करून घेऊ शकतो. प्राणी अशी प्रगती करून घेऊ शकत नाहीत. त्यामुळे ज्याला प्रगती करावीशी वाटते, त्याने अफाट कष्ट केले पाहिजेत. अफाट वाचले पाहिजे. त्याशिवाय विद्वत्ता येत नाही.

संस्कार कुठे होतात? शाखेत आलात, तर संस्कार होतील. घरातील वागणूक, परिसरातील वागणूक याचे परिणाम व्यक्तीवर होतात. काय वाचावं? काय पहावं? काय खावं? किती खावं? हे मुलांना शिकविले पाहिजे.

एका ऋषीने आपल्या शिष्यांना सांगितले की अमुक दिवशी अमुक वेळेला मी मरणार आहे. त्यानंतर मला लगेच डुकराचा जन्म मिळणार आहे. अमुक दिवशी, अमुक वेळेला अमुक डुकरिणीच्या पोटी एकूण ७ पिले जन्माला येतील. त्यातील ५ व्या क्रमांकाचे पिलू मी असेन. तिथे त्या दिवशी, त्या वेळेला येऊन मला मारून टाका म्हणजे मला परत मनुष्याचा जन्म मिळेल. सांगितल्याप्रमाणे ऋषी मरतात. शिष्य सांगितलेल्या दिवशी, सांगितलेल्या वेळेला त्या डुकरिणीचे पाचवे पिलू उचलून मारायला घेऊन जातात. पिलू शिष्यांना म्हणते कृपया मला मारू नका. मी उकिरड्यावरचा आनंद उपभोगतो आहे. ऋषीचा मृत्यु ते डुकराचा जन्म यात केवळ १३ दिवसांचे अंतर होते, पण एवढ्या अल्पावधीत वर्तनात बिघाड झाला. वाईट संस्कार फार वेगाने होतात. आपण म्हणूनच चांगल्या वातावरणात सदैव रहाण्याची काळजी घेतली पाहिजे.

'विपरीत परिस्थिती कायमच असते. पण मूल्ये सोडून चालत नाही. परिस्थिती विपरीत असते, तेव्हाच त्यावर मात करण्याचे विचार गतिमान होतात. संकटकाळात ते प्रतिबिंबित झाले पाहिजेत-'

## 'जागर' .... विचारांचा

रविवार सुट्टीचा दिवस. जरा उशिरा उठावं असं अगदी पालकांनाही वाटतं. पण वर्धिनीतील मानसिक विकास बैठकीची वेळ असते सकाळी सव्वासहाची. सकाळच्या प्रसन्न वेळेत विचार करायला लावणाऱ्या लेखांचे, पुस्तकांचे वाचन त्यावर होणारी चर्चा या वातावरणाचा हळूहळू उपस्थितांवर कळत-नकळत परिणाम होतो. या वर्षी शाखांवर या बैठकीत झालेले विषय खालीलप्रमाणे -

१) 'इन्किलाब' व 'बापूजी' या पुस्तकांचे वाचन व चर्चा

२) 'जागर' या शिवाजीराव भोसले यांच्या सदराचे वाचन व चर्चा

## तस्मै श्री गुरवे नमः



शाखेत शिकवायला येणाऱ्या शिक्षकांच्या घरी जाऊन त्यांना वंदन करून काही शाखांनी गुरूपौर्णिमा साजरी केली, तर काही शाखांवर शिक्षकांनी वर्धकांना त्यांचे अनुभव सांगितले. तसेच शाखेत रोज का यायचे, हा विषयही समजावून सांगितला.

> **रन्तिदेव** - राज्य नको, स्वर्ग नको, मोक्ष नको फक्त दुःखितांचे कष्ट संपावेत हीच एकमेव अभिलाषा.

| विषय | वक्ते |
|---|---|
| १९) सामाजिक अध्ययन | मिलिंद सबनीस |
| २०) व्यक्तिमत्त्व विकास | श्रीमती पाटणकर |
| २१) कथाकथन (पाडवा गोड झाला) | अरविंद केळकर |
| २२) प्रेरणासत्र (गरुड व्हा) | अरविंद केळकर |
| २३) दैनंदिन शाखेचे महत्त्व | मिलिंद शेटे |
| २४) अमेरिका वास्तव्यातील अनुभव | ज्ञानेश पुरंदरे |
| २५) वैशिष्ट्ये अमेरिकन नागरिकांची | प्रभाताई नाफडे |
| २६) सणांचे शास्त्रीय महत्त्व | मंजुषाताई कुलकर्णी |
| २७) गमती जमती वर्धिनीच्या कामातील | बागेश्री पोंक्षे |
| २८) लोकमान्य टिळकांचे चरित्र (स्वरचित कवितांमधून) | स्नेहलताई कुलकर्णी |

## वर्धापनदिन कार्यक्रम

शाखांचा वर्धापनदिन हा दरवर्षी संस्कार जागवणारा कार्यक्रम. वर्धापनदिनाच्या निमित्ताने झालेल्या कामांचा जसा आढावा घेतला जातो, तसा सामूहिकतेचे भान जागविणारा संकल्पही केला जातो. अशा कार्यक्रमातूनच कळत नकळत संघभावना विकसित होत रहाते. अशा कार्यक्रमांच्या निमित्ताने होणारे प्रमुख वक्त्यांचे मार्गदर्शनही तितकेच विचार करायला लावणारे असते. या वर्षी योगानंद शाखेच्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमासाठी प्रा. शिरीष आपटे हे प्रमुख मार्गदर्शक होते. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण कार्यक्रमाचे संयोजन पालकांनी केले होते.

सुबोधानंद शाखेच्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमाला डॉ. देवपूरकर हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. शाखेतील वर्धकांनी पोस्टाच्या तिकिटांचे, तसेच देशीविदेशी चलनांचे प्रदर्शन मांडले होते. विवेकानंद शाखेच्या वर्धापनदिनाला सौ. बागेश्री पोंक्षे यांचे मार्गदर्शन लाभले. वर्धिनीच्या कामातील आपल्या आठवणींना उजाळा देत त्यांनी शाखा वयात आली म्हणजे आता अपेक्षित काय आहे ह्याचे उद्‌बोधक विवेचन केले. निवेदिता शाखेने वर्धापन दिनाच्या दिवशी ओंकारेश्वर मंदिरात उपासना केली आणि वर्धिकांशी 'शाखेचे काम' या विषयावर गप्पा मारल्या. अखंडानंद शाखेच्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने शाखेतील वर्धकांच्या जुन्या स्मृती जागविण्यासाठी विविध प्रसंगातील छायाचित्रांचे प्रदर्शन मांडले होते. या वर्धापनदिनाला वर्धिनीचे एक सभासद आणि प्रतिथयश नामक्रोम इंडिया लिमिटेड कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक श्री. रमेश जोशी हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनाचा हा सारांश......

'रामलीला मैदानावरील प्रसंग. तेथील एका रेस्टॉरंटमध्ये तरूण-तरूणी डिस्को-ड्रग्जच्या आहारी जाऊन धिंगाणा घालीत होते. देशाची तरूण पिढी अशी वाया जात असलेली पाहून अस्वस्थता वाटू लागली. रात्री झोप आली नाही. सकाळी उठून सहज खोलीबाहेर रामलीला मैदानात पाहिले, तर ५००-६०० मुले व्यायाम करीत

**भगीरथ** - कठोर प्रयत्न करून गंगेचा प्रवाह भारताच्या दिशेला वळवला व भूमी सुजलाम् सुफलाम केली.





होती. खेळत होती. या मुलांकडे पाहून वाटले की या मुलांच्या हातात देशाचे भवितव्य आहे.

माणूस विचार करू शकतो. प्राणी विचार करू शकत नाही. माणूस स्वतःची प्रगती करून घेऊ शकतो. प्राणी अशी प्रगती करून घेऊ शकत नाहीत. त्यामुळे ज्याला प्रगती करावीशी वाटते, त्याने अफाट कष्ट केले पाहिजेत. अफाट वाचले पाहिजे. त्याशिवाय विद्वत्ता येत नाही.

संस्कार कुठे होतात? शाखेत आलात, तर संस्कार होतील. घरातील वागणूक, परिसरातील वागणूक याचे परिणाम व्यक्तीवर होतात. काय वाचावं? काय पहावं? काय खावं? किती खावं? हे मुलांना शिकविले पाहिजे.

एका ऋषीने आपल्या शिष्यांना सांगितले की अमुक दिवशी अमुक वेळेला मी मरणार आहे. त्यानंतर मला लगेच डुकराचा जन्म मिळणार आहे. अमुक दिवशी, अमुक वेळेला अमुक डुकरिणीच्या पोटी एकूण ७ पिले जन्माला येतील. त्यातील ५ व्या क्रमांकाचे पिलू मी असेन. तिथे त्या दिवशी, त्या वेळेला येऊन मला मारून टाका म्हणजे मला परत मनुष्याचा जन्म मिळेल. सांगितल्याप्रमाणे ऋषी मरतात. शिष्य सांगितलेल्या दिवशी, सांगितलेल्या वेळेला त्या डुकरिणीचे पाचवे पिलू उचलून मारायला घेऊन जातात. पिलू शिष्यांना म्हणते कृपया मला मारू नका. मी उकिरड्यावरचा आनंद उपभोगतो आहे. ऋषीचा मृत्यु ते डुकराचा जन्म यात केवळ १३ दिवसांचे अंतर होते, पण एवढ्या अल्पावधीत वर्तनात बिघाड झाला. वाईट संस्कार फार वेगाने होतात. आपण म्हणूनच चांगल्या वातावरणात सदैव रहाण्याची काळजी घेतली पाहिजे.

'विपरीत परिस्थिती कायमच असते. पण मूल्ये सोडून चालत नाही. परिस्थिती विपरीत असते, तेव्हाच त्यावर मात करण्याचे विचार गतिमान होतात. संकटकाळात ते प्रतिबिंबित झाले पाहिजेत-'

## 'जागर' .... विचारांचा

रविवार सुट्टीचा दिवस. जरा उशिरा उठावं असं अगदी पालकांनाही वाटतं. पण वर्धिनीतील मानसिक विकास बैठकीची वेळ असते सकाळी सव्वासहाची. सकाळच्या प्रसन्न वेळेत विचार करायला लावणाऱ्या लेखांचे, पुस्तकांचे वाचन त्यावर होणारी चर्चा या वातावरणाचा हळूहळू उपस्थितांवर कळत-नकळत परिणाम होतो. या वर्षी शाखांवर या बैठकीत झालेले विषय खालीलप्रमाणे -

१) 'इन्किलाब' व 'बापूजी' या पुस्तकांचे वाचन व चर्चा

२) 'जागर' या शिवाजीराव भोसले यांच्या सदराचे वाचन व चर्चा

## तस्मै श्री गुरवे नमः



शाखेत शिकवायला येणाऱ्या शिक्षकांच्या घरी जाऊन त्यांना वंदन करून काही शाखांनी गुरूपौर्णिमा साजरी केली, तर काही शाखांवर शिक्षकांनी वर्धकांना त्यांचे अनुभव सांगितले. तसेच शाखेत रोज का यायचे, हा विषयही समजावून सांगितला.

**रन्तिदेव** - राज्य नको, स्वर्ग नको, मोक्ष नको फक्त दुःखितांचे कष्ट संपावेत हीच एकमेव अभिलाषा.

## गिर्यारोहणाचा स्वतंत्र गट

सुटीच्या कालावधीत वर्धक-वर्धिकांना सहलीला घेऊन जाण्याचा कार्यक्रम हा ठरलेला असतोच. अगदी याही वर्षी ढाकभैरी, राजमाची, नीळकंठेश्वर, भेडश्याची लेणी, हरिश्चंद्रगड अशा ठिकाणी शाखांच्या सहली गेल्या होत्या. शाखांमधील युवक-युवतीच या सहलींचे - पदभ्रमणाचे आयोजन करतात. असा प्रत्येक कार्यक्रम आनंद देणारा, नवे नवे अनुभव देणारा असतो. नियोजित ठिकाणची दिशा भरकटली तर होणारी मनस्थिती, परतताना काही कारणांनी परतण्याची गाडी चुकली, तर होणारी धावपळ-पळापळ हे सर्व शिक्षण नंतरच्या व्यावहारिक जीवनातही उपयोगी पडते.

हे पदभ्रमण काही प्रमाणात 'धाडसाला' अनुकूल वातावरण देत असले, तरी शास्त्रशुध्द प्रशिक्षण कार्यकर्त्यांना नाही. असे प्रशिक्षण देण्यासाठी एखाद्या गिर्यारोहण गटाची रचना असावी, असे युवकांच्या मनात होते. या मनातील विचाराला जून महिन्यात गती मिळाली. वैद्य विनेश नगरे या गिर्यारोहण गटाचे काम पहायला लागले आहेत. या वर्षी गटाने गिर्यारोहणाचे सहा कार्यक्रम घेतले. शेवटचा कार्यक्रम होता डिसेंबर महिन्यात. भीमाशंकरच्या जंगलातील तीन दिवसांची भटकंती, वनस्पतींचा परिचय, प्राण्यांचे निरीक्षण अशा कार्यक्रमांबरोबरच झोंबऱ्या थंडीत, तंबूच्या आडोशात झालेल्या अनौपचारिक गप्पा; या साऱ्या आठवणी तशाच रेंगाळत आहेत.

## उपक्रमविविधा

व्याख्याने, सहली, सुट्यांमधील शिबिरे हे कार्यक्रम जसे होत असतात, तसे वर्षभर विविध प्रकारचे उपक्रम शाखांवर होत असतात. अगदी या वर्षभरात झालेल्या विविध उपक्रमांची सूची जरी पहिली, तरी या विविधतेची कल्पना येईल. अशा विविध उपक्रमांमुळे शाखांमधील वातावरणात टवटवीतपणा जाणवतो.

- भगवत्‌गीता - १२व्या अध्यायाचे पाठांतर
- पाढे पाठांतर
- कराटे प्रशिक्षण
- चांदणी भोजन
- सुभाषिते व अर्थ पाठांतर
- बालन्यायालय
- इंग्रजी संभाषण वर्ग
- गुरूपौर्णिमेच्या निमित्ताने शिक्षकांचे अनुभवकथन
- भूगोल विषयावरील प्रश्नमंजूषा
- पालक-शिक्षक-वर्धक वादविवाद कार्यक्रम
- खजिनाशोध
- संस्था भेटी / प्रदर्शन भेटी-
  राजा केळकर वस्तुसंग्रहालय / ऐतिहासिक शस्त्रास्त्र प्रदर्शनाला भेट, किल्ले प्रदर्शन, पुनवडी ते पुणे प्रदर्शन / खलिलखान यांच्या व्यंगचित्र प्रदर्शनास भेट

**झुलेलाल** - सारी प्रजा बळजबरीने धर्मांतरीत करण्याचा मुसलमान नवाबाचा प्रयत्न आपल्या कर्तृत्वाने विफल केला.



'स्व'-रूपवर्धिनी कार्यवृत्त २००२

- दिवाळी निमित्त पणत्या व उटणे विक्री उपक्रम
- भेटकार्डे तयार करणे
- भटकंती - हनुमान टेकडीवर
- द लीजंड ऑफ भगतसिंग - चित्रपटावर चर्चा
- बोधकथा - सुविचार - वृत्तपत्रीय बातम्या.. (दैनंदिन उपक्रम)
- हस्ताक्षर स्पर्धा
- नियोजन पाठपुरावा
- गीतगायन
- प्रश्नमंजूषा (सामान्यज्ञान)
- अथर्वशीर्ष पाठांतर
- रेडिओ प्ले / फनफेअर
- गणित जुडी (दररोज २१ गणिते सोडविण्याचा उपक्रम)
- दिवाळी अंक तयार करण्याची स्पर्धा
- अंताक्षरी, काव्यरचना, खजिनाशोध स्पर्धा
- श्री गणेश प्रश्नमंजूषा
- इतिहास-भूगोल प्रश्नसंच तयार करणे
- चलो अयोध्या (खेळ)
- रामनाम जप
- रांगोळी प्रशिक्षण
- विज्ञान विशेष वृत्तकथन
- भोंडला
- पुस्तकहंडी
- पत्रलेखन सराव

## उपक्रमविशेष

विविध उपक्रम घेताना काही वेळा नावीन्यपूर्ण कल्पनांना पंख फुटतात आणि त्यातून काही विशेष उपक्रम योजले जातात. या वर्षी जरा वेगळे म्हणून सांगयला हवेत असे हे विशेष उपक्रम-

- अखंडानंद शाखेने शाखेतील मुलांकडून गोष्टींची पुस्तके गोळा करून ग्रंथालय सुरू केले. हा उपक्रम कळल्यावर याच शाखेतील एका व्यावसायिक युवकाने ग्रंथालयाला देणगी देण्याचा संकल्प जाहीर केला.
- अखंडानंद व रामकृष्ण शाखेने दिवाळीच्या सुट्टीत सकाळी ६ वाजता सायकलवरून पुण्याच्या वेगवेगळ्या भागांना फेरफटका मारला. छोटे वर्धक सायकलवर डबलसीट बसून फेरफटक्याचा आनंद मिळवत होते, तर विवेकानंद शाखेने ऐतिहासिक स्थळांना भेटी दिल्या.
- रामकृष्ण शाखेने दिवाळीच्या सुटीत दररोज एक नवीन स्पर्धा घेण्याचा उपक्रम घेतला. यामध्ये चित्रकला, बुध्दीबळ, काव्यवाचन, गायन, मूक अभिनय, सांघिकनृत्य, जाहिरात स्पर्धा, पद्य अंताक्षरी, किल्ले सजावट, वस्तुसंकलन प्रदर्शन अशा अनेक स्पर्धांचा समावेश होता.
- योगानंद शाखेने सुटीच्या कालावधीत वर्धकांना तीन प्रकारच्या सूची बनवायला सांगितल्या होत्या.
  १) पालकांचे व्यवसाय
  २) सर्व वर्धकांचे पत्ते, दूरध्वनी क्रमांक इ.
  ३) वर्धकांचे वाढदिवस

**देवलऋषी** - धर्मांतरीतांना पुनः धर्मात घेण्याचा विधी प्रस्थापित केला.

## गिर्यारोहणाचा स्वतंत्र गट

सुटीच्या कालावधीत वर्धक-वर्धिकांना सहलीला घेऊन जाण्याचा कार्यक्रम हा ठरलेला असतोच. अगदी याही वर्षी ढाकभैरी, राजमाची, नीळकंठेश्वर, भेडश्याची लेणी, हरिश्चंद्रगड अशा ठिकाणी शाखांच्या सहली गेल्या होत्या. शाखांमधील युवक-युवतीच या सहलींचे - पदभ्रमणाचे आयोजन करतात. असा प्रत्येक कार्यक्रम आनंद देणारा, नवे नवे अनुभव देणारा असतो. नियोजित ठिकाणची दिशा भरकटली तर होणारी मनस्थिती, परतताना काही कारणांनी परतण्याची गाडी चुकली, तर होणारी धावपळ-पळापळ हे सर्व शिक्षण नंतरच्या व्यावहारिक जीवनातही उपयोगी पडते.

हे पदभ्रमण काही प्रमाणात 'धाडसाला' अनुकूल वातावरण देत असले, तरी शास्त्रशुध्द प्रशिक्षण कार्यकर्त्यांना नाही. असे प्रशिक्षण देण्यासाठी एखाद्या गिर्यारोहण गटाची रचना असावी, असे युवकांच्या मनात होते. या मनातील विचाराला जून महिन्यात गती मिळाली. वैद्य विनेश नगरे या गिर्यारोहण गटाचे काम पहायला लागले आहेत. या वर्षी गटाने गिर्यारोहणाचे सहा कार्यक्रम घेतले. शेवटचा कार्यक्रम होता डिसेंबर महिन्यात. भीमाशंकरच्या जंगलातील तीन दिवसांची भटकंती, वनस्पतींचा परिचय, प्राण्यांचे निरीक्षण अशा कार्यक्रमांबरोबरच झोंबऱ्या थंडीत, तंबूच्या आडोशात झालेल्या अनौपचारिक गप्पा; या साऱ्या आठवणी तशाच रेंगाळत आहेत.

## उपक्रमविविधा

व्याख्याने, सहली, सुट्यांमधील शिबिरे हे कार्यक्रम जसे होत असतात, तसे वर्षभर विविध प्रकारचे उपक्रम शाखांवर होत असतात. अगदी या वर्षभरात झालेल्या विविध उपक्रमांची सूची जरी पहिली, तरी या विविधतेची कल्पना येईल. अशा विविध उपक्रमांमुळे शाखांमधील वातावरणात टवटवीतपणा जाणवतो.

- ❋ भगवत्गीता - १२व्या अध्यायाचे पाठांतर
- ❋ पाढे पाठांतर
- ❋ कराटे प्रशिक्षण
- ❋ चांदणी भोजन
- ❋ सुभाषिते व अर्थ पाठांतर
- ❋ बालन्यायालय
- ❋ इंग्रजी संभाषण वर्ग
- ❋ गुरूपौर्णिमेच्या निमित्ताने शिक्षकांचे अनुभवकथन
- ❋ भूगोल विषयावरील प्रश्नमंजूषा
- ❋ पालक-शिक्षक-वर्धक वादविवाद कार्यक्रम
- ❋ खजिनाशोध
- ❋ संस्था भेटी / प्रदर्शन भेटी-
  राजा केळकर वस्तुसंग्रहालय / ऐतिहासिक शस्त्रास्त्र प्रदर्शनाला भेट, किल्ले प्रदर्शन, पुनवडी ते पुणे प्रदर्शन / खलिलखान यांच्या व्यंगचित्र प्रदर्शनास भेट

**झुलेलाल** - सारी प्रजा बळजबरीने धर्मांतरीत करण्याचा मुसलमान नवाबाचा प्रयत्न आपल्या कर्तृत्वाने विफल केला.





- ❋ दिवाळी निमित्त पणत्या व उटणे विक्री उपक्रम
- ❋ भेटकार्डे तयार करणे
- ❋ भटकंती - हनुमान टेकडीवर
- ❋ द लीजंड ऑफ भगतसिंग - चित्रपटावर चर्चा
- ❋ बोधकथा - सुविचार - वृत्तपत्रीय बातम्या.. (दैनंदिन उपक्रम)
- ❋ हस्ताक्षर स्पर्धा
- ❋ नियोजन पाठपुरावा
- ❋ गीतगायन
- ❋ प्रश्नमंजूषा (सामान्यज्ञान)
- ❋ अथर्वशीर्ष पाठांतर
- ❋ रेडिओ प्ले / फनफेअर
- ❋ गणित जुडी (दररोज २१ गणिते सोडविण्याचा उपक्रम)
- ❋ दिवाळी अंक तयार करण्याची स्पर्धा
- ❋ अंताक्षरी, काव्यरचना, खजिनाशोध स्पर्धा
- ❋ श्री गणेश प्रश्नमंजूषा
- ❋ इतिहास-भूगोल प्रश्नसंच तयार करणे
- ❋ चलो अयोध्या (खेळ)
- ❋ रामनाम जप
- ❋ रांगोळी प्रशिक्षण
- ❋ विज्ञान विशेष वृत्तकथन
- ❋ भोंडला
- ❋ पुस्तकहंडी
- ❋ पत्रलेखन सराव

## उपक्रमविशेष

विविध उपक्रम घेताना काही वेळा नावीन्यपूर्ण कल्पनांना पंख फुटतात आणि त्यातून काही विशेष उपक्रम योजले जातात. या वर्षी जरा वेगळे म्हणून सांगयला हवेत असे हे विशेष उपक्रम-

- ◆ अखंडानंद शाखेने शाखेतील मुलांकडून गोष्टींची पुस्तके गोळा करून ग्रंथालय सुरू केले. हा उपक्रम कळल्यावर याच शाखेतील एका व्यावसायिक युवकाने ग्रंथालयाला देणगी देण्याचा संकल्प जाहीर केला.
- ◆ अखंडानंद व रामकृष्ण शाखेने दिवाळीच्या सुट्टीत सकाळी ६ वाजता सायकलवरून पुण्याच्या वेगवेगळ्या भागांना फेरफटका मारला. छोटे वर्धक सायकलवर डबलसीट बसून फेरफटक्याचा आनंद मिळवत होते, तर विवेकानंद शाखेने ऐतिहासिक स्थळांना भेटी दिल्या.
- ◆ रामकृष्ण शाखेने दिवाळीच्या सुटीत दररोज एक नवीन स्पर्धा घेण्याचा उपक्रम घेतला. यामध्ये चित्रकला, बुध्दीबळ, काव्यवाचन, गायन, मूक अभिनय, सांघिकनृत्य, जाहिरात स्पर्धा, पद्य अंताक्षरी, किल्ले सजावट, वस्तुसंकलन प्रदर्शन अशा अनेक स्पर्धांचा समावेश होता.
- ◆ योगानंद शाखेने सुटीच्या कालावधीत वर्धकांना तीन प्रकारच्या सूची बनवायला सांगितल्या होत्या.
  १) पालकांचे व्यवसाय
  २) सर्व वर्धकांचे पत्ते, दूरध्वनी क्रमांक इ.
  ३) वर्धकांचे वाढदिवस

**देवलऋषी** - धर्मांतरीतांना पुनः धर्मात घेण्याचा विधी प्रस्थापित केला.

- हनुमान जयंतीच्या निमित्ताने योगानंद शाखेने ५५६० सूर्यनमस्कार घातले.
- 'आजोळ' प्रकल्पाच्या कार्यकर्त्यांनी प्रतिवर्षाप्रमाणे पूर्वी आजोळमध्ये येणाऱ्या वर्धक-वर्धिकांना दहावी परीक्षेच्या निमित्ताने शुभेच्छा देण्याचा उपक्रम घेतला. याचा परिणाम एका ११वी मध्ये गेलेल्या युवतीने सांगितला. 'आजोळ मध्ये काही वर्षापूर्वी येत असलेल्या माझ्यासारख्यांची इतकी आठवण ठेवून शुभेच्छा द्यायला कार्यकर्ते घरी आले! हा जिव्हाळा जिथे आहे ते काम आपण केलेच पाहिजे याची जाणीव माझ्या मनात जागृत झाली-'
- अखंडानंद शाखेतील दोन युवक कार्यकर्ते त्यांच्या घरी शाखेतील वर्धकांना संगणक प्रशिक्षण देत आहेत.

## कबड्डी जिंदाबाद

मैदानात विशेषत: कबड्डीच्या खेळात समोरच्या फळीत चढाई करताना किंवा समोरच्या फळीतल्या खेळाडूचे आक्रमण अंगावर घेत त्याला बाद करताना खेळाचा आनंद तर मनमुराद मिळतोच; पण नकळत यातून व्यक्तिमत्त्व घडते. हे व्यक्तिमत्त्व व्यवहारातील स्पर्धेच्या आव्हानांना तितक्याच सहजतेने सामोरे जाऊ शकते. खालील वर्धकांचे, कार्यकर्त्यांचे यश हेच सांगते आहे. या सर्वांचे अभिनंदन.

- राम जगताप - महाराष्ट्र पोलीस मुष्टियुध्द स्पर्धेत सुवर्णपदक
- किरण कुडलिगार - लेफ्टनंट या पदावर भूसेनेत अधिकारी म्हणून रूजू
- संजय तांबट - MCJ परीक्षेत पुणे विद्यापीठात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण
- अभिषेक तांबट - कबड्डी खेळात पुणे जिल्हा संघात निवड
- रोहन तांबट - आंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेत चमकदार खेळ
- शंकर म्हेत्रे - गावकोस मारूती कबड्डी संघात निवड
- अखंडानंद शाखेतील वर्धक विश्वकर्मा शाळेचे विद्यार्थी आहेत. वर्धिनीच्या शाखेत कबड्डीचा रोज सराव असणारे हे विद्यार्थी शाळेच्या संघात होते. पूर्ण संघ वर्धकांचा होता व आंतरशालेय कबड्डी संघाने उपांत्य फेरीपर्यंत मजल मारली.
- तुषार सावंत - आंतरमहाविद्यालयीन व्हॉलीबॉल स्पर्धेत चमकदार खेळ
- वैद्य. दिनेश नगरे - आयुर्वेदवाचस्पती पदवी प्राप्त




संत कबीर - दुष्ट सामाजिक रूढी, जातीभेद, उच्चनीचता या सर्वांवर आपल्या दोह्यांमधून कठोर प्रहार केले.





## निवासी शिबिर वृत्तांत

उन्हाळ्याच्या आणि दिवाळीच्या सुटीत निवासी शिबिरे संपन्न होतात. शिबिरांच्या कालावधीत सर्व वर्धक किंवा वर्धिका शिबिरस्थानी एकत्र रहात असल्याने सहजीवनाचा मिळणारा आनंद अवर्णनीयच असतो. शिबिरस्थानांचे, शिबिराच्या मुख्य विषयाचे आकर्षण शिबिरार्थींना असते, तर शिबिरांच्या निमित्ताने कार्यकर्त्यांचे खूप चांगले प्रशिक्षण होत असते. अनेक गमतीजमती घडत असतात. या वर्षीही अशी शिबिरे झाली. त्या शिबिरांचा हा वृत्तांत-

**'मी राजा होण्यासाठी आलो आहे'**

'स्व'-रूपाची खरी ओळख ज्याला झाली आहे, अशा व्यक्तीच्या शब्दाशब्दात आत्मविश्वास जाणवतो. बालवयातच 'मी राजा होण्यासाठी आलो आहे' असे आत्मविश्वासपूर्ण उत्तर देणाऱ्या बडोद्याच्या महाराज सयाजीराव गायकवाड यांचे प्रेरणादायी चरित्र सांगण्यासाठी प्रशासकीय सेवेतून राजीनामा दिलेले अविनाश धर्माधिकारी मुलांच्या उन्हाळी शिबिरात आले होते. या पहिल्याच प्रेरणादायी सत्रामुळे शिबिराचे वातावरण भारून गेले. ज्यांनी आपल्या कलागुणांनी समाजाला वेड लावले असे ज्येष्ठ अभिनेते चित्तरंजन कोल्हटकर, तसेच ख्यातनाम व्यंगचित्रकार मंगेश तेंडूलकर यांनीही आपले व्यक्तिमत्त्व कसे घडत गेले, व्यंगचित्रे ही केवळ मनोरंजनासाठी नसून त्यातून व्यक्तिमत्त्व विकास कसा होतो हे गप्पागोष्टीतून, मुलांसमोर मांडले. तर डॉ. प्रदीप आगाशे यांनी जीवन परिपूर्ण बनविण्यासाठी व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू कसे आधारभूत ठरतात, याची ओळख करून दिली. २ ते ६ मे या कालावधीतील मुलांच्या मोठ्या गटाच्या या शिबिराचा समारोप उद्योजक श्री. धनंजय काळे यांच्या मार्गदर्शनाने झाला.

**चरित्र अभ्यास शिबिर**

६ ते १० मे या कालावधीत मुलांच्या छोट्या गटाचे शिबिर झाले. संशोधक, क्रांतिकारक, संघटक व्यक्तींच्या चरित्रकथनावर आधारित हे शिबिर होते. या शिबिराचा समारोप प्रा. आनंद लेले यांच्या मार्गदर्शनाने झाला. शिबिराच्या संयोजनाची जबाबदारी ११वीतून १२वीत प्रवेश करणाऱ्या युवकांवर होती. या शिबिरात झालेली काही व्याख्यानसत्रे खालीलप्रमाणे -

| व्याख्यानाचा विषय | वक्त्याचे नाव |
|---|---|
| कथा कार्व्हरची | सौ. बागेश्री पोंक्षे |
| डॉ. हेडगेवारांचे बालपण | मोहन शेटे |
| कथा थोरांच्या बालपणाच्या | प्रा. गणेश राऊत |
| क्रांतिकारक अनंत कान्हेरे | शिरीष पटवर्धन |
| सौंदर्य सृष्टीचे (स्लाईड शो) | उदय गुजर |
| क्रांतिकारक अलुरी सीताराम राजू | मिलींद सबनीस |
| कारगिल लढा व सैन्यदलाची माहिती | कर्नल जोशी |
| अभिव्यक्तीद्वारा व्यक्तिमत्त्व विकास | वंदन नगरकर |
| ओमकार साधना व प्राणायाम | स्वामी शिवशंकरजी |

गुरूदेव नानक - शिखांचे पहिले गुरू. जातिभेद व कर्मकांडाला प्रखर विरोध. बाबराच्या आक्रमणाला 'पापी वरात' असे संबोधून प्रखर विरोध केला.

- हनुमान जयंतीच्या निमित्ताने योगानंद शाखेने ५५६० सूर्यनमस्कार घातले.
- 'आजोळ' प्रकल्पाच्या कार्यकर्त्यांनी प्रतिवर्षाप्रमाणे पूर्वी आजोळमध्ये येणाऱ्या वर्धक-वर्धिकांना दहावी परीक्षेच्या निमित्ताने शुभेच्छा देण्याचा उपक्रम घेतला. याचा परिणाम एका ११वी मध्ये गेलेल्या युवतीने सांगितला. 'आजोळ मध्ये काही वर्षापूर्वी येत असलेल्या माझ्यासारख्यांची इतकी आठवण ठेवून शुभेच्छा द्यायला कार्यकर्ते घरी आले! हा जिव्हाळा जिथे आहे ते काम आपण केलेच पाहिजे याची जाणीव माझ्या मनात जागृत झाली-'
- अखंडानंद शाखेतील दोन युवक कार्यकर्ते त्यांच्या घरी शाखेतील वर्धकांना संगणक प्रशिक्षण देत आहेत.

## कबड्डी जिंदाबाद

मैदानात विशेषत: कबड्डीच्या खेळात समोरच्या फळीत चढाई करताना किंवा समोरच्या फळीतल्या खेळाडूचे आक्रमण अंगावर घेत त्याला बाद करताना खेळाचा आनंद तर मनमुराद मिळतोच; पण नकळत यातून व्यक्तिमत्त्व घडते. हे व्यक्तिमत्त्व व्यवहारातील स्पर्धेच्या आव्हानांना तितक्याच सहजतेने सामोरे जाऊ शकते. खालील वर्धकांचे, कार्यकर्त्यांचे यश हेच सांगते आहे. या सर्वांचे अभिनंदन.

- राम जगताप - महाराष्ट्र पोलीस मुष्टियुध्द स्पर्धेत सुवर्णपदक
- किरण कुडलिंगार - लेफ्टनंट या पदावर भूसेनेत अधिकारी म्हणून रूजू
- संजय तांबट - MCJ परीक्षेत पुणे विद्यापीठात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण
- अभिषेक तांबट - कबड्डी खेळात पुणे जिल्हा संघात निवड
- रोहन तांबट - आंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेत चमकदार खेळ
- शंकर म्हेत्रे - गावकोस मारूती कबड्डी संघात निवड
- अखंडानंद शाखेतील वर्धक विश्वकर्मा शाळेचे विद्यार्थी आहेत. वर्धिनीच्या शाखेत कबड्डीचा रोज सराव असणारे हे विद्यार्थी शाळेच्या संघात होते. पूर्ण संघ वर्धकांचा होता व आंतरशालेय कबड्डी संघाने उपांत्य फेरीपर्यंत मजल मारली.
- तुषार सावंत - आंतरमहाविद्यालयीन व्हॉलीबॉल स्पर्धेत चमकदार खेळ
- वैद्य. विनेश मगरे - आयुर्वेदवाचस्पती पदवी प्राप्त




संत कबीर - दुष्ट सामाजिक रूढी, जातीभेद, उच्चनीचता या सर्वांवर आपल्या दोह्यांमधून कठोर प्रहार केले.





## निवासी शिबिर वृत्तांत

उन्हाळ्याच्या आणि दिवाळीच्या सुटीत निवासी शिबिरे संपन्न होतात. शिबिरांच्या कालावधीत सर्व वर्धक किंवा वर्धिका शिबिरस्थानी एकत्र रहात असल्याने सहजीवनाचा मिळणारा आनंद अवर्णनीयच असतो. शिबिरस्थानांचे, शिबिराच्या मुख्य विषयाचे आकर्षण शिबिरार्थींना असते, तर शिबिरांच्या निमित्ताने कार्यकर्त्यांचे खूप चांगले प्रशिक्षण होत असते. अनेक गमतीजमती घडत असतात. या वर्षीही अशी शिबिरे झाली. त्या शिबिरांचा हा वृत्तांत-

**'मी राजा होण्यासाठी आलो आहे'**

'स्व'-रूपाची खरी ओळख ज्याला झाली आहे, अशा व्यक्तीच्या शब्दाशब्दात आत्मविश्वास जाणवतो. बालवयातच 'मी राजा होण्यासाठी आलो आहे' असे आत्मविश्वासपूर्ण उत्तर देणाऱ्या बडोद्याच्या महाराज सयाजीराव गायकवाड यांचे प्रेरणादायी चरित्र सांगण्यासाठी प्रशासकीय सेवेतून राजीनामा दिलेले अविनाश धर्माधिकारी मुलांच्या उन्हाळी शिबिरात आले होते. या पहिल्याच प्रेरणादायी सत्रामुळे शिबिराचे वातावरण भारून गेले. ज्यांनी आपल्या कलागुणांनी समाजाला वेड लावले असे ज्येष्ठ अभिनेते चित्तरंजन कोल्हटकर, तसेच ख्यातनाम व्यंगचित्रकार मंगेश तेंडूलकर यांनीही आपले व्यक्तिमत्त्व कसे घडत गेले, व्यंगचित्रे ही केवळ मनोरंजनासाठी नसून त्यातून व्यक्तिमत्त्व विकास कसा होतो हे गप्पागोष्टीतून, मुलांसमोर मांडले. तर डॉ. प्रदीप आगाशे यांनी जीवन परिपूर्ण बनविण्यासाठी व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू कसे आधारभूत ठरतात, याची ओळख करून दिली. २ ते ६ मे या कालावधीतील मुलांच्या मोठ्या गटाच्या या शिबिराचा समारोप उद्योजक श्री. धनंजय काळे यांच्या मार्गदर्शनाने झाला.

**चरित्र अभ्यास शिबिर**

६ ते १० मे या कालावधीत मुलांच्या छोट्या गटाचे शिबिर झाले. संशोधक, क्रांतिकारक, संघटक व्यक्तींच्या चरित्रकथनावर आधारित हे शिबिर होते. या शिबिराचा समारोप प्रा. आनंद लेले यांच्या मार्गदर्शनाने झाला. शिबिराच्या संयोजनाची जबाबदारी ११वीतून १२वीत प्रवेश करणाऱ्या युवकांवर होती. या शिबिरात झालेली काही व्याख्यानसत्रे खालीलप्रमाणे -

| व्याख्यानाचा विषय | वक्त्याचे नाव |
|---|---|
| कथा कार्व्हरची | सौ. बागेश्री पोंक्षे |
| डॉ. हेडगेवारांचे बालपण | मोहन शेटे |
| कथा थोरांच्या बालपणाच्या | प्रा. गणेश राऊत |
| क्रांतिकारक अनंत कान्हेरे | शिरीष पटवर्धन |
| सौंदर्य सृष्टीचे (स्लाईड शो) | उदय गुजर |
| क्रांतिकारक अलुरी सीताराम राजू | मिलींद सबनीस |
| कारगिल लढा व सैन्यदलाची माहिती | कर्नल जोशी |
| अभिव्यक्तीद्वारा व्यक्तिमत्त्व विकास | वंदन नगरकर |
| ओमकार साधना व प्राणायाम | स्वामी शिवशंकरजी |

गुरूदेव नानक - शिखांचे पहिले गुरू. जातिभेद व कर्मकांडाला प्रखर विरोध. बाबराच्या आक्रमणाला 'पापी वरात' असे संबोधून प्रखर विरोध केला.

## शत्रूला परास्त करण्यासाठी

*या शिबिरात कर्नल जोशी यांनी कारगिलचा लढा कसा झाला, भारतीय सैनिकांनी या उंच पहाडी क्षेत्रात कसा पराक्रम केला, याच्या कथा मुलांना सांगितल्या. मुलांच्या चेहऱ्यावरचे भाव असे होते की जणू तेच त्या लढ्यात होते. या सत्रानंतर व्यवस्थेतील युवकांनी सांगितले की संध्याकाळी मैदानावर खेळ होणार नाहीत. त्याऐवजी एका युध्दाला तुम्हाला सामोरे जायचे आहे. शिबिरस्थानाच्या हद्दीतीलच हनुमान टेकडी हे या युध्दाचे ठिकाण निश्चित झाले. शिबिरातील १५० बाल विरूध्द ३० युवक असे हे घनघोर युध्द दीड तास चालले. बालमंडळींनी हनुमान टेकडीवरील ३० युवकांच्या घुसखोरीला परतून लावण्यासाठी टेकडी जवळजवळ पळत जाऊनच पूर्ण केली. दोराला पाय न लावता केवळ हातांच्या बळावर झाडांवर चढण्याचाही पराक्रम काहींनी केला आणि युध्दाला तोंड फुटले. ओढाओढी, चेंगराचेंगरी यथेच्छ चालू होती. एरवी ज्या युवकदादांना शाखेत ते सर म्हणतात त्यांच्यावर चढाई करताना आणि संधी मिळताच त्यांना यथेच्छ बडवण्याची संधी कोणी सोडत नव्हते हातपाय सोलवटतायत्, गुडघे फुटतायत् तरी हल्ल्याची तीव्रता मात्र कमी होत नव्हती. संख्येच्या बळावर, गनिमी तंत्राचा वापर करीत आणि प्रसंगी युवकांची ताकद भारी पडेल असा अंदाज येताच क्षमायाचनेचे तंत्र वापरून बालांनी या युध्दात विजय मिळवला. ३० युवकांना कैद केले. या युध्दाच्या खेळात खालून फक्त उडालेली प्रचंड धूळ दिसत होती आणि गगनभेदी घोषणा ऐकू येत होत्या. युध्दाची अखेर विजयी सेनानींच्या हस्ते मारूतीरायांच्या आरतीने झाली आणि जखमी सैनिकांसह पराभूत सैन्यही पिठल-भाकरीवर तुटून पडण्यासाठी शिबिरस्थानी दौडत आले.*



### 'आम्ही वर्धिनीतून आलो आहोत'

या शिबिरातील व्याख्यानसत्रे कृतीसत्रे निश्चित करण्यासाठी अनेक वक्त्यांना भेटून त्यांचे सत्र निश्चित करण्याची जबाबदारी सौरभ वीरकर आणि असीम पाळंदे या युवक मित्रांवर होती. संभाव्य वक्त्यांची नावे, पत्ते, दूरध्वनी त्यांना दिले होते. एप्रिलच्या रणरणत्या उन्हात सायकलीवरून ही जोडगोळी फिरत होती. हे काम करताना आलेले अनुभव सांगताना त्यांनी सांगितले 'आम्ही अनेक मोठ्या मोठ्या व अनुभवी व्यक्तींकडे गेलो. आमचा परिचय नव्हता पण आम्ही वर्धिनीतून आलो आहोत, एवढे म्हटल्याबरोबर आमचे मनापासून स्वागत व्हायचे. आमचे म्हणणे ऐकल्यावर या सर्व व्यक्तींनी आवश्यक ते सहकार्य किंचितही आढेवेढे न घेता आम्हाला दिले.'

**गुरू गोविंदसिंह** - शिखांचे दहावे गुरू. अन्यायी मुसलमान राज्याच्या विरोधात लढण्यासाठी खालसा पंथाची स्थापना. धर्मरक्षणासाठी हिंदू समाजात क्षात्रतेज निर्माण केले.





### मेरी झाँसी नही दूंगी !

विविध कर्तृत्ववान स्त्रियांच्या चरित्रकथनाचा विषय मुलींच्या उन्हाळी शिबिरासाठी होता. शिबिराचे स्थानही साजेसे अर्थात 'राणी लक्ष्मीबाई सैनिक शाळा' हे होते. या शिबिरात झालेली काही व्याख्यानसत्रे खालीलप्रमाणे-

| **व्याख्यानाचा विषय** | **वक्त्याचे नाव** |
|---|---|
| राणी लक्ष्मीबाई | **प्रा. सु.ह. जोशी** |
| मादाम क्युरी | **सौ. संगिता भंडगे** |
| सावरकर घराण्यातील स्त्रिया | **सौ. हिमानी सावरकर** |
| सावित्रीबाई फुले | **सुनील भंडगे** |
| पंडिता रमाबाई | **सौ. स्वातीताई कर्वे** |

**शाहीर हेमंत मावळे** व त्यांच्या सहकाऱ्यांनी रात्रकार्यक्रमात पोवाड्यांचा बहारदार कार्यक्रम सादर केला.

### कला-क्रीडा कौशल्य शिबिर

मुलींच्या शिबिरस्थानीच वीर अभिमन्यू बालशाखेचे शिबिर त्याच कालावधीत होते. कु. आरती घारे या युवतीने ग्लास पेंटींग, काड्यांपासून गणपतीचे चित्र बनविणे अशा कलांचे शिक्षण, तसेच नवेनवे खेळ शिकविले. खेळ शिकवण्यासाठी प्रवीण महामुनी हे दररोज येत होते. दररोज खेळाच्या वेळात सकाळी व संध्याकाळी प्रवीणदादांनी इतके नवेनवे व रंजक खेळ घेतले की, मैदानाच्या वेळेत बालांचा उत्साह पहाण्यासारखा होता. प्रवीण सरांची अवस्था 'विठू माझा लेकुरवाळा' अशी होऊन जायची त्यांच्या अंगाखांद्यावर मुले चढायची, लक्ष वेधून घ्यायची, आणखी खेळ शिकवायचा आग्रह करायची हे सारं दृश्य रोज पहाताना खूप मजा यायची

### धप्पऽऽऽ आईऽऽगऽऽ हाऽहाऽऽ

शिबिरस्थान सैनिकी शाळा होती. सैनिकी शाळेतील मुलींच्या स्वतंत्र खोल्यांमध्ये निवासाची व्यवस्था होती. ४० बालांना पहिल्यांदाच प्रत्येकाला झोपण्यासाठी स्वतंत्र पलंग (पण एकावर एक रचलेले) मिळाले होते. पलंगावर आणि एकटे झोपायचा प्रसंग यापूर्वी कोणावरच आलेला नव्हता. वरच्या पलंगावर झोपण्यासाठी चढाओढ झाली. रात्री दीपविसर्जन झाल्यावर थोडा वेळ शांततेत गेला आणि अचानक आवाज आला "धप्पऽऽ आईऽऽग!" या आवाजाने बालशाखेच्या पालक पुष्पाताई नडे उठल्या. त्यांनी पाहिले तर एक चिरंजीव लोळत लोळत वरून खाली पडलेले. त्याचे रडणे जरा थांबेपर्यंत दुसरा आवाज आला "धप्पऽऽ आईऽऽग!" दुसरे चिरंजीव लोळले होते. एव्हाना बरेच बाल जागे झाले होते. पडलेल्यांची गंमत ऐकता ऐकता पुन्हा आवाज आला आणि सगळे हसत सुटले. शेवटी पुष्पाताईंनी सर्वांना उठविले आणि सभागृहात सतरंजीवर झोपवले.

**तुलसीदास** - मुसलमानी आक्रमणाने हताश, दुर्बल झालेल्या समाजाला 'रामचरित मानस' या रचनेद्वारा मनोबल दिले. संस्कृती रक्षणाचे अलौकिक कार्य केले.

## शत्रूला परास्त करण्यासाठी

*या शिबिरात कर्नल जोशी यांनी कारगिलचा लढा कसा झाला, भारतीय सैनिकांनी या उंच पहाडी क्षेत्रात कसा पराक्रम केला, याच्या कथा मुलांना सांगितल्या. मुलांच्या चेहऱ्यावरचे भाव असे होते की जणू तेच त्या लढ्यात होते. या सत्रानंतर व्यवस्थेतील युवकांनी सांगितले की संध्याकाळी मैदानावर खेळ होणार नाहीत. त्याऐवजी एका युध्दाला तुम्हाला सामोरे जायचे आहे. शिबिरस्थानाच्या हद्दीतीलच हनुमान टेकडी हे या युध्दाचे ठिकाण निश्चित झाले. शिबिरातील १५० बाल विरूध्द ३० युवक असे हे घनघोर युध्द दीड तास चालले. बालमंडळींनी हनुमान टेकडीवरील ३० युवकांच्या घुसखोरीला परतून लावण्यासाठी टेकडी जवळजवळ पळत जाऊनच पूर्ण केली. दोराला पाय न लावता केवळ हातांच्या बळावर झाडांवर चढण्याचाही पराक्रम काहींनी केला आणि युध्दाला तोंड फुटले. ओढाओढी, चेंगराचेंगरी यथेच्छ चालू होती. एरवी ज्या युवकदादांना शाखेत ते सर म्हणतात त्यांच्यावर चढाई करताना आणि संधी मिळताच त्यांना यथेच्छ बडवण्याची संधी कोणी सोडत नव्हते हातपाय सोलवटतायत्, गुडघे फुटतायत् तरी हल्ल्याची तीव्रता मात्र कमी होत नव्हती. संख्येच्या बळावर, गनिमी तंत्राचा वापर करीत आणि प्रसंगी युवकांची ताकद भारी पडेल असा अंदाज येताच क्षमायाचनेचे तंत्र वापरून बालांनी या युध्दात विजय मिळवला. ३० युवकांना कैद केले. या युध्दाच्या खेळात खालून फक्त उडालेली प्रचंड धूळ दिसत होती आणि गगनभेदी घोषणा ऐकू येत होत्या. युध्दाची अखेर विजयी सेनानींच्या हस्ते मारूतीरायांच्या आरतीने झाली आणि जखमी सैनिकांसह पराभूत सैन्यही पिठल-भाकरीवर तुटून पडण्यासाठी शिबिरस्थानी दौडत आले.*



### 'आम्ही वर्धिनीतून आलो आहोत'

या शिबिरातील व्याख्यानसत्रे कृतीसत्रे निश्चित करण्यासाठी अनेक वक्त्यांना भेटून त्यांचे सत्र निश्चित करण्याची जबाबदारी सौरभ वीरकर आणि असीम पाळंदे या युवक मित्रांवर होती. संभाव्य वक्त्यांची नावे, पत्ते, दूरध्वनी त्यांना दिले होते. एप्रिलच्या रणरणत्या उन्हात सायकलीवरून ही जोडगोळी फिरत होती. हे काम करताना आलेले अनुभव सांगताना त्यांनी सांगितले 'आम्ही अनेक मोठ्या मोठ्या व अनुभवी व्यक्तींकडे गेलो. आमचा परिचय नव्हता पण आम्ही वर्धिनीतून आलो आहोत, एवढे म्हटल्याबरोबर आमचे मनापासून स्वागत व्हायचे. आमचे म्हणणे ऐकल्यावर या सर्व व्यक्तींनी आवश्यक ते सहकार्य किंचितही आढेवेढे न घेता आम्हाला दिले.'

**गुरू गोविंदसिंह** - शिखांचे दहावे गुरू. अन्यायी मुसलमान राज्याच्या विरोधात लढण्यासाठी खालसा पंथाची स्थापना. धर्मरक्षणासाठी हिंदू समाजात क्षात्रतेज निर्माण केले.





### मेरी झाँसी नही दूंगी !

विविध कर्तृत्ववान स्त्रियांच्या चरित्रकथनाचा विषय मुलींच्या उन्हाळी शिबिरासाठी होता. शिबिराचे स्थानही साजेसे अर्थात 'राणी लक्ष्मीबाई सैनिक शाळा' हे होते. या शिबिरात झालेली काही व्याख्यानसत्रे खालीलप्रमाणे-

| व्याख्यानाचा विषय | वक्त्याचे नाव |
|---|---|
| राणी लक्ष्मीबाई | **प्रा. सु.ह. जोशी** |
| मादाम क्युरी | **सौ. संगिता भंडगे** |
| सावरकर घराण्यातील स्त्रिया | **सौ. हिमानी सावरकर** |
| सावित्रीबाई फुले | **सुनील भंडगे** |
| पंडिता रमाबाई | **सौ. स्वातीताई कर्वे** |

**शाहीर हेमंत मावळे** व त्यांच्या सहकाऱ्यांनी रात्रकार्यक्रमात पोवाड्यांचा बहारदार कार्यक्रम सादर केला.

### कला-क्रीडा कौशल्य शिबिर

मुलींच्या शिबिरस्थानीच वीर अभिमन्यू बालशाखेचे शिबिर त्याच कालावधीत होते. कु. आरती घारे या युवतीने ग्लास पेंटींग, काड्यांपासून गणपतीचे चित्र बनविणे अशा कलांचे शिक्षण, तसेच नवेनवे खेळ शिकविले. खेळ शिकवण्यासाठी प्रवीण महामुनी हे दररोज येत होते. दररोज खेळाच्या वेळात सकाळी व संध्याकाळी प्रवीणदादांनी इतके नवेनवे व रंजक खेळ घेतले की, मैदानाच्या वेळेत बालांचा उत्साह पहाण्यासारखा होता. प्रवीण सरांची अवस्था 'विठू माझा लेकुरवाळा' अशी होऊन जायची त्यांच्या अंगाखांद्यावर मुले चढायची, लक्ष वेधून घ्यायची, आणखी खेळ शिकवायचा आग्रह करायची हे सारं दृश्य रोज पहाताना खूप मजा यायची

### धप्पऽऽऽ आईऽऽऽगऽऽ हाऽहाऽऽ

शिबिरस्थान सैनिकी शाळा होती. सैनिकी शाळेतील मुलींच्या स्वतंत्र खोल्यांमध्ये निवासाची व्यवस्था होती. ४० बालांना पहिल्यांदाच प्रत्येकाला झोपण्यासाठी स्वतंत्र पलंग (पण एकावर एक रचलेले) मिळाले होते. पलंगावर आणि एकटे झोपायचा प्रसंग यापूर्वी कोणावरच आलेला नव्हता. वरच्या पलंगावर झोपण्यासाठी चढाओढ झाली. रात्री दीपविसर्जन झाल्यावर थोडा वेळ शांततेत गेला आणि अचानक आवाज आला "धप्पऽऽ आईऽऽग!" या आवाजाने बालशाखेच्या पालक पुष्पाताई नडे उठल्या. त्यांनी पाहिले तर एक चिरंजीव लोळत लोळत वरून खाली पडलेले. त्याचे रडणे जरा थांबेपर्यंत दुसरा आवाज आला "धप्पऽऽ आईऽऽग!" दुसरे चिरंजीव लोळले होते. एव्हाना बरेच बाल जागे झाले होते. पडलेल्यांची गंमत ऐकता ऐकता पुन्हा आवाज आला आणि सगळे हसत सुटले. शेवटी पुष्पाताईंनी सर्वांना उठविले आणि सभागृहात सतरंजीवर झोपवले.

**तुलसीदास** - मुसलमानी आक्रमणाने हताश, दुर्बल झालेल्या समाजाला 'रामचरित मानस' या रचनेद्वारा मनोबल दिले. संस्कृती रक्षणाचे अलौकिक कार्य केले.

**काँक्रिटच्या जंगलातून निसर्गाच्या कुशीत**

आतापर्यंत शिबिरे नेहमीच वेगवेगळ्या गटांची झाली. ग्रमीण भागातील मुलामुलींचे वेगळे, शहरातील मुलांचे वेगळे. या दिवाळी शिबिरांची रचना करताना असा निर्णय झाला की, मुलांच्या एकां शाखेने मुळशी खोऱ्यातील एका गावाच्या शिबिराची पूर्ण जबाबदारी घ्यायची. या रचनेतून पौड, आसदे, चाले, कोळवण व जवण या गावी शिबिरे घ्यायचे ठरले. त्या गावाचे शिबिर कोणकोणत्या शाखांनी घ्यायचे याची निश्चिती झाली. आणि युवक कामाला लागले. शिबिरस्थान, संबंधित गावातील मुलांशी संपर्क, व्याख्यान व्यवस्था, भोजनसाहित्य जमविणे, आचारी शोधणे सर्व सर्व कामे त्या त्या शाखेच्या युवकांनीच करायची असल्याने जवळपास ६० ते ७० युवक आपापले शिबिर यशस्वी करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करू लागले.

हा एक नवाच अनुभव अनेकांना होता. ग्रामस्थ स्वागत कसे करतात, सहकार्य कसे देतात, अशक्य वाटणाऱ्या व्यवस्था थोड्याशा संपर्कातून कशा मार्गी लागतात, याचे अनुभव मिळत होते. एखादी व्यवस्था मार्गी लागली नाही तर धांदलही उडत होती. पहाता पहाता शिबिराचा दिवस उजाडला. ७ नोव्हेंबर रोजी सर्व गावी त्या त्या गावच्या प्रतिष्ठित नागरिकांच्या हस्ते शिबिराचे उद्‌घाटन झाले. कुठे गावचे सरपंच, उपसरपंच उपस्थित होते. तर कुठे जि.प. सदस्य, युवकांची धावपळ होती, पण शाखेतील वर्धक मात्र मजेत होते. कारण शिबिरस्थानी गेल्यावर पहिल्याच दिवशी त्या त्या गावच्या मुलांशी त्यांची दोस्ती झाली. शिबिरातील कार्यक्रम एरवीपेक्षा खूप वेगळे झाले.

- पहाटे उठून काकडआरतीला जायचे. गावकऱ्यांवरोबर भक्तिरसात नाहून जायचे.
- मैदानावरचा मनसोक्त खेळ
- गावच्या नदीत डुंबायचे, शेतीची माहिती करून घ्यायची
- गावात स्वच्छतेचा, साक्षरतेचा संदेश घेऊन प्रभातफेऱ्या काढायच्या. या निमित्ताने ग्रामसर्वेक्षण करायचे.
- ग्रामस्वच्छतेच्या अभियानात गावच्या देवळांची स्वच्छता करायची.



या व्यतिरिक्त शिबिरस्थानी राष्ट्रभक्तीपर गीतगायन, हस्तकला, किल्ल्यांच्या प्रतिकृती बनविणे, कथाकथन, गटचर्चा, अशा भरगच्च कार्यक्रमात मुले रंगून गेली होती. कोळवण गावी तेथील मुलांनी संबळ वाजवून काही भारूडे सादर केली. गावच्या मुलामुलींचा मोकळा आवाज सर्वांनाच भावला. संबळ वाद्य शिकण्याची धडपड सुरू झाली. या शिबिरात पुण्याहून

**संत श्री ज्ञानेश्वर** - ज्ञानेश्वरीच्या द्वारे भगवद्‌गीतेतील भक्तीयुक्त कर्ममार्गाचे, भेदभाव विरहीत समतेचे तत्त्वज्ञान समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचवले. भागवत धर्माची स्थापना. मानवतावादाचा महान संदेश समाजाला दिला.





काही व्याख्याते या गावी गेले होते. त्यातील काही विषय पुढीलप्रमाणे

| | |
|---|---|
| स्वातंत्र्यवीर सावरकर | **डॉ. प्रदीप आगाशे** |
| अभ्यासाची आवड | **डॉ. प्रदीप आगाशे** |
| मुळशी खोऱ्याचा परिचय | **श्री. बोराडे सर** |
| संघटनेची व मैत्रीची आवश्यकता | **विलास कुलकर्णी** |
| गरूड व्हावे, उंच आकांक्षांवर स्वार व्हावे | **अरविंद केळकर** |
| सद्य परिस्थितीतील नायक | **प्रा. शिरीष आपटे** |
| मुल्याधारित कथा | **प्रा. शिरीष आपटे** |
| भगिरथ : काल-आज-उद्या | **संजय राचेल्ली** |
| देशासमोरील समस्या व त्यांचे निराकरण | **चंदन हायगुंडे** |
| अभिव्यक्ती विकास | **श्रीकांत यादव** |
| डॉ. हेडगेवार चरित्र | **मोहनराव शेटे** |
| उत्तम आरोग्याची गुरूकिल्ली | **सौ. मुसळे** |
| यू कॅन विन | **सौ. मेघना अत्रे** |
| गणितातील गमती-जमती | **पु. ग.वैद्य** |
| सुक्ष्मजीवांचे विश्व | **प्रा. देवपूरकर** |
| वासुदेव बळवंत फडके | **दि. दा. जोशी** |
| मेंदू (स्लाईड शो) | **प्रा. पंडित विद्यासागर** |
| उत्तमतेची कास धरू | **शिरीष पटवर्धन** |
| वर्धिनीची प्रार्थना | **प्रा. सुधाकर मुळे** |

**शोधबोध शिबिराचा**

या सर्व शिबिरात अडचणी जशा आल्या तसे मदतीला धावून येणारे स्थानिक ग्रामस्थही भेटले. आपल्या गावातील मुलांसाठी शिबिर घ्यायला पुण्याहून तरूण आले, तेथील विद्यार्थी आले म्हणून कौतूकाने एखादे जेवण गावाने, गावच्या सरपंचाने दिले. एका शिबिराच्या समारोपाच्या भोजनाचा खर्च पालकांनी केला. शहरातील व गावातील मुलांची मैत्री झाली. शहरी वातावरणातील मुलांना ग्रामसर्वेक्षणाच्या निमित्ताने गावच्या मुलांना शिक्षण घेताना किती संघर्ष करावा लागतो, घरामध्ये किती कमी साधने असतात याचे दर्शन झाले. गावागावात साप्ताहिक शाखा सुरू करता येईल का, असा विचार परतताना युवकांच्या मनात घोळत होता.

**मुलीच्या काळजीने ...**

*या वर्षी निवेदिता शाखेने एप्रिल महिन्यातच नव्या मुलींची निवड केली होती. त्यामुळे जवळपास १५ नव्या वर्धिका पहिल्यादाच शिबिराला आल्या होत्या. घरापासून दूर रहाण्याचा त्यांचाही पहिलाच प्रसंग आणि त्यांच्या पालकांचाही. साहजिकपणे या मुलींच्या पालकांना थोडी काळजी वाटत होती. मुली रहातील का? त्यांची काळजी कशी घेतली जाईल? शिबिराच्या समारोपाला या मुलींचे पालक उपस्थित होते. शिबिरातील अनुभव, मुलींच्या प्रतिक्रिया ऐकल्यावर त्यांच्यापैकी एका मुलीच्या आईने मनोगत व्यक्त केले. शिबिरात पहिल्यादाच मुलीला पाठविले होते. तिच्याविषयी वाटणारी काळजी व्यक्त करताना त्यांना अश्रु आवरलेच नाहीत. मग मात्र सावरल्या आणि युवतींना म्हणाल्या, 'एवढ्या ७०-८० जणांची काळजी एवढ्या लहान वयात तुम्ही कशा घेऊ शकता? तुमची खरंच कमाल आहे!'*

**संत नामदेव** - विपूल अभंगरचना केली. साधी पण भावोत्कट अभिव्यक्ती हे या अभंग रचनांचे वैशिष्ट्य. ते कुशल संघटकही होते. भागवत् धर्माच्या प्रसारासाठी पंजाब, व उत्तरेकडील अन्य प्रांतात प्रवास केला. गुरू ग्रंथसाहेब मध्येही नामदेवांनी रचलेली ६१ पदे अंतर्भूत.

**काँक्रिटच्या जंगलातून निसर्गाच्या कुशीत**

आतापर्यंत शिबिरे नेहमीच वेगवेगळ्या गटांची झाली. ग्रमीण भागातील मुलामुलींचे वेगळे, शहरातील मुलांचे वेगळे. या दिवाळी शिबिरांची रचना करताना असा निर्णय झाला की, मुलांच्या एकां शाखेने मुळशी खोऱ्यातील एका गावाच्या शिबिराची पूर्ण जवाबदारी घ्यायची. या रचनेतून पौड, आसदे, चाले, कोळवण व जवण या गावी शिबिरे घ्यायचे ठरले. त्या गावाचे शिबिर कोणकोणत्या शाखांनी घ्यायचे याची निश्चिती झाली. आणि युवक कामाला लागले. शिबिरस्थान, संबंधित गावातील मुलांशी संपर्क, व्याख्यान व्यवस्था, भोजनसाहित्य जमविणे, आचारी शोधणे सर्व सर्व कामे त्या त्या शाखेच्या युवकांनीच करायची असल्याने जवळपास ६० ते ७० युवक आपापले शिबिर यशस्वी करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करू लागले.

हा एक नवाच अनुभव अनेकांना होता. ग्रामस्थ स्वागत कसे करतात, सहकार्य कसे देतात, अशक्य वाटणाऱ्या व्यवस्था थोड्याशा संपर्कातून कशा मार्गी लागतात, याचे अनुभव मिळत होते. एखादी व्यवस्था मार्गी लागली नाही तर धांदलही उडत होती. पहाता पहाता शिबिराचा दिवस उजाडला. ७ नोव्हेंबर रोजी सर्व गावी त्या त्या गावच्या प्रतिष्ठित नागरिकांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. कुठे गावचे सरपंच, उपसरपंच उपस्थित होते. तर कुठे जि.प. सदस्य, युवकांची धावपळ होती, पण शाखेतील वर्धक मात्र मजेत होते. कारण शिबिरस्थानी गेल्यावर पहिल्याच दिवशी त्या त्या गावच्या मुलांशी त्यांची दोस्ती झाली. शिबिरातील कार्यक्रम एरवीपेक्षा खूप वेगळे झाले.

❈ पहाटे उठून काकडआरतीला जायचे. गावकऱ्यांवरोबर भक्तिरसात नाहून जायचे.

❈ मैदानावरचा मनसोक्त खेळ

❈ गावच्या नदीत डुंबायचे, शेतीची माहिती करून घ्यायची

❈ गावात स्वच्छतेचा, साक्षरतेचा संदेश घेऊन प्रभातफेऱ्या काढायच्या. या निमित्ताने ग्रामसर्वेक्षण करायचे.

❈ ग्रामस्वच्छतेच्या अभियानात गावच्या देवळांची स्वच्छता करायची.



या व्यतिरिक्त शिबिरस्थानी राष्ट्रभक्तीपर गीतगायन, हस्तकला, किल्ल्यांच्या प्रतिकृती बनविणे, कथाकथन, गटचर्चा, अशा भरगच्च कार्यक्रमात मुले रंगून गेली होती. कोळवण गावी तेथील मुलांनी संबळ वाजवून काही भारूडे सादर केली. गावच्या मुलामुलींचा मोकळा आवाज सर्वांनाच भावला. संबळ वाद्य शिकण्याची धडपड सुरू झाली. या शिबिरात पुण्याहून

**संत श्री ज्ञानेश्वर** - ज्ञानेश्वरीच्या द्वारे भगवत्‌गीतेतील भक्तीयुक्त कर्ममार्गाचे, भेदभाव विरहीत समतेचे तत्त्वज्ञान समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचवले. भागवत धर्माची स्थापना. मानवतावादाचा महान संदेश समाजाला दिला.





काही व्याख्याते या गावी गेले होते. त्यातील काही विषय पुढीलप्रमाणे

| | |
|---|---|
| स्वातंत्र्यवीर सावरकर | **डॉ. प्रदीप आगाशे** |
| अभ्यासाची आवड | **डॉ. प्रदीप आगाशे** |
| मुळशी खोऱ्याचा परिचय | **श्री. बोराडे सर** |
| संघटनेची व मैत्रीची आवश्यकता | **विलास कुलकर्णी** |
| गरूड व्हावे, उंच आकांक्षांवर स्वार व्हावे | **अरविंद केळकर** |
| सद्य परिस्थितीतील नायक | **प्रा. शिरीष आपटे** |
| मुल्याधारित कथा | **प्रा. शिरीष आपटे** |
| भगिरथ : काल-आज-उद्या | **संजय राचेल्ली** |
| देशासमोरील समस्या व त्यांचे निराकरण | **चंदन हायगुंडे** |
| अभिव्यक्ती विकास | **श्रीकांत यादव** |
| डॉ. हेडगेवार चरित्र | **मोहनराव शेटे** |
| उत्तम आरोग्याची गुरूकिल्ली | **सौ. मुसळे** |
| यू कॅन विन | **सौ. मेघना अत्रे** |
| गणितातील गमती-जमती | **पु. ग. वैद्य** |
| सुक्ष्मजीवांचे विश्व | **प्रा. देवपूरकर** |
| वासुदेव बळवंत फडके | **दि. दा. जोशी** |
| मेंदू (स्लाईड शो) | **प्रा. पंडित विद्यासागर** |
| उत्तमतेची कास धरू | **शिरीष पटवर्धन** |
| वर्धिनीची प्रार्थना | **प्रा. सुधाकर मुळे** |

**शोधबोध शिबिराचा**

या सर्व शिबिरात अडचणी जशा आल्या तसे मदतीला धावून येणारे स्थानिक ग्रामस्थही भेटले. आपल्या गावातील मुलांसाठी शिबिर घ्यायला पुण्याहून तरूण आले, तेथील विद्यार्थी आले म्हणून कौतूकाने एखादे जेवण गावाने, गावच्या सरपंचाने दिले. एका शिबिराच्या समारोपाच्या भोजनाचा खर्च पालकांनी केला. शहरातील व गावातील मुलांची मैत्री झाली. शहरी वातावरणातील मुलांना ग्रामसर्वेक्षणाच्या निमित्ताने गावच्या मुलांना शिक्षण घेताना किती संघर्ष करावा लागतो, घरामध्ये किती कमी साधने असतात याचे दर्शन झाले. गावागावात साप्ताहिक शाखा सुरू करता येईल का, असा विचार परतताना युवकांच्या मनात घोळत होता.

**मुलीच्या काळजीने ...**

*या वर्षी निवेदिता शाखेने एप्रिल महिन्यातच नव्या मुलींची निवड केली होती. त्यामुळे जवळपास १५ नव्या वर्धिका पहिल्यांदाच शिबिराला आल्या होत्या. घरापासून दूर रहाण्याचा त्यांचाही पहिलाच प्रसंग आणि त्यांच्या पालकांचाही. साहजिकपणे या मुलींच्या पालकांना थोडी काळजी वाटत होती. मुली रहातील का? त्यांची काळजी कशी घेतली जाईल? शिबिराच्या समारोपाला या मुलींचे पालक उपस्थित होते. शिबिरातील अनुभव, मुलींच्या प्रतिक्रिया ऐकल्यावर त्यांच्यापैकी एका मुलीच्या आईने मनोगत व्यक्त केले. शिबिरात पहिल्यांदाच मुलीला पाठविले होते. तिच्याविषयी वाटणारी काळजी व्यक्त करताना त्यांना अश्रु आवरलेच नाहीत. मग मात्र सावरल्या आणि युवतींना म्हणाल्या, 'एवढ्या ७०-८० जणांची काळजी एवढ्या लहान वयात तुम्ही कशा घेऊ शकता? तुमची खरंच कमाल आहे!'*

**संत नामदेव** - विपूल अभंगरचना केली. साधी पण भावोत्कट अभिव्यक्ती हे या अभंग रचनांचे वैशिष्ट्य. ते कुशल संघटकही होते. भागवत् धर्माच्या प्रसारासाठी पंजाब, व उत्तरेकडील अन्य प्रांतात प्रवास केला. गुरू ग्रंथसाहेब मध्येही नामदेवांनी रचलेली ६१ पदे अंतर्भूत.

## जबाबदारीची जाणीव

एका युवकाकडे शिबिरस्थानाच्या विद्युतव्यवस्थेची जबाबदारी होती. ११वीतील या युवकाची परीक्षा नेमकी शिबिरकालावधीतच आली. शिबिराच्या आदल्या दिवशी संध्याकाळी हा युवक पौडला बसने पोहचला. पौडच्या पुढे ७-८ कि.मी. अंतरावर शिबिरस्थान होते. पण या गावी जायला बस मिळेना. रिक्षा नव्हतीच आणि टेंपोही येईना. शेवटी पायी चालत तो शिबिरस्थानी पोहोचला. विद्युतव्यवस्थेचे त्याचे सर्व काम पूर्ण करून दुसऱ्या दिवशी सकाळी पहिल्या गाडीने पुण्याला पोहोचला, परीक्षेचा पुढचा पेपर देण्यासाठी.

**यशस्वी तुम्हीच व्हाल; पण त्यासाठी .....**

अर्थातच यश मिळवायचे तर त्यासाठी बऱ्याच गोष्टी ठरवून कराव्या लागतात. मुळात वेळेचे नियोजन हवे, अभ्यासाचे नियोजन हवे, अभ्याससुध्दा जर कौशल्याने केला, तर थोड्या वेळात अधिक चांगल्या पध्दतीने अभ्यास करता येतो व वाढत्या अभ्यासाला यशस्वीपणे तोंड देता येते. मुलींच्या शाखांनी या दिवाळी सुटीत यासाठी अभ्यास कौशल्य शिबिराचे आयोजन केले होते. वाचन कौशल्ये शिकविण्यासाठी या विषयांमधील तज्ज्ञ मार्गदर्शक आले होते. त्यामध्ये सौ. उमाताई गुजर यांचा समावेश आहे. श्रीहर्ष सगरे यांनी वेळेचे नियोजन या विषयावर चर्चात्मक सत्र घेतले. या चर्चेतून वेळेचे नियोजन करणे किती आवश्यक आहे, याची जाणीव शिबिरार्थींना झाली व शिबिर समारोपप्रसंगी अनेकांनी तसे आपल्या मनोगतात व्यक्त केले.

## तापावरचे खरे औषध

संक्रांत उत्सव या वर्षी रंगमंचावरील प्रात्याक्षिकांसाठी होता. मुलींच्या शाखेने नवरसांवर आधारीत समूहनृत्य बसविले होते. यातील अनेक नृत्यप्रकारात प्रमुख नृत्य करणारी एक पाचवीतील वर्धिका ऐन कार्यक्रमाच्या दिवशी तापाने फणफणली; पण या कार्यक्रमाचे इतके आकर्षण की या चिमुरडीने खूप ताप असतानाही नृत्यप्रात्यक्षिकात आपले आजारपण जरासुध्दा डोकावू दिले नाही. ते प्रात्याक्षिक संपल्यावर आनंदाने तिच्या आणि युवतींच्या डोळ्यात पाणी आले. असाच प्रकार एका वर्धकाच्या बाबतीत घडला. तोही तापाने फणफणला. त्याच्या शाखेने कर्तृत्त्ववान व्यक्तींच्या संदेशावर आधारीत एक प्रवेश बसवला होता व त्यातील प्रमुख व्यक्तिरेखा हा वर्धक साकारणार होता. युवक कार्यकर्त्यांना चिंतेने ग्रासले होते. आता बदल कसा करायचा? पर्यायी कोणाला उभे करायचे? पण या प्रश्नांची उत्तरे शोधावीच लागली नाहीत. कारण ताप असतानाही हा वर्धक ठरल्यावेळी उपस्थित राहिला आणि त्याने आपली भूमिका चोख बजावली.

**संत एकनाथ** - समाजप्रबोधन व समाज संघटन अशा दोन्ही प्रकारचे कार्य केले. जातिभेदावर कठोर प्रहार करून सामाजिक समतेचा पुरस्कार केला. भारूडांच्या माध्यमातून समाजप्रबोधन केले. भागवत धर्माला शास्त्र व समाज याचे दुहेरी अधिष्ठान प्राप्त करून दिले.





## विक्रीकौशल्य उपक्रमातील 'आनंद'

दिवाळीच्या आधी निवेदिता शाखेतील युवतींनी वर्धिकांना उटण्याच्या पुड्या परिसरात विकण्यासाठी दिल्या. अनोळखी घरात गेल्यावर परिचय कसा करून द्यायचा, काय बोलायचे याचा सराव करून घेतला. शाखेतील वर्धिका घरोघर हिंडू लागल्या. किरकोळ किमतीची ती उटण्याची पुडी, पण विकताना किती अनुभव शिकवत होती. कुठे एखाद्या घरात धोधो स्वागत, कौतुक तर कुठे झिडकारणे. पण असे अनुभव घेत घेत वर्धिकांनी उटणे पुड्यांची भरपूर विक्री केली. सर्वांचा मिळून नफा हा ६०० रूपयांच्या आसपास झाला. नफ्याची ही रक्कम सर्वांना वाटायची की एखाद्या सामाजिक संस्थेला देणगी द्यायची, असे विचारताच सर्वांना सामाजिक संस्थेला देणगी द्यायची, असा एका सुरात निर्णय दिला. ही रक्कम एक अनाथाश्रमाला देण्याचे जाहीर करताच सर्व वर्धिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात आपला आनंद व्यक्त केला.

## हातात हात घालूनी.......

म. ए. सोसायटीच्या भावे प्राथमिक शाळेच्या शिक्षिकांच्या समोर वर्धिनीच्या परिचयाचा कार्यक्रम ठरला होता. परिचयाचे सत्र रंगले, प्रश्नोत्तरे झाली. चहापानाच्या वेळात शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. गायकवाड बाई म्हणाल्या, 'आमचे सहाय्य तुमच्या कामाला होऊ शकले, तर मी आणि आमच्या शिक्षकांना खूप आनंद होईल.' काय सहाय्य होऊ शकते? यावर थोडी चर्चा झाली. चर्चा ४थी च्या शिष्यवृत्ती परीक्षेवर आली आणि ठरले की वर्धिनीच्या अभिमन्यू बालशाखेतील ४थीच्या मुलांना भावे प्राथमिक शाळेच्या शिक्षिकांनी मार्गदर्शन करायचे. मुले या शाळेत सध्याकाळी रोज जाणे अवघड होते पण या सर्व शिक्षिकांनी सांगितले आम्ही दिवस ठरवून रिक्षाने किंवा बसने वर्धिनीत येऊ. खरोखरीच त्याप्रमाणे मुख्याध्यापिका सौ. गायकवाड यांच्या बरोबरीने श्रीमती ताठे, पिंपळे, कुलकर्णी, हर्डे, चव्हाण, नाशिककर, राऊत, तांबोळकर आणि महाजन ही शिक्षिकांची फळी आपल्या खर्चाने वर्धिनीतल्या ४थीच्या गटाला मार्गदर्शन करायला नियमितपणे येऊ लागली आहे. अशा गुणवान शिक्षिकांचे मार्गदर्शन लाभले, तर त्याचे सुपरिणाम दिसणारच. म.ए. सोसायटीचे आणि विशेषत: भावे प्राथमिक शाळेच्या अध्यापिकांचे हे सहकार्य काम अधिक विस्तारण्याला प्रेरणा देणारेच आहे.

*WITH BEST COMPLIMENTS FROM*

**INTERNATIONAL TRADE SYNDICATE**

Dealers in Dyes, Chemicals and sizing materials

93/95, Perin Nariman Bazargate Street, Fort, Mumbai - 4000 001.

Tel. : 22610176, 22622901.

**संतश्रेष्ठ श्री तुकाराम** - ज्ञानदेवांनी रचलेल्या भागवत मंदिराचा कळस म्हणजे श्री तुकाराम असे मानले जाते. सर्व प्रकारच्या सामाजिक भेदभावांना प्रखर विरोध केला. कोणाचीही भीडमुर्वत न ठेवता सामाजिक दांभिकतेवर कठोर प्रहार केले. आपल्या अभंगातून शुध्द परमार्थ धर्माची शिकवण दिली.

## जबाबदारीची जाणीव

एका युवकाकडे शिबिरस्थानाच्या विद्युतव्यवस्थेची जबाबदारी होती. ११वीतील या युवकाची परीक्षा नेमकी शिबिरकालावधीतच आली. शिबिराच्या आदल्या दिवशी संध्याकाळी हा युवक पौडला बसने पोहचला. पौडच्या पुढे ७-८ कि.मी. अंतरावर शिबिरस्थान होते. पण या गावी जायला बस मिळेना. रिक्षा नव्हतीच आणि टेंपोही येईना. शेवटी पायी चालत तो शिबिरस्थानी पोहोचला. विद्युतव्यवस्थेचे त्याचे सर्व काम पूर्ण करून दुसऱ्या दिवशी सकाळी पहिल्या गाडीने पुण्याला पोहोचला, परीक्षेचा पुढचा पेपर देण्यासाठी.

**यशस्वी तुम्हीच व्हाल; पण त्यासाठी .....**

अर्थातच यश मिळवायचे तर त्यासाठी बऱ्याच गोष्टी ठरवून कराव्या लागतात. मुळात वेळेचे नियोजन हवे, अभ्यासाचे नियोजन हवे, अभ्याससुध्दा जर कौशल्याने केला, तर थोड्या वेळात अधिक चांगल्या पध्दतीने अभ्यास करता येतो व वाढत्या अभ्यासाला यशस्वीपणे तोंड देता येते. मुलींच्या शाखांनी या दिवाळी सुटीत यासाठी अभ्यास कौशल्य शिबिराचे आयोजन केले होते. वाचन कौशल्ये शिकविण्यासाठी या विषयांमधील तज्ज्ञ मार्गदर्शक आले होते. त्यामध्ये सौ. उमाताई गुजर यांचा समावेश आहे. श्रीहर्ष सगरे यांनी वेळेचे नियोजन या विषयावर चर्चात्मक सत्र घेतले. या चर्चेतून वेळेचे नियोजन करणे किती आवश्यक आहे, याची जाणीव शिबिरार्थींना झाली व शिबिर समारोपप्रसंगी अनेकांनी तसे आपल्या मनोगतात व्यक्त केले.

## तापावरचे खरे औषध

संक्रांत उत्सव या वर्षी रंगमंचावरील प्रात्याक्षिकांसाठी होता. मुलींच्या शाखेने नवरसांवर आधारीत समूहनृत्य बसविले होते. यातील अनेक नृत्यप्रकारात प्रमुख नृत्य करणारी एक पाचवीतील वर्धिका ऐन कार्यक्रमाच्या दिवशी तापाने फणफणली; पण या कार्यक्रमाचे इतके आकर्षण की या चिमुरडीने खूप ताप असतानाही नृत्यप्रात्यक्षिकात आपले आजारपण जरासुध्दा डोकावू दिले नाही. ते प्रात्याक्षिक संपल्यावर आनंदाने तिच्या आणि युवतींच्या डोळ्यात पाणी आले. असाच प्रकार एका वर्धकाच्या बाबतीत घडला. तोही तापाने फणफणला. त्याच्या शाखेने कर्तृत्त्ववान व्यक्तींच्या संदेशावर आधारीत एक प्रवेश बसवला होता व त्यातील प्रमुख व्यक्तिरेखा हा वर्धक साकारणार होता. युवक कार्यकर्त्यांना चिंतेने ग्रासले होते. आता बदल कसा करायचा? पर्यायी कोणाला उभे करायचे? पण या प्रश्नांची उत्तरे शोधावीच लागली नाहीत. कारण ताप असतानाही हा वर्धक ठरल्यावेळी उपस्थित राहिला आणि त्याने आपली भूमिका चोख बजावली.

**संत एकनाथ** - समाजप्रबोधन व समाज संघटन अशा दोन्ही प्रकारचे कार्य केले. जातिभेदावर कठोर प्रहार करून सामाजिक समतेचा पुरस्कार केला. भारूडांच्या माध्यमातून समाजप्रबोधन केले. भागवत धर्माला शास्त्र व समाज याचे दुहेरी अधिष्ठान प्राप्त करून दिले.





## विक्रीकौशल्य उपक्रमातील 'आनंद'

दिवाळीच्या आधी निवेदिता शाखेतील युवतींनी वर्धिकांना उटण्याच्या पुड्या परिसरात विकण्यासाठी दिल्या. अनोळखी घरात गेल्यावर परिचय कसा करून द्यायचा, काय बोलायचे याचा सराव करुन घेतला. शाखेतील वर्धिका घरोघर हिंडू लागल्या. किरकोळ किमतीची ती उटण्याची पुडी, पण विकताना किती अनुभव शिकवत होती. कुठे एखाद्या घरात थोधो स्वागत, कौतुक तर कुठे झिडकारणे. पण असे अनुभव घेत घेत वर्धिकांनी उटणे पुड्यांची भरपूर विक्री केली. सर्वांचा मिळून नफा हा ६०० रूपयांच्या आसपास झाला. नफ्याची ही रक्कम सर्वांना वाटायची की एखाद्या सामाजिक संस्थेला देणगी द्यायची, असे विचारताच सर्वांना सामाजिक संस्थेला देणगी द्यायची, असा एका सुरात निर्णय दिला. ही रक्कम एक अनाथाश्रमाला देण्याचे जाहीर करताच सर्व वर्धिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात आपला आनंद व्यक्त केला

## हातात हात घालूनी.......

म. ए. सोसायटीच्या भावे प्राथमिक शाळेच्या शिक्षिकांच्या समोर वर्धिनीच्या परिचयाचा कार्यक्रम ठरला होता. परिचयाचे सत्र रंगले, प्रश्नोत्तरे झाली. चहापानाच्या वेळात शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. गायकवाड बाई म्हणाल्या, 'आमचे सहाय्य तुमच्या कामाला होऊ शकले, तर मी आणि आमच्या शिक्षकांना खूप आनंद होईल.' काय सहाय्य होऊ शकते? यावर थोडी चर्चा झाली. चर्चा ४थी च्या शिष्यवृत्ती परीक्षेवर आली आणि ठरले की वर्धिनीच्या अभिमन्यू बालशाखेतील ४थीच्या मुलांना भावे प्राथमिक शाळेच्या शिक्षिकांनी मार्गदर्शन करायचे. मुले या शाळेत सध्याकाळी रोज जाणे अवघड होते पण या सर्व शिक्षिकांनी सांगितले आम्ही दिवस ठरवून रिक्षाने किंवा बसने वर्धिनीत येऊ. खरोखरीच त्याप्रमाणे मुख्याध्यापिका सौ. गायकवाड यांच्या बरोबरीने श्रीमती ताठे, पिंपळे, कुलकर्णी, हर्डे, चव्हाण, नाशिककर, राऊत, तांबोळकर आणि महाजन ही शिक्षिकांची फळी आपल्या खर्चाने वर्धिनीतल्या ४थीच्या गटाला मार्गदर्शन करायला नियमितपणे येऊ लागली आहे. अशा गुणवान शिक्षिकांचे मार्गदर्शन लाभले, तर त्याचे सुपरिणाम दिसणारच. म.ए. सोसायटीचे आणि विशेषत: भावे प्राथमिक शाळेच्या अध्यापिकांचे हे सहकार्य काम अधिक विस्तारण्याला प्रेरणा देणारेच आहे.

*WITH BEST COMPLIMENTS FROM*

**INTERNATIONAL TRADE SYNDICATE**

Dealers in Dyes, Chemicals and sizing materials

93/95, Perin Nariman Bazargate Street, Fort, Mumbai - 4000 001.

Tel. : 22610176, 22622901.

**संतश्रेष्ठ श्री तुकाराम** - ज्ञानदेवांनी रचलेल्या भागवत मंदिराचा कळस म्हणजे श्री तुकाराम असे मानले जाते. सर्व प्रकारच्या सामाजिक भेदभावांना प्रखर विरोध केला. कोणाचीही भीडमुर्वत न ठेवता सामाजिक दांभिकतेवर कठोर प्रहार केले. आपल्या अभंगातून शुध्द परमार्थ धर्माची शिकवण दिली.

## संक्रांत उत्सव

ज्येष्ठ शिक्षणतज्ञ डॉ. प्र. ल. गावडे यांच्या अध्यक्षतेखाली या वर्षीचा संक्रांत उत्सव झाला. २० जानेवारी रोजी झालेल्या या उत्सवात मुलांचा शाखाविभाग, मुलींचा शाखाविभाग व महिला विभागाने रंगमंचावरील प्रात्याक्षिके सादर केली. बुध्दवंदनेने कार्यक्रमाला सुरूवात झाली. रंगमंचावरील प्रात्यक्षिकात शिवछत्रपतींच्या जीवनावरील, तसेच स्वदेशी भावना जागविणारे दोन पोवाडे, भारतमातेचा जोगवा, टिळक युगाची आठवण करून देणारा (गणेश) मेळा, घुंगरूकाठीवरील नृत्य, पौराणिक प्रसंग राष्ट्रीय नेत्यांच्या ओजस्वी विचारांचे स्मरण करून देणारी नाटुकली व नवरसांचे दर्शन घडविणारे नृत्य सादर करण्यात आले.

याच उत्सवापासून संस्थेने एका कर्तृत्ववान महिलेचा सन्मान करण्याच्या हेतूने 'शिवनिर्मल' पुरस्कार प्रदान करायला सुरूवात केली. या प्रथम पुरस्काराच्या मानकरी होत्या, डॉ. सौ. कल्पना जोशी. जागतिक स्पर्धेच्या या काळात त्यांना काही अमेरिकन पेटंटस् मिळाली असून त्यांची ७-८ नवीन संशोधने पेटंट मिळण्याच्या प्रतिक्षेत आहेत. स्मृतीचिन्ह व ३००० रूपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या पुरस्कारासाठी ज्यांनी वर्धिनीला एक मोठी देणगी दिली आहे, त्या श्रीमती निर्मला वैद्य या कार्यक्रमाला उपस्थित होत्या.

बालवाडी व बालशाखा विभागाचा संक्रांत उत्सव गुरूवार दि. २४ जानेवारी रोजी झाला. अत्यंत देखण्या अशा अभिनय गीतांनी सर्व बालचमुंनी उपस्थितांची मने जिंकली.

## डॉ. आंबेडकर जयंती

शोषणमुक्त समाजासाठी शेवटच्या श्वासापर्यंत ज्यांनी काम केले, अशा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन समाजाची सेवा करण्याची प्रेरणा देते. डॉ. आंबेडकरांच्या स्मृतीला अभिवादन म्हणून वर्धिनीमध्ये दरवर्षी त्यांच्या जयंतीला रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते. या वर्षी झालेल्या रक्तदान शिबिरात ११० बाटल्या रक्त संकलित झाले.

याच दिवशी डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी पुणे स्टेशनच्या परिसरात लाखो लोक येतात. रणरणत्या उन्हातही प्रचंड संख्येने नागरिक येतात. या सर्वांना पाणी देण्यासाठी पूर्ण दिवसभर पाणपोयी चालविली जाते. या कार्यक्रमाची मुख्य जबाबदारी 'आजोळ' विभागाकडे आहे. या वर्षी पाणपोयीचे उद्घाटन सरस्वती मंदिर महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. रमेश अवलगावकर यांच्या हस्ते झाले. दिवसभरात सुमारे ३५०० नागरिकांनी पाणपोयीचा लाभ घेतला.

**समर्थ श्री रामदास** - प्रपंच व परमार्थ याचा समन्वय साधण्याची शिकवण दिली. 'यत्न तो देव जाणावा' हा संस्कार त्यांनी समाजावर केला. प्रयत्न व प्रत्यक्ष प्रचीती यावर त्यांनी भर दिला.





## गुणगौरव समारंभ

वर्धिनीने निश्चित केलेल्या गुणवत्तेच्या निकषांमध्ये उतरलेल्या विद्यार्थी व युवक-युवती कार्यकर्त्यांना शाबासकी देण्याचा हा कार्यक्रम. या वर्षी ३० जून रोजी झालेल्या या कार्यक्रमात ८५ जणांचा गौरव करण्यात आला. मोहनराव ठोंबरे (विभागीय उपायुक्त) हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने त्यांनी केलेल्या मार्गदर्शनाचा हा सारांश -



'वटवृक्षाचे बीज कधी मातीत पडते, कधी खडकावर. या बीजाला अंकूर फुटून त्यातून वटवृक्ष होण्याची अपेक्षा असते. खडकावर पडलेल्या बीजाला असंख्य अडीअडचणींवर मात करून मोठे व्हायचे असते आणि त्याच वेळेला भरपूर पाण्याजवळ फोफावणाऱ्या वटवृक्षाशी स्पर्धाही करायची असते.

माणसांच्याही बाबतीत असेच असते. परमेश्वराने क्षमता दिल्याच आहेत. उभे रहाताना कोणाला संघर्ष करावा लागतो, पण ज्याच्या मनात उभे रहाण्याची जिद्द असते असा माणूस संघर्ष करून उभाही राहतो व अनुकूलतेत वाढणाऱ्यांशी स्पर्धाही करतो.

राष्ट्र म्हणजे नदीनाले, डोंगरपर्वत नाहीत; तर जेथे एकात्मतेच्या भावनेने माणसांचे आत्मे जोडले जातात त्याला राष्ट्र म्हणतात. कोणत्याही देशाच्या/राष्ट्राच्या विकासात त्या देशातील सुसंस्कारित समाज महत्वाची भूमिका बजावतो. सुसंस्कारित समाज कोणता? ज्या समाजात वंचित, होतकरू व्यक्तीला, घटकाला, पुढे येण्यासाठी सहकार्य दिले जाते, अशा समाजबांधवाच्या विकासाकडे लक्ष दिले जाते, अशा समाजाला संस्कारित समाज असे म्हणतात.

या पार्श्वभूमीवर आमच्या देशाची समाजाची स्थिती काय आहे? स्वातंत्र्य मिळून ५३ वर्षानंतरही देशातील ७०% समाज निरक्षर, ५०% लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली. या पार्श्वभूमीवर आपली जबाबदारी मोठी आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी **सुरेन्द्रशेट गाडवे (काका हलवाई स्वीट सेंटर, टिळकरोड, पुणे)** यांनी या कौतुक सोहळ्याच्या प्रसंगी मुलासाठी पेढे दिले.

*With Best Compliments From :*

**ADEPT FLUIDYNE PVT. LTD.,**

Plot No. 4, S. No. 17/1 – B, Kothrud Industrial Estate,
Kothrud, Pune - 411 038 Phone : 5431474, 5441124, 5464551

**भगिनी निवेदिता** - लेखन व भाषणांच्या द्वारे हिंदूधर्माची श्रेष्ठता ठामपणे मांडली. दीनदुबळयांची मनःपूर्वक सेवा केली. सशस्त्र क्रांतिकारकांना प्रेरक मार्गदर्शन करून स्वातंत्र्यचळवळीत सहभाग घेतला.

## संक्रांत उत्सव

ज्येष्ठ शिक्षणतज्ञ डॉ. प्र. ल. गावडे यांच्या अध्यक्षतेखाली या वर्षीचा संक्रांत उत्सव झाला. २० जानेवारी रोजी झालेल्या या उत्सवात मुलांचा शाखाविभाग, मुलींचा शाखाविभाग व महिला विभागाने रंगमंचावरील प्रात्याक्षिके सादर केली. बुध्दवंदनेने कार्यक्रमाला सुरूवात झाली. रंगमंचावरील प्रात्यक्षिकात शिवछत्रपतींच्या जीवनावरील, तसेच स्वदेशी भावना जागविणारे दोन पोवाडे, भारतमातेचा जोगवा, टिळक युगाची आठवण करून देणारा (गणेश) मेळा, घुंगरूकाठीवरील नृत्य, पौराणिक प्रसंग राष्ट्रीय नेत्यांच्या ओजस्वी विचारांचे स्मरण करून देणारी नाटुकली व नवरसांचे दर्शन घडविणारे नृत्य सादर करण्यात आले.

याच उत्सवापासून संस्थेने एका कर्तृत्ववान महिलेचा सन्मान करण्याच्या हेतूने 'शिवनिर्मल' पुरस्कार प्रदान करायला सुरूवात केली. या प्रथम पुरस्काराच्या मानकरी होत्या, डॉ. सौ. कल्पना जोशी. जागतिक स्पर्धेच्या या काळात त्यांना काही अमेरिकन पेटंटस् मिळाली असून त्यांची ७-८ नवीन संशोधने पेटंट मिळण्याच्या प्रतिक्षेत आहेत. स्मृतीचिन्ह व ३००० रूपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या पुरस्कारासाठी ज्यांनी वर्धिनीला एक मोठी देणगी दिली आहे, त्या श्रीमती निर्मला वैद्य या कार्यक्रमाला उपस्थित होत्या.

बालवाडी व बालशाखा विभागाचा संक्रांत उत्सव गुरूवार दि. २४ जानेवारी रोजी झाला. अत्यंत देखण्या अशा अभिनय गीतांनी सर्व बालचमुंनी उपस्थितांची मने जिंकली.

## डॉ. आंबेडकर जयंती

शोषणमुक्त समाजासाठी शेवटच्या श्वासापर्यंत ज्यांनी काम केले, अशा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन समाजाची सेवा करण्याची प्रेरणा देते. डॉ. आंबेडकरांच्या स्मृतीला अभिवादन म्हणून वर्धिनीमध्ये दरवर्षी त्यांच्या जयंतीला रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते. या वर्षी झालेल्या रक्तदान शिबिरात ११० बाटल्या रक्त संकलित झाले.

याच दिवशी डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी पुणे स्टेशनच्या परिसरात लाखो लोक येतात. रणरणत्या उन्हातही प्रचंड संख्येने नागरिक येतात. या सर्वांना पाणी देण्यासाठी पूर्ण दिवसभर पाणपोयी चालविली जाते. या कार्यक्रमाची मुख्य जबाबदारी 'आजोळ' विभागाकडे आहे. या वर्षी पाणपोयीचे उद्घाटन सरस्वती मंदिर महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. रमेश अवलगावकर यांच्या हस्ते झाले. दिवसभरात सुमारे ३५०० नागरिकांनी पाणपोयीचा लाभ घेतला.

**समर्थ श्री रामदास** - प्रपंच व परमार्थ याचा समन्वय साधण्याची शिकवण दिली. 'यत्न तो देव जाणावा' हा संस्कार त्यांनी समाजावर केला. प्रयत्न व प्रत्यक्ष प्रचीती यावर त्यांनी भर दिला.





## गुणगौरव समारंभ

वर्धिनीने निश्चित केलेल्या गुणवत्तेच्या निकषांमध्ये उतरलेल्या विद्यार्थी व युवक-युवती कार्यकर्त्यांना शाबासकी देण्याचा हा कार्यक्रम. या वर्षी ३० जून रोजी झालेल्या या कार्यक्रमात ८५ जणांचा गौरव करण्यात आला. मोहनराव ठोंबरे (विभागीय उपायुक्त) हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने त्यांनी केलेल्या मार्गदर्शनाचा हा सारांश -



'वटवृक्षाचे बीज कधी मातीत पडते, कधी खडकावर. या बीजाला अंकूर फुटून त्यातून वटवृक्ष होण्याची अपेक्षा असते. खडकावर पडलेल्या बीजाला असंख्य अडीअडचणींवर मात करून मोठे व्हायचे असते आणि त्याच वेळेला भरपूर पाण्याजवळ फोफावणाऱ्या वटवृक्षाशी स्पर्धाही करायची असते. माणसांच्याही बाबतीत असेच असते. परमेश्वराने क्षमता दिल्याच आहेत. उभे रहाताना कोणाला संघर्ष करावा लागतो, पण ज्याच्या मनात उभे रहाण्याची जिद्द असते असा माणूस संघर्ष करून उभाही राहतो व अनुकूलतेत वाढणाऱ्यांशी स्पर्धाही करतो.

राष्ट्र म्हणजे नदीनाले, डोंगरपर्वत नाहीत; तर जेथे एकात्मतेच्या भावनेने माणसांचे आत्मे जोडले जातात त्याला राष्ट्र म्हणतात. कोणत्याही देशाच्या/राष्ट्राच्या विकासात त्या देशातील सुसंस्कारित समाज महत्वाची भूमिका बजावतो. सुसंस्कारित समाज कोणता? ज्या समाजात वंचित, होतकरू व्यक्तीला, घटकाला, पुढे येण्यासाठी सहकार्य दिले जाते, अशा समाजबांधवाच्या विकासाकडे लक्ष दिले जाते, अशा समाजाला संस्कारित समाज असे म्हणतात.

या पार्श्वभूमीवर आमच्या देशाची समाजाची स्थिती काय आहे? स्वातंत्र्य मिळून ५३ वर्षानंतरही देशातील ७०% समाज निरक्षर, ५०% लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली. या पार्श्वभूमींवर आपली जबाबदारी मोठी आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी **सुरेन्द्रशेट गाडवे (काका हलवाई स्वीट सेंटर, टिळकरोड, पुणे)** यांनी या कौतुक सोहळ्याच्या प्रसंगी मुलासाठी पेढे दिले.


**With Best Compliments From :**

**ADEPT FLUIDYNE PVT. LTD.,**

**Plot No. 4, S. No. 17/1 – B, Kothrud Industrial Estate, Kothrud, Pune - 411 038 Phone : 5431474, 5441124, 5464551**


**भगिनी निवेदिता** - लेखन व भाषणांच्या द्वारे हिंदूधर्माची श्रेष्ठता ठामपणे मांडली. दीनदुबळयांची मनःपूर्वक सेवा केली. सशस्त्र क्रांतिकारकांना प्रेरक मार्गदर्शन करून स्वातंत्र्यचळवळीत सहभाग घेतला.

## विकसता विकसता विकसावे

'स्व'-रूपवर्धिनीचे काम सुरू होऊन २३ वर्षे पूर्ण झाली. वर्धिनीमध्ये विद्यार्थी म्हणून आलेल्यांची ४थी ५वी फळी आज प्रमुख कार्यकर्ते म्हणून काम करीत आहे. वर्धिनीच्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने अधिकाधिक जणांनी यावे असा प्रयत्न या निमित्ताने झाला. सुमारे २४० युवक-युवती कार्यकर्ते कार्यक्रमाला उपस्थित होते.

१९८३ला वर्धिनीची पहिली तुकडी युवकगटात आली. १९८३ ते २००२ या कालावधीमधील युवक-युवतींची चार गटात विभागणी करून गटचर्चेने कार्यक्रमाचे पहिले सत्र सुरू झाले. त्या त्या वयोगटापुढे असलेले शैक्षणिक प्रयत्न, व्यावहारिक जीवन, आजच्या जीवनकलहात होणारी दोलायमान परिस्थिती व वर्धिनीचे संस्कार अशा विषयांवर मोकळेपणाने गप्पा या चर्चेच्या निमित्ताने झाल्या. अनेकजण बऱ्याच कालावधीनंतर पहिल्यांदा एकत्र भेटत होते. त्या भेटीचा आनंद सर्वांच्या चेहऱ्यावर दिसत होता. महिला विभागाच्या कार्यकर्त्याही एका स्वतंत्र गटात होत्या. वर्धिनी-संपर्काचा आपल्या व्यक्तिगत जीवनात काय उपयोग झाला, याचे अनुभव महिलांनी या निमित्ताने सर्वांसमोर मांडले.

या आनंद सोहळ्याचा समारोप संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. राजाभाऊ लवळेकर यांच्या मार्गदर्शनाने झाला. 'प्रतिकूल परिस्थितीतही उभ्या रहाणाऱ्या वडाच्या झाडाप्रमाणे आपल्यातही विजिगिषू वृत्ती आहे म्हणूनच नानाप्रकारच्या अडीअडचणींवर मात करून वर्धिनीचे काम उभे राहिले आहे; वाढले आहे. "दीप कैसा हो, कहीं हो, सूर्यका अवतार है वह" या कवितेचा आधार देत, 'बाहेर कितीही अंधार असला तरी वर्धिनीच्या माध्यमातून प्रज्वलित झालेले हे दिवे समाजातील अंधार काही प्रमाणात का होईना कमी करण्याच्या क्षमतेचे आहेत' असे प्रतिपादन त्यांनी केले.

## स्वातंत्र्यदिन सोहळा

'स्वामी विवेकानंद' शाखेने या वर्षी १५ ऑगस्ट रोजी एक वक्तृत्वस्पर्धा आयोजित केली होती. निमित्त होते - 'स्वामी विवेकानंदांचे स्मृतीशताब्दी वर्ष' ही वक्तृत्वस्पर्धा मुलांच्या सहा शाखांसाठी दोन टप्प्यांत पार पडली. स्पर्धेचे विषयही स्वामी विवेकानंदांशी निगडीतच होते. स्पर्धेची पहिली फेरी ४ ऑगस्टच्या रविवारी शाखाशः घेण्यात आली. या फेरीमध्ये प्रत्येक शाखेतून अंतिम स्पर्धेसाठी प्रत्येकी दोन स्पर्धक निवडण्यात आले, तरी प्रेक्षकांसमोर येऊन बोलण्याची तयारी अनेकांची झाली.

स्पर्धेची दुसरी फेरी ११ऑगस्टला 'स्व'-रूपवर्धिनीच्या इमारतीत पार पडली. प्रत्येक शाखेतून दोनच स्पर्धक असल्याने जिंकण्याची ईर्षा प्रत्येक वर्धकामध्ये जाणवत होती. विशेषतः लहान गटाचा उत्साह जाणवण्याजोगा होता. या फेरीत, अंतिम दोन विजेत्यांची निवड करण्यात आली. पण स्पर्धेचे उद्दीष्ट मात्र येथेच संपले नाही. या विजेत्यांना १५ ऑगस्टच्या कार्यक्रमात

**बिरसा मुंडा** - जंगलात रहाणाऱ्या व जगणाऱ्या वनवासी बांधवांचा हा मूलभूत हक्क हिरावून घेणाऱ्या ब्रिटिश सरकारविरूध्द व त्यांना साथ देणाऱ्या चर्चेस विरूध्द वनवासी बांधवांना संघटीत केले व शेवटच्या श्वासापर्यंत संघर्ष केला.





बक्षिसे तर दिलीच, पण प्रथम क्रमांकाच्या विजेत्यांनी त्यांचे वक्तृत्व कौशल्य मुख्य कार्यक्रमातही सादर केले.

स्वामी विवेकानंदांचे स्फूर्तिदायी चरित्र गीतांच्या माध्यमातून मांडण्यासाठी सौ. उषाताई कुलकर्णी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. स्वरचित गीतांना त्यांनी बांधलेल्या चाली तर मोहक होत्याच परंतु, इतक्या ताकदीने त्यांनी त्यातील भाव व्यक्त केले की, खरोखरीच ही गीते संपूच नये असे सर्वांना वाटत होते. 'परतुनी या स्वामीजी' या शेवटच्या गीतातील आर्तता देशाच्या सध्याच्या परिस्थितीचा विचार करताना इतकी परिणामकारक वाटत होती की, खरोखरीच आजच्या घडीला स्वामीजी परत या भूमीवर यावेत, असे सर्वांना जाणवत होते.

## सार्वजनिक गणेशोत्सव



'स्व'-रूपवर्धिनी सुरू झाल्यापासून जवळपास सुरूवातीपासून सार्वजनिक गणेशोत्सवात वर्धिनीचा सहभाग आहेच. हा सहभाग प्रामुख्याने 'विसर्जन मिरवणुकीत वर्धक-वर्धिकांची आकर्षक खेळ सादर करणारी पथके' या माध्यामातून असतो. या वर्षीही अशी पथके या वर्षीच्या उत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे वर्धिनीचे एक पथक गुजरातमधील सिल्वासा येथे विसर्जन मिरवणुकीसाठी गेल होते व एक पथक पुण्याजवळील औंध येथे तेथील मंडळाच्या निमंत्रणावरून गेले होते. याचबरोबर उत्सवाच्या काळात अन्य अनेक उपक्रम शाखापातळीवर घेतले गेले. त्यामध्ये स्वदेशीचा पोवाडा, छत्रपतींच्या जीवनावरील पोवाडा सादर करणारे कार्यक्रम झाले. युवती आणि वर्धिकांनी स्त्री सबलीकरणाच्या विषयावरील पथनाट्ये काही मंडळांसमोर सादर केली, तर मुलांच्या दोन शाखांनी 'जागृती' हे पथनाट्य सादर केले. स्वामी विवेकानंदांच्या स्मृतिवर्षाच्या निमित्ताने १० रंगीत पोस्टर्सचे संच विक्री करण्याचा उपक्रमही घेतला गेला. काही गणेश मंडळांनी या पोस्टर्सचा उपयोग परिसराच्या सुशोभनासाठी, तसेच विसर्जन मिरवणुकीतही मिरवणूकरथाच्या सजावटीसाठी केला. सुमारे ६० गणेशोत्सव मंडळांचे सर्वेक्षण युवतीगटाने केले. सार्वजनिक उत्सवांकडे पहाण्याचा मंडळांचा दृष्टीकोन समजावून घेणे, या उत्सवाला सामाजिक समरसतेचा स्पर्श कसा दिला जातो, निर्माण होणाऱ्या प्रदुषणांबाबत मंडळे किती जागरूक आहेत, हे जाणून घेणे हा या सर्वेक्षणामागचा मुख्य उद्देश होता.



**स्वामी विवेकानंद** - धर्माच्या नावाखाली समाजात रूढ झालेल्या अनेक 'दांभिक रूढींविरूध्द कठोर प्रहार केले. 'जीवसेवा हीच शिवसेवा' हा संस्कार केला. 'उठा, जागे व्हा आणि कार्यसिध्दी शिवाय थांबू नका' हा कर्मयोग जागृत केला.

## विकसता विकसता विकसावे

'स्व'-रूपवर्धिनीचे काम सुरू होऊन २३ वर्षे पूर्ण झाली. वर्धिनीमध्ये विद्यार्थी म्हणून आलेल्यांची ४थी ५वी फळी आज प्रमुख कार्यकर्ते म्हणून काम करीत आहे. वर्धिनीच्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने अधिकाधिक जणांनी यावे असा प्रयत्न या निमित्ताने झाला. सुमारे २४० युवक-युवती कार्यकर्ते कार्यक्रमाला उपस्थित होते.

१९८३ला वर्धिनीची पहिली तुकडी युवकगटात आली. १९८३ ते २००२ या कालावधीमधील युवक-युवतींची चार गटात विभागणी करून गटचर्चेने कार्यक्रमाचे पहिले सत्र सुरू झाले. त्या त्या वयोगटापुढे असलेले शैक्षणिक प्रयत्न, व्यावहारिक जीवन, आजच्या जीवनकलहात होणारी दोलायमान परिस्थिती व वर्धिनीचे संस्कार अशा विषयांवर मोकळेपणाने गप्पा या चर्चेच्या निमित्ताने झाल्या. अनेकजण बऱ्याच कालावधीनंतर पहिल्यांदा एकत्र भेटत होते. त्या भेटीचा आनंद सर्वांच्या चेहऱ्यावर दिसत होता. महिला विभागाच्या कार्यकर्त्याही एका स्वतंत्र गटात होत्या. वर्धिनी-संपर्काचा आपल्या व्यक्तिगत जीवनात काय उपयोग झाला, याचे अनुभव महिलांनी या निमित्ताने सर्वांसमोर मांडले.

या आनंद सोहळ्याचा समारोप संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. राजाभाऊ लवळेकर यांच्या मार्गदर्शनाने झाला. 'प्रतिकूल परिस्थितीतही उभ्या रहाणाऱ्या वडाच्या झाडाप्रमाणे आपल्यातही विजिगिषू वृत्ती आहे म्हणूनच नानाप्रकारच्या अडीअडचणींवर मात करून वर्धिनीचे काम उभे राहिले आहे; वाढले आहे. "दीप कैसा हो, कहीं हो, सूर्यका अवतार है वह" या कवितेचा आधार देत, 'बाहेर कितीही अंधार असला तरी वर्धिनीच्या माध्यमातून प्रज्वलित झालेले हे दिवे समाजातील अंधार काही प्रमाणात का होईना कमी करण्याच्या क्षमतेचे आहेत' असे प्रतिपादन त्यांनी केले.

## स्वातंत्र्यदिन सोहळा

'स्वामी विवेकानंद' शाखेने या वर्षी १५ ऑगस्ट रोजी एक वक्तृत्वस्पर्धा आयोजित केली होती. निमित्त होते - 'स्वामी विवेकानंदांचे स्मृतीशताब्दी वर्ष' ही वक्तृत्वस्पर्धा मुलांच्या सहा शाखांसाठी दोन टप्प्यांत पार पडली. स्पर्धेचे विषयही स्वामी विवेकानंदांशी निगडीतच होते. स्पर्धेची पहिली फेरी ४ ऑगस्टच्या रविवारी शाखाशः घेण्यात आली. या फेरीमध्ये प्रत्येक शाखेतून अंतिम स्पर्धेसाठी प्रत्येकी दोन स्पर्धक निवडण्यात आले, तरी प्रेक्षकांसमोर येऊन बोलण्याची तयारी अनेकांची झाली.

स्पर्धेची दुसरी फेरी ११ऑगस्टला 'स्व'-रूपवर्धिनीच्या इमारतीत पार पडली. प्रत्येक शाखेतून दोनच स्पर्धक असल्याने जिंकण्याची ईर्षा प्रत्येक वर्धकामध्ये जाणवत होती. विशेषतः लहान गटाचा उत्साह जाणवण्याजोगा होता. या फेरीत, अंतिम दोन विजेत्यांची निवड करण्यात आली. पण स्पर्धेचे उद्दीष्ट मात्र येथेच संपले नाही. या विजेत्यांना १५ ऑगस्टच्या कार्यक्रमात

**बिरसा मुंडा** - जंगलात रहाणाऱ्या व जगणाऱ्या वनवासी बांधवांचा हा मूलभूत हक्क हिरावून घेणाऱ्या ब्रिटिश सरकारविरूध्द व त्यांना साथ देणाऱ्या चर्चेस विरूध्द वनवासी बांधवांना संघटीत केले व शेवटच्या श्वासापर्यंत संघर्ष केला.





बक्षिसे तर दिलीच, पण प्रथम क्रमांकाच्या विजेत्यांनी त्यांचे वक्तृत्व कौशल्य मुख्य कार्यक्रमातही सादर केले.

स्वामी विवेकानंदांचे स्फूर्तिदायी चरित्र गीतांच्या माध्यमातून मांडण्यासाठी सौ. उषाताई कुलकर्णी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. स्वरचित गीतांना त्यांनी बांधलेल्या चाली तर मोहक होत्याच परंतु, इतक्या ताकदीने त्यांनी त्यातील भाव व्यक्त केले की, खरोखरीच ही गीते संपूच नये असे सर्वांना वाटत होते. 'परतुनी या स्वामीजी' या शेवटच्या गीतातील आर्तता देशाच्या सध्याच्या परिस्थितीचा विचार करताना इतकी परिणामकारक वाटत होती की, खरोखरीच आजच्या घडीला स्वामीजी परत या भूमीवर यावेत, असे सर्वांना जाणवत होते.

## सार्वजनिक गणेशोत्सव



'स्व'-रूपवर्धिनी सुरू झाल्यापासून जवळपास सुरूवातीपासून सार्वजनिक गणेशोत्सवात वर्धिनीचा सहभाग आहेच. हा सहभाग प्रामुख्याने 'विसर्जन मिरवणुकीत वर्धक-वर्धिकांची आकर्षक खेळ सादर करणारी पथके' या माध्यमातून असतो. या वर्षीही अशी पथके या वर्षीच्या उत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे वर्धिनीचे एक पथक गुजरातमधील सिल्वासा येथे विसर्जन मिरवणुकीसाठी गेल होते व एक पथक पुण्याजवळील औंध येथे तेथील मंडळाच्या निमंत्रणावरून गेले होते. याचबरोबर उत्सवाच्या काळात अन्य अनेक उपक्रम शाखापातळीवर घेतले गेले. त्यामध्ये स्वदेशीचा पोवाडा, छत्रपतींच्या जीवनावरील पोवाडा सादर करणारे कार्यक्रम झाले. युवती आणि वर्धिकांनी स्त्री सबलीकरणाच्या विषयावरील पथनाट्ये काही मंडळांसमोर सादर केली, तर मुलांच्या दोन शाखांनी 'जागृती' हे पथनाट्य सादर केले. स्वामी विवेकानंदांच्या स्मृतिवर्षाच्या निमित्ताने १० रंगीत पोस्टर्सचे संच विक्री करण्याचा उपक्रमही घेतला गेला. काही गणेश मंडळांनी या पोस्टर्सचा उपयोग परिसराच्या सुशोभनासाठी, तसेच विसर्जन मिरवणुकीतही मिरवणूकरथाच्या सजावटीसाठी केला. सुमारे ६० गणेशोत्सव मंडळांचे सर्वेक्षण युवतीगटाने केले. सार्वजनिक उत्सवांकडे पहाण्याचा मंडळांचा दृष्टीकोन समजावून घेणे, या उत्सवाला सामाजिक समरसतेचा स्पर्श कसा दिला जातो, निर्माण होणाऱ्या प्रदुषणांबाबत मंडळे किती जागरूक आहेत, हे जाणून घेणे हा या सर्वेक्षणामागचा मुख्य उद्देश होता.



**स्वामी विवेकानंद** - धर्माच्या नावाखाली समाजात रूढ झालेल्या अनेक 'दांभिक रूढींविरूध्द कठोर प्रहार केले. 'जीवसेवा हीच शिवसेवा' हा संस्कार केला. 'उठा, जागे व्हा आणि कार्यसिध्दी शिवाय थांबू नका' हा कर्मयोग जागृत केला.

## उद्योजकता प्रशिक्षण शिबिर

शिक्षण झाले आहे, नोकरी मिळालीय पण अनिश्चिततेची टांगती तलवार सतत डोक्यावर आहे, शिक्षणच झाले नाही म्हणून बेकार .... अशा बेकारीच्या करूण कहाण्या देशाच्या कानाकोपऱ्यात ऐकू येतात. या समस्येतून बाहेर पडण्यासाठी, यशस्वी होण्यासाठी जे मार्ग आहेत त्यामध्ये, छोटे छोटे स्वयंरोजगार निर्माण करणे व असे उद्योग करण्यासाठी तरूण पिढीला प्रवृत्त करणे याची आवश्यकता आहे.

या हेतूने १ सप्टेंबर रोजी पूर्ण दिवसाचे एक शिबिर वर्धिनीच्या इमारतीत झाले. या शिबिराला २५ युवक उपस्थित होते. श्री. रवींद्र देसाई, जनशिक्षण संस्थेचे श्री. कांबळे, लघुउद्योजक विभागाचे श्री. पाठक, उद्योजक श्री. अविनाश कुलकर्णी, तसेच निवृत्त ग्रुप कॅप्टन श्री. दीपक आपटे यांचे मार्गदर्शन लाभले. या शिबिरानंतर उद्योग सुरू करण्यासाठी पाठपुरावा करण्याचे काम सुरू झाले असून दोघांना त्यांचे प्रकल्प अर्थपुरवठा करणाऱ्या संस्थांना सादर करण्यासाठीचे सहाय्य करण्यात आले आहे. ☆ ☆ ☆

## व्यवस्थाप्रमुखांचा अभ्यासवर्ग

शाखा विभागातील व्यवस्थाप्रमुखांचा अभ्यासवर्ग दि. २३ व २४ नोव्हेंबर रोजी शिवापूरजवळील वर्वे येथील श्री भाऊराव ताथवडेकर यांच्या निवासात झाला. डोंगराच्या कुशीत, थंडी-उन्हाचा खेळ खेळणारे, शहरी गोंगाटापासून दूर-शांत असे हे स्थान वर्गासाठी आल्हाददायक वातावरण-निर्मिती करणारे ठरले. या अभ्यासवर्गात कोणतेही औपचारिक सत्र नव्हते. रात्री श्री. सच्चिदानंद शेवडे यांची 'काश्मीर : काल, आज, व उद्या' या विषयावरील ध्वनीफीत सर्वांनी ऐकली. गेल्या कैक शतकांपासून कल्पनातीत दुःसह्य परिस्थितीतून काश्मीरची वाटचाल चालू आहे याचे चित्र डोळयासमोर उभे राहिले. भारताचा अविभाज्य भाग असलेल्या काश्मीरला पुन्हा राष्ट्रीय प्रवाहात आणून त्याच्या उन्नतीसाठी काय काय करायला हवे यावर गटचर्चा झाली.



रविवारी सकाळी उपासना, खेळ झाल्यावर वाचनसत्रास प्रारंभ झाला. राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या अग्निपंख व प्रज्वलित मने या पुस्तकांवर सविस्तर चर्चा झाली. त्यानंतर वार्षिक कार्यवृत्त लेखन दुपारच्या सत्रापर्यंत चालू होते. भोजनोत्तर एक तास खूपच रंगला. नंतरच्या सत्रात प्रत्येकाने गतसहामाहीतील वैयक्तिक कारकिर्दीचा आढावा आत्मनिवेदन स्वरूपात मांडला. त्यानंतरच्या कालांशात पुढील सहा महिन्यांचे शाखांचे नियोजन आखण्यात आले. वर्गाच्या समारोप सत्रात श्री शिरीष पटवर्धन यांनी कार्यकर्त्यांनी स्वतःच्या विकासासंदर्भात करावयाच्या प्रयत्नांबाबत प्रबोधन केले.

**स्वातंत्र्यवीर सावरकर** - सशस्त्र क्रांतीमार्गाने ब्रिटिशांची झोप उडवली. तरूणांना स्वातंत्र्यासाठी प्रेरीत केले. रत्नागिरीच्या बंदीवासात सामाजिक समरसतेचे अद्वितीय कार्य. पतितपावन मंदिराची स्थापना.





## विज्ञान दिन प्रकल्प स्पर्धा

विज्ञान दिनाच्या निमित्ताने ही स्पर्धा घेतली जाते. शाखांतर्गत प्रकल्प स्पर्धेचे हे दुसरे वर्ष. याच्या संयोजनाची जबाबदारी आहे रामकृष्ण शाखेवर. यावर्षी स्पर्धेमध्ये ४५ प्रकल्प मांडले गेले होते. वर्धक - वर्धिका आपापल्या प्रकल्पाची तयारी करण्यात रंगून गेले होते. युवक-युवतींचे आवश्यक तेव्हा साहाय्य घेऊन प्रकल्प उत्तमरीत्या मांडता येईल याची काळजी घेत होते. या प्रकल्पांचे परीक्षण करण्यासाठी विज्ञान भारतीचे कार्यकर्ते डॉ. वसंत पुणतांबेकर, डॉ. प्रभाकर कुंटे, व डॉ. मधुकर पानसे हे उपस्थित होते. परीक्षक प्रकल्प पाहायला आल्यावर प्रकल्पाची माहिती सांगणाऱ्या गटाने केलेली धडपड त्यांच्या वर्णनापेक्षा त्यांच्या चेहऱ्यावरून जास्त जाणवत होती. परीक्षकाच्या एखाद्या अडचणीत टाकणाऱ्या प्रश्नाचे उत्तर देता आले नाही, तर वाटणारी अस्वस्थताही चेहऱ्यावर लगेच उमटत होती. परीक्षणानंतर तितक्याच उत्कंठापूर्ण वातावरणात शास्त्रीय प्रश्नांवर आधारीत प्रश्नमंजुषेचा व बक्षिसवितरणाचा कार्यक्रम झाला.

## रक्षाबंधन



वर्धिनीच्या काही शाखांवर प्रजापिता ब्रह्मकुमारी संस्थेचे कार्यकर्ते रक्षाबंधन कार्यक्रमासाठी आले होते. सणाचे सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्व त्यांनी मुलांना सांगितले. या सणाच्या निमित्ताने समाजातील विविध व्यक्ती, संस्थांना भेटी द्यायला वर्धिनीचे वर्धक-वर्धिका - कार्यकर्ते दरवर्षी जातात. रुग्णालये, अत्यंत गरीब वस्त्यांमधून राहणारे लोक, सुरक्षेची, वाहतुकीच्या नियंत्रकांची जबाबदारी सांभाळणारे पोलीस अशा अनेकांना राखी बांधण्याच्या निमित्ताने त्यांच्याशी होणाऱ्या गप्पांमधून - संवादातून वर्धकांना अनेक सुखद धक्केही बसतात. तसेच अंतर्मुख व्हायला लागणारे प्रसंगही अनुभवायला मिळतात. काही भेटीच्या वेळी होणाऱ्या संवादातून अस्वस्थताही निर्माण होते. याच कार्यवृत्तामध्ये रिमांडहोम भेटीवरचे सविस्तर वृत्त लेख स्वरुपात दिले आहे. अशीच अस्वस्थता वर्धकांना अनुभवायला मिळाली मुठा नदीच्या काठावर झोपड्यांमध्ये राहणाऱ्या लोकांना भेटल्यावर. वर्धक जेव्हा राखी बांधायला या झोपड्यांमधून गेले तेव्हा त्यांना दिसले की, झोपडीत फक्त एक घोंगडी, एक स्टोव्ह व मोजकीच भांडी आहेत. हे दृश्य जवळपास प्रत्येक झोपडीत होते. राखी बांधून बाहेर आल्यावर वर्धक काही बोलायच्या मनस्थितीतच नव्हते. या वर्षी शाखा विभागाने वेगवेगळया भागातील गरीब वस्त्या, रुग्णालये स्थानिक नगरसेवक, पूर्वी शाखेत येऊन गेलेले विद्यार्थी अशा ठिकाणीही जाऊन राख्या बांधल्या. बंधुत्वाचा धागा आणखी घट्ट करण्याचा प्रयत्न केला. या भेटींमध्ये पोलीस चौक्यांमध्ये जाऊन पोलीसांनाही राख्या बांधल्या. राखी बांधायला गेले होते सहावीमधील वर्धक. राखी बांधण्यामागची भावना मुलांनी त्यांच्या शब्दात सांगितली. पोलीसांनी या मुलांना विचारले तुम्हाला पोलीस चौकीत येताना भीती नाही का वाटली? मुले म्हणाली आम्ही वर्धिनीच्या शाखेत जातो आणि मग त्यांच्या शब्दात त्यांनी पोलीसांना वर्धिनीच्या कामाची माहिती सांगितली.

**डॉ. आंबेडकर** - दीनदलित समाजावर होणाऱ्या अन्यायाविरूध्द, समतेला बाधा करणाऱ्या उत्पन्न करणाऱ्या धर्मातील रूढींविरूध्द प्रखर संघर्ष केला. पददलित समाजाला संघटीत केले. 'उठा, शिका आणि संघर्ष करा' हे ब्रीदवाक्य पददलित समाजामध्ये रूजवले.

## उद्योजकता प्रशिक्षण शिबिर

शिक्षण झाले आहे, नोकरी मिळालीय पण अनिश्चिततेची टांगती तलवार सतत डोक्यावर आहे, शिक्षणच झाले नाही म्हणून बेकार .... अशा बेकारीच्या करूण कहाण्या देशाच्या कानाकोपऱ्यात ऐकू येतात. या समस्येतून बाहेर पडण्यासाठी, यशस्वी होण्यासाठी जे मार्ग आहेत त्यामध्ये, छोटे छोटे स्वयंरोजगार निर्माण करणे व असे उद्योग करण्यासाठी तरूण पिढीला प्रवृत्त करणे याची आवश्यकता आहे.

या हेतूने १ सप्टेंबर रोजी पूर्ण दिवसाचे एक शिबिर वर्धिनीच्या इमारतीत झाले. या शिबिराला २५ युवक उपस्थित होते. श्री. रवींद्र देसाई, जनशिक्षण संस्थेचे श्री. कांबळे, लघुउद्योजक विभागाचे श्री. पाठक, उद्योजक श्री. अविनाश कुलकर्णी, तसेच निवृत्त ग्रुप कॅप्टन श्री. दीपक आपटे यांचे मार्गदर्शन लाभले. या शिबिरानंतर उद्योग सुरू करण्यासाठी पाठपुरावा करण्याचे काम सुरू झाले असून दोघांना त्यांचे प्रकल्प अर्थपुरवठा करणाऱ्या संस्थांना सादर करण्यासाठीचे सहाय्य करण्यात आले आहे. ☆ ☆ ☆

## व्यवस्थाप्रमुखांचा अभ्यासवर्ग

शाखा विभागातील व्यवस्थाप्रमुखांचा अभ्यासवर्ग दि. २३ व २४ नोव्हेंबर रोजी शिवापूरजवळील वर्वे येथील श्री भाऊराव ताथवडेकर यांच्या निवासात झाला. डोंगराच्या कुशीत, थंडी-उन्हाचा खेळ खेळणारे, शहरी गोंगाटापासून दूर-शांत असे हे स्थान वर्गासाठी आल्हाददायक वातावरण-निर्मिती करणारे ठरले. या अभ्यासवर्गात कोणतेही औपचारिक सत्र नव्हते. रात्री श्री. सच्चिदानंद शेवडे यांची 'काश्मीर : काल, आज, व उद्या' या विषयावरील ध्वनीफीत सर्वांनी ऐकली. गेल्या कैक शतकांपासून कल्पनातीत दुःसह्य परिस्थितीतून काश्मीरची वाटचाल चालू आहे याचे चित्र डोळ्यासमोर उभे राहिले. भारताचा अविभाज्य भाग असलेल्या काश्मीरला पुन्हा राष्ट्रीय प्रवाहात आणून त्याच्या उन्नतीसाठी काय काय करायला हवे यावर गटचर्चा झाली.



रविवारी सकाळी उपासना, खेळ झाल्यावर वाचनसत्रास प्रारंभ झाला. राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या अग्निपंख व प्रज्वलित मने या पुस्तकांवर सविस्तर चर्चा झाली. त्यानंतर वार्षिक कार्यवृत्त लेखन दुपारच्या सत्रापर्यंत चालू होते. भोजनोत्तर एक तास खूपच रंगला. नंतरच्या सत्रात प्रत्येकाने गतसहामाहीतील वैयक्तिक कारकिर्दीचा आढावा आत्मनिवेदन स्वरूपात मांडला. त्यानंतरच्या कालांशात पुढील सहा महिन्यांचे शाखांचे नियोजन आखण्यात आले. वर्गाच्या समारोप सत्रात श्री शिरीष पटवर्धन यांनी कार्यकर्त्यांनी स्वतःच्या विकासासंदर्भात करावयाच्या प्रयत्नांबाबत प्रबोधन केले.

**स्वातंत्र्यवीर सावरकर** - सशस्त्र क्रांतीमार्गाने ब्रिटिशांची झोप उडवली. तरूणांना स्वातंत्र्यासाठी प्रेरीत केले. रत्नागिरीच्या वंदीवासात सामाजिक समरसतेचे अद्वितीय कार्य. पतितपावन मंदिराची स्थापना.





## विज्ञान दिन प्रकल्प स्पर्धा

विज्ञान दिनाच्या निमित्ताने ही स्पर्धा घेतली जाते. शाखांतर्गत प्रकल्प स्पर्धेचे हे दुसरे वर्ष. याच्या संयोजनाची जबाबदारी आहे रामकृष्ण शाखेवर. यावर्षी स्पर्धेमध्ये ४५ प्रकल्प मांडले गेले होते. वर्धक - वर्धिका आपापल्या प्रकल्पाची तयारी करण्यात रंगून गेले होते. युवक-युवतींचे आवश्यक तेव्हा साहाय्य घेऊन प्रकल्प उत्तमरीत्या मांडता येईल याची काळजी घेत होते. या प्रकल्पांचे परीक्षण करण्यासाठी विज्ञान भारतीचे कार्यकर्ते डॉ. वसंत पुणतांबेकर, डॉ. प्रभाकर कुंटे, व डॉ. मधुकर पानसे हे उपस्थित होते. परीक्षक प्रकल्प पाहायला आल्यावर प्रकल्पाची माहिती सांगणाऱ्या गटाने केलेली धडपड त्यांच्या वर्णनापेक्षा त्यांच्या चेहऱ्यावरून जास्त जाणवत होती. परीक्षकाच्या एखाद्या अडचणीत टाकणाऱ्या प्रश्नाचे उत्तर देता आले नाही, तर वाटणारी अस्वस्थताही चेहऱ्यावर लगेच उमटत होती. परीक्षणानंतर तितक्याच उत्कंठापूर्ण वातावरणात शास्त्रीय प्रश्नांवर आधारीत प्रश्नमंजुषेचा व बक्षिसवितरणाचा कार्यक्रम झाला.

## रक्षाबंधन



वर्धिनीच्या काही शाखांवर प्रजापिता ब्रह्मकुमारी संस्थेचे कार्यकर्ते रक्षाबंधन कार्यक्रमासाठी आले होते. सणाचे सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्व त्यांनी मुलांना सांगितले. या सणाच्या निमित्ताने समाजातील विविध व्यक्ती, संस्थांना भेटी द्यायला वर्धिनीचे वर्धक-वर्धिका - कार्यकर्ते दरवर्षी जातात. रुग्णालये, अत्यंत गरीब वस्त्यांमधून राहणारे लोक, सुरक्षेची, वाहतुकीच्या नियंत्रकांची जबाबदारी सांभाळणारे पोलीस अशा अनेकांना राखी बांधण्याच्या निमित्ताने त्यांच्याशी होणाऱ्या गप्पांमधून - संवादातून वर्धकांना अनेक सुखद धक्केही बसतात. तसेच अंतर्मुख व्हायला लागणारे प्रसंगही अनुभवायला मिळतात. काही भेटीच्या वेळी होणाऱ्या संवादातून अस्वस्थताही निर्माण होते. याच कार्यवृत्तामध्ये रिमांडहोम भेटीवरचे सविस्तर वृत्त लेख स्वरुपात दिले आहे. अशीच अस्वस्थता वर्धकांना अनुभवायला मिळाली मुठा नदीच्या काठावर झोपड्यांमध्ये राहणाऱ्या लोकांना भेटल्यावर. वर्धक जेव्हा राखी बांधायला या झोपड्यांमधून गेले तेव्हा त्यांना दिसले की, झोपडीत फक्त एक घोंगडी, एक स्टोव्ह व मोजकीच भांडी आहेत. हे दृश्य जवळपास प्रत्येक झोपडीत होते. राखी बांधून बाहेर आल्यावर वर्धक काही बोलायच्या मनस्थितीतच नव्हते. या वर्षी शाखा विभागाने वेगवेगळ्या भागातील गरीब वस्त्या, रुग्णालये स्थानिक नगरसेवक, पूर्वी शाखेत येऊन गेलेले विद्यार्थी अशा ठिकाणीही जाऊन राख्या बांधल्या. बंधुत्वाचा धागा आणखी घट्ट करण्याचा प्रयत्न केला. या भेटींमध्ये पोलीस चौक्यांमध्ये जाऊन पोलीसांनाही राख्या बांधल्या. राखी बांधायला गेले होते सहावीमधील वर्धक. राखी बांधण्यामागची भावना मुलांनी त्यांच्या शब्दात सांगितली. पोलीसांनी या मुलांना विचारले तुम्हाला पोलीस चौकीत येताना भीती नाही का वाटली? मुले म्हणाली आम्ही वर्धिनीच्या शाखेत जातो आणि मग त्यांच्या शब्दात त्यांनी पोलीसांना वर्धिनीच्या कामाची माहिती सांगितली.

**डॉ. आंबेडकर** - दीनदलित समाजावर होणाऱ्या अन्यायाविरूध्द, समतेला बाधा करणाऱ्या उत्पन्न करणाऱ्या धर्मातील रूढींविरूध्द प्रखर संघर्ष केला. पददलित समाजाला संघटीत केले. 'उठा, शिका आणि संघर्ष करा' हे ब्रीदवाक्य पददलित समाजामध्ये रूजवले.

## आषाढी एकादशी



ज्ञानेश्वर महाराजांची पालखी पुण्यात आली की, येणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या पुण्यातील मुक्कामामुळे वातावरण भक्तिमय होऊन जाते. महानगरपालिकेच्या, तसेच काही खाजगी शाळा/संस्थांच्या इमारतीमध्ये हे सर्व वारकरी मुक्कामाला असतात. वारकऱ्यांची अशीच एक दिंडी गोखलेनगरच्या म.न.पा. शाळेत उतरली होती. या शाळेत वर्धिनीची अभेदानंद शाखा भरते. शाळेत उतरलेल्या वारकऱ्यांशी संवाद साधण्याची संधी वर्धकांना मिळाली होती. वारकरीबांधवांच्या बरोबर बसून भजनाचा, नामस्मरणाचा आनंद मुलांना यानिमित्ताने घेता आला. याच शाखेतील एक युवक कार्यकर्त्याने काही अभंग म्हटले. त्याच्या या अभंगगायनाला वारकऱ्यांनी जोरदार दाद दिली. त्याला शाबासकी दिली. बालशाखेतील आणि पाकोळी बालवाडीतील बालांची एक मिरवणूक वर्धिनीपासून सोमवारातील विठ्ठल मंदिरापर्यंत निघाली होती. मुलींच्या भगिनी निवेदिता शाखेने आषाढी एकादशी निमित्त भक्तिगीत स्पर्धा आयोजित केली होती. प्रत्येक गटाने एक अभंग गायचा व तो साभिनय सादर करायचा अशी स्पर्धा होती. प्रत्येक गटाने ही स्पर्धा चुरशीचा सहभाग घेऊन रंगवली. तर वर्धिनीच्या इमारत विठ्ठल हरिनामाच्या जयजयकाराने दुमदुमून गेली होती. निमित्त होते. ह.भ.प. विजय अपामार्जिने यांच्या कीर्तनाचे.

### मातृभूमीची सेवा विसरून जगण्याचा नच हक्क मला

एम.बी.बी.एस. नंतर पदव्युत्तर शिक्षण घेत असतानाच स्पर्धा परीक्षेची तयारी करण्याचे मनात होते. बहिणीच्या आग्रहाने वर्धिनीच्या स्पर्धा परीक्षा केंद्रात दाखल झालो. तज्ज्ञांच्या शैक्षणिक मार्गदर्शनाबरोबरच येथील आपुलकीच्या वातावरणाने मला भारून टाकले. गणेशोत्सवाच्या काळात वर्धकांनी सादर केलेले गणेश मेळ्यासारखे कार्यक्रम मी बघितले. रंजनाबरोबरच सहजपणाने प्रबोधन करणारे हे कार्यक्रम माझ्यातील विधायक कार्यशक्तीला आवाहन करून गेले. मुंबईच्या श्री. मधुकर पाटणकर सर यांनी केवळ आमच्यासाठी पुण्याला येऊन घेतलेल्या व्यक्तिमत्व विकास वर्गाने व्यक्तिमत्त्व विकासाचे दालन माझ्यासाठी खऱ्या अर्थाने खुले झाले. वक्तशीरपणा, संवादकौशल्य, तणावमुक्ती व स्मृतीसंवर्धनाचे तंत्र अशा विषयांवरील प्रभावी मार्गदर्शनाबरोबरच संवेदनशीलतेच्या आधारे पाटणकर सरांनी माणुसकीचे तत्त्वच आम्हाला शिकविले. समाजाच्या ज्या अनमोल सहकार्यामुळे पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षणापर्यंतचा पल्ला मी गाठू शकलो. त्या समाजाच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी योग्य माध्यम वर्धिनीच्या रूपाने मला गवसले आहे. समाजसेवेचे, देशहिताचे जे विचारबीज मला वर्धिनीत मिळाले, ते माझ्या मूळ गावी पेरण्याचा माझा विचार आहे. वर्धिनीच्या कार्यात, कार्यप्रसारात खारीचे योगदान द्यायचा माझा संकल्प आहे.

**डॉ. सोमनाथ सलगर**

**डॉ. हेडगेवार** - पारतंत्र्याचे मूळ हिंदूसमाजाच्या असंघटीतपणात आहे हे ओळखून निद्रीस्त हिंदू समाजाला जागृत करण्याचे व संघटीत करण्याचे अशक्यप्राप्त वाटणारे कार्य यशस्वी केले.





## प्रकल्प कसे तयार करावे ?

*(वर्षभर विविध शैक्षणिक उपक्रम वर्धिनीच्या शाखांवर होत असतात. एखाद्या विषयासंबंधी प्रकल्प करण्यासाठी नेमका विचार कसा करावा याविषयी मार्गदर्शन करण्यासाठी एका विशेष व्याख्यानसत्राचे आयोजन कार्यकर्त्यांसाठी केले होते. न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग या शाळेतून मुख्याध्यापक पदावरून नुकतेच निवृत्त झालेले* ***श्रीकांत काकडे सर*** *यांचे मार्गदर्शन या विषयासाठी मिळाले होते. त्यांच्या मार्गदर्शनसत्राचा हा सारांश.)*

शिक्षक हा पेशा नाही. ती वृत्ती असावी लागते. अशी प्रवृत्ती प्रयत्नपूर्वक साध्यही करता येते. शिक्षकांना अनेक उपक्रमात सहभागी व्हावे लागते. हस्तलिखिते इत्यादी कृती करायला सांगणारे शिक्षक ..... स्वतः काही करतात का?

पर्यवेक्षक म्हणून काम करताना रोजच्या कामात बदल झाला. **आज्ञा इतरांना देण्याऐवजी मनाला देऊन काही गोष्टी स्वतः करण्याचे ठरविले.**

१९९६ साली लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने या विषयाची माहिती संकलित केली. वृत्तपत्रातील माहिती एका बाजूला, लोकसभेची रचना दुसऱ्या बाजूला, लोकसभेच्या संदर्भातील रंजक माहिती, भूतकाळातील महत्त्वाचे संदर्भ याचा अंतर्भाव प्रकल्पात केला.

चित्रे बोलकी असतात. त्याचा उपयोग केला. प्रकल्पासाठी नवीन विषय निवडल्यावर तो सादर करण्यासाठी भरपूर तयारी हवी. मेहनतीची तयारी हवी.

**प्रार्थना प्रकल्प -** पाठांतराचा उपयोग होतो. पण अर्थ समजला नाही तर काय उपयोग. मग त्या पाठांतराचा काय उपयोग?

बहुश्रुत व विचक्षण वाचक होणे गरजेचे.

आपले काम आपणच केले पाहिजे. त्याचे परिणाम चांगले होतात. संकलन करण्याची, माहिती मिळेल तेथून गोळा करण्याची आवड, लिखाणाची सवय असली पाहिजे. जे जे भावले ते ते लिहून ठेवावे. संकलन एकदम एकाएकी होत नाही. संकलन काय करायचे याचे भान हवे. मिळवलेले ज्ञान हे अव्यवस्थित दुकानाप्रमाणे असू नये. आपल्याकडे काय आहे हे आपल्याबरोबर इतरांनाही समजले पाहिजे व योग्य वेळी ते मिळाले पाहिजे.

*'जे सुदूर असाध्य, त्यात मन धावे'*

***'Winners do not do different things, they do it differently.'***

वरील सुप्रसिध्द वचनांचा आधार घेऊन श्री. काकडे सर यांनी आपल्या विषयाचा समारोप केला.

**महात्मा गांधी** - अगदी सामान्यातील सामान्य माणसाच्या मनात स्वातंत्र्याची आस उत्पन्न केली. कोटयावधी देशबांधवांना एका इशाऱ्यानिशी ब्रिटिशांविरूध्द संघर्ष करायला प्रेरीत केले. देशाच्या विकासासाठी 'खेडयाकडे चला' हा मंत्र दिला.

## आषाढी एकादशी



ज्ञानेश्वर महाराजांची पालखी पुण्यात आली की, येणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या पुण्यातील मुक्कामामुळे वातावरण भक्तिमय होऊन जाते. महानगरपालिकेच्या, तसेच काही खाजगी शाळा/संस्थांच्या इमारतीमध्ये हे सर्व वारकरी मुक्कामाला असतात. वारकऱ्यांची अशीच एक दिंडी गोखलेनगरच्या म.न.पा. शाळेत उतरली होती. या शाळेत वर्धिनीची अभेदानंद शाखा भरते. शाळेत उतरलेल्या वारकऱ्यांशी संवाद साधण्याची संधी वर्धकांना मिळाली होती. वारकरीबांधवांच्या बरोबर बसून भजनाचा, नामस्मरणाचा आनंद मुलांना यानिमित्ताने घेता आला. याच शाखेतील एक युवक कार्यकर्त्याने काही अभंग म्हटले. त्याच्या या अभंगगायनाला वारकऱ्यांनी जोरदार दाद दिली. त्याला शाबासकी दिली. बालशाखेतील आणि पाकोळी बालवाडीतील बालांची एक मिरवणूक वर्धिनीपासून सोमवारातील विठ्ठल मंदिरापर्यंत निघाली होती. मुलींच्या भगिनी निवेदिता शाखेने आषाढी एकादशी निमित्त भक्तिगीत स्पर्धा आयोजित केली होती. प्रत्येक गटाने एक अभंग गायचा व तो साभिनय सादर करायचा अशी स्पर्धा होती. प्रत्येक गटाने ही स्पर्धा चुरशीचा सहभाग घेऊन रंगवली. तर वर्धिनीच्या इमारत विठ्ठल हरिनामाच्या जयजयकाराने दुमदुमून गेली होती. निमित्त होते. ह.भ.प. विजय अपामार्जिने यांच्या कीर्तनाचे.

### मातृभूमीची सेवा विसरून जगण्याचा नच हक्क मला

एम.बी.बी.एस. नंतर पदव्युत्तर शिक्षण घेत असतानाच स्पर्धा परीक्षेची तयारी करण्याचे मनात होते. बहिणीच्या आग्रहाने वर्धिनीच्या स्पर्धा परीक्षा केंद्रात दाखल झालो. तज्ज्ञांच्या शैक्षणिक मार्गदर्शनाबरोबरच येथील आपुलकीच्या वातावरणाने मला भारून टाकले. गणेशोत्सवाच्या काळात वर्धकांनी सादर केलेले गणेश मेळ्यासारखे कार्यक्रम मी बघितले. रंजनाबरोबरच सहजपणाने प्रबोधन करणारे हे कार्यक्रम माझ्यातील विधायक कार्यशक्तीला आवाहन करून गेले. मुंबईच्या श्री. मधुकर पाटणकर सर यांनी केवळ आमच्यासाठी पुण्याला येऊन घेतलेल्या व्यक्तिमत्त्व विकास वर्गाने व्यक्तिमत्त्व विकासाचे दालन माझ्यासाठी खऱ्या अर्थाने खुले झाले. वक्तशीरपणा, संवादकौशल्य, तणावमुक्ती व स्मृतीसंवर्धनाचे तंत्र अशा विषयांवरील प्रभावी मार्गदर्शनाबरोबरच संवेदनशीलतेच्या आधारे पाटणकर सरांनी माणुसकीचे तत्त्वच आम्हाला शिकविले. समाजाच्या ज्या अनमोल सहकार्यामुळे पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षणापर्यंतचा पल्ला मी गाठू शकलो. त्या समाजाच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी योग्य माध्यम वर्धिनीच्या रूपाने मला गवसले आहे. समाजसेवेचे, देशहिताचे जे विचारबीज मला वर्धिनीत मिळाले, ते माझ्या मूळ गावी पेरण्याचा माझा विचार आहे. वर्धिनीच्या कार्यात, कार्यप्रसारात खारीचे योगदान द्यायचा माझा संकल्प आहे.

**डॉ. सोमनाथ सलगर**

**डॉ. हेडगेवार** - पारतंत्र्याचे मूळ हिंदूसमाजाच्या असंघटीतपणात आहे हे ओळखून निद्रीस्त हिंदू समाजाला जागृत करण्याचे व संघटीत करण्याचे अशक्यप्राप्त वाटणारे कार्य यशस्वी केले.





## प्रकल्प कसे तयार करावे ?

*(वर्षभर विविध शैक्षणिक उपक्रम वर्धिनीच्या शाखांवर होत असतात. एखाद्या विषयासंबंधी प्रकल्प करण्यासाठी नेमका विचार कसा करावा याविषयी मार्गदर्शन करण्यासाठी एका विशेष व्याख्यानसत्राचे आयोजन कार्यकर्त्यांसाठी केले होते. न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग या शाळेतून मुख्याध्यापक पदावरून नुकतेच निवृत्त झालेले **श्रीकांत काकडे सर** यांचे मार्गदर्शन या विषयासाठी मिळाले होते. त्यांच्या मार्गदर्शनसत्राचा हा सारांश.)*

शिक्षक हा पेशा नाही. ती वृत्ती असावी लागते. अशी प्रवृत्ती प्रयत्नपूर्वक साध्यही करता येते. शिक्षकांना अनेक उपक्रमात सहभागी व्हावे लागते. हस्तलिखिते इत्यादी कृती करायला सांगणारे शिक्षक ..... स्वतः काही करतात का?

पर्यवेक्षक म्हणून काम करताना रोजच्या कामात बदल झाला. **आज्ञा इतरांना देण्याऐवजी मनाला देऊन काही गोष्टी स्वतः करण्याचे ठरविले.**

१९९६ साली लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने या विषयाची माहिती संकलित केली. वृत्तपत्रातील माहिती एका बाजूला, लोकसभेची रचना दुसऱ्या बाजूला, लोकसभेच्या संदर्भातील रंजक माहिती, भूतकाळातील महत्त्वाचे संदर्भ याचा अंतर्भाव प्रकल्पात केला.

चित्रे बोलकी असतात. त्याचा उपयोग केला. प्रकल्पासाठी नवीन विषय निवडल्यावर तो सादर करण्यासाठी भरपूर तयारी हवी. मेहनतीची तयारी हवी.

**प्रार्थना प्रकल्प -** पाठांतराचा उपयोग होतो. पण अर्थ समजला नाही तर काय उपयोग. मग त्या पाठांतराचा काय उपयोग?

बहुश्रुत व विचक्षण वाचक होणे गरजेचे.

आपले काम आपणच केले पाहिजे. त्याचे परिणाम चांगले होतात. संकलन करण्याची, माहिती मिळेल तेथून गोळा करण्याची आवड, लिखाणाची सवय असली पाहिजे. जे जे भावले ते ते लिहून ठेवावे. संकलन एकदम एकाएकी होत नाही. संकलन काय करायचे याचे भान हवे. मिळवलेले ज्ञान हे अव्यवस्थित दुकानाप्रमाणे असू नये. आपल्याकडे काय आहे हे आपल्याबरोबर इतरांनाही समजले पाहिजे व योग्य वेळी ते मिळाले पाहिजे.

*'जे सुदूर असाध्य, त्यात मन धावे'*

***'Winners do not do different things, they do it differently.'***

वरील सुप्रसिध्द वचनांचा आधार घेऊन श्री. काकडे सर यांनी आपल्या विषयाचा समारोप केला.

**महात्मा गांधी** - अगदी सामान्यातील सामान्य माणसाच्या मनात स्वातंत्र्याची आस उत्पन्न केली. कोटयावधी देशबांधवांना एका इशाऱ्यानिशी ब्रिटिशांविरूध्द संघर्ष करायला प्रेरीत केले. देशाच्या विकासासाठी 'खेडयाकडे चला' हा मंत्र दिला.

# शारदामणी महिला विभाग

## पाकोळी बालवाडी

बालवाडी - तीन गटात विभागलेली आहे. छोटा गट, मधला गट व मोठा गट. या तीन गटांचे प्रत्येक महिन्याचे अभ्यासाचे वेळापत्रक असते. या कोवळ्या वयात झालेले संस्कार पुढे आयुष्यभर टिकतात आणि त्यामुळे पाकोळी बालवाडीच्या वार्षिक वेळापत्रकामध्ये दैनंदिन कामाबरोबरच काही विशेष उपक्रम होतात. या वर्षातील ठळक विशेष घटना / कार्यक्रम - खालीलप्रमाणे.

### संक्रांत उत्सव

अभिनव बाल विभागाच्या मुख्याध्यापिका आणि बालवाडी प्रशिक्षणासंदर्भात विपुल लेखन करणाऱ्या सौ. रजनीताई दाते या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. बालवाडीच्या प्रत्येक वर्गाने साभिनय गीत सादर केले. यापैकी रस्त्यावरून वाहनांनी कसे चालावे या विषयावरचे अभिनय गीत सर्वांची दाद मिळवून गेले.

### सणांची महती

वर्षभर असणाऱ्या विविध सणांची गोष्टीरूपाने माहिती सांगितली गेली. यामध्ये संक्रांतीची गोष्ट, महादेवाची गोष्ट (महाशिवरात्र), बैलाची माहिती (बैलपोळा) नारळीपौर्णिमा, वारूळ तयार करून नागपंचमीची गोष्ट, अशा विषयांचा समावेश होता.

या व्यतिरिक्त टिळक पुण्यतिथी, महात्मा गांधी जयंती, संत नामदेव पुण्यतिथी, संत एकनाथ पुण्यतिथीच्या निमित्ताने मुलांना छोट्या छोट्या गोष्टी सांगितल्या. गोकुळाष्टमीच्या दिवशी कृष्णाच्या, गोपांच्या, गोपिकांच्या वेशात बाल सजले होते व या सर्वांची मंगळवार पेठेतून एक फेरी काढण्यात आली. अशीच मनोहारी मिरवणूक निघाली होती, आषाढीच्या एकादशीच्या दिवशी! संतांच्या, वारकऱ्यांच्या वेषातील बाल, त्यांच्यामध्ये विठ्ठल-रखुमाईच्या वेषातील दोघे बाल, अशी २०० बालांची रस्त्यावरून चाललेली दिंडी पाहून रस्त्यावरील लोक थांबत आणि प्रत्यक्ष पांडुरंगाचे, संतमहंतांचे दर्शन होते आहे, अशा भावनेने हात जोडीत या दिंडीचे स्वागत करीत होते.



### छंदवर्ग

बालवाडीच्या मोठ्या गटातील मुलांसाठी १ ते १५ एप्रिल या काळात छंदवर्गाचे आयोजन केले होते. रोज एक नवा विषय मुले शिकत होती. रंगकाम, चित्रकाम, कोलाज, ठसे

> **बाबा आमटे** - कुष्ठरोग्यांच्या पुनर्वसनासाठी सर्व आयुष्य पणाला लावले. कुष्ठरूग्णांच्या मनात आत्मविश्वास उत्पन्न केला. समाजाच्या मनातील कुष्ठरोग दूर करण्याचे अथक प्रयत्न.





काम, माती काम, शिवणकाम यांच्या जोडीला प्रार्थना, गीते, अभिनय गीते, गोष्टी असा मनोरंजनाचा खजिना मुलांनी लुटला. मातीकाम करताना - चित्रे काढताना त्यांची तल्लीनता पहाण्यासारखी होती.

### ॐ नमस्ते गणपतये

लहान मुलांनी स्तोत्र म्हणताना बोबडेच उच्चार करायला पाहिजेत असे नाही. शुध्द व स्पष्ट उच्चारात गणेश अथर्वशीर्ष म्हणण्याचा एक उपक्रम बालवाडीच्या मोठ्या गटासाठी होता. अथर्वशीर्ष पाठांतर झालेच पण बालचमूंचा हा गट वेगवेगळ्या गणेश उत्सव मंडळांच्यासमोर जाऊन अथर्वशीर्ष म्हणत होता. या गटाची अशीच एक भेट पुण्यातील सुप्रसिध्द सारसबाग, गणपती मंदिराला झाली. या मुलांचे अथर्वशीर्ष ऐकून तेथील व्यवस्थापकांनी प्रत्येक मुलाला प्रसाद म्हणून श्रीफळ दिले.

## उद्योगशिक्षण वर्ग विभाग वृत्त

या विभागामध्ये शिवणवर्ग, फॅशनेबल ब्लाऊज शिलाई वर्ग, गृहपरिचर्या प्रशिक्षण वर्ग चालतात. त्याचबरोबर दोन ठिकाणी साक्षरतेचे वर्गही चालतात. रोजच्या चालणाऱ्या कार्यक्रमां-व्यतिरिक्त झालेल्या अन्य कार्यक्रमांचा हा थोडक्यात गोषवारा -

### ❖ गृहपरिचर्या प्रशिक्षण वर्ग

२० जानेवारी २००२ रोजी संपलेल्या तुकडीतील ३३ विद्यार्थिनींपैकी बहुतेक विद्यार्थिनींना कामे मिळायला सुरूवात झाली आहे. नवीन तुकडी जुलैमध्ये सुरू झाली. यामध्ये १८ विद्यार्थिनी आहेत. या वर्षात झालेले अन्य कार्यक्रम :

* गुरूपौर्णिमेनिमित्त सिंधूताई संकपाळ यांच्या अनाथाश्रमाच्या कामाची माहिती सांगितली.
* चंदूताई कर्नाटकी यांच्यावरील लेखाचे वाचन व त्यावर चर्चा
* रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, भगिनी निवेदिता यांचे चरित्र ज्ञानेश पुरंदरे यांनी सांगितले.
* रक्षाबंधनानिमित्त ससून रूग्णालय व केईएम हॉस्पिटलला भेट
* स्वदेशीचे महत्त्व : श्री. फणसे, भगवान कुलकर्णी

### ❖ साक्षरता वर्ग

या वर्गाचे आयोजन वर्धिनीच्या इमारतीत, तसेच भीमनगर वस्तीत केले जाते. या दोन्ही ठिकाणी सुमारे पन्नास महिला या वर्गाचा लाभ घेत आहेत. वर्षभरात अनेक उपक्रम साक्षरतावर्गामार्फत घेण्यात आले. त्यापैकी काही पुढीलप्रमाणे :-

### ❖ राष्ट्रपुरूष पुण्यस्मरण कार्यक्रम

यामध्ये लोकमान्य टिळक, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतिदिनाचे कार्यक्रम घेतले होते. महात्मा फुले व डॉ. भीमराव आंबेडकरांच्या जीवनावरील गाणी महिलांनी जोशात म्हटली.

> **एकनाथजी रानडे** - विवेकानंद शीला स्मारकाच्या माध्यमातून विवेकानंद केंद्र हे देशाच्या एकात्मतेचे केंद्र बनविण्यासाठी अथक प्रयत्न. देशासाठी जगणाऱ्या तरूण जीवनवृतींची फळी निर्माण करून पूर्वांचलातील फुटीरतेची समस्या दूर करण्यासाठी शेवटच्या श्वासापर्यंत कार्यरत.

# शारदामणी महिला विभाग

## पाकोळी बालवाडी

बालवाडी - तीन गटात विभागलेली आहे. छोटा गट, मधला गट व मोठा गट. या तीन गटांचे प्रत्येक महिन्याचे अभ्यासाचे वेळापत्रक असते. या कोवळ्या वयात झालेले संस्कार पुढे आयुष्यभर टिकतात आणि त्यामुळे पाकोळी बालवाडीच्या वार्षिक वेळापत्रकामध्ये दैनंदिन कामाबरोबरच काही विशेष उपक्रम होतात. या वर्षातील ठळक विशेष घटना / कार्यक्रम - खालीलप्रमाणे.

### संक्रांत उत्सव

अभिनव बाल विभागाच्या मुख्याध्यापिका आणि बालवाडी प्रशिक्षणासंदर्भात विपुल लेखन करणाऱ्या सौ. रजनीताई दाते या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. बालवाडीच्या प्रत्येक वर्गाने साभिनय गीत सादर केले. यापैकी रस्त्यावरून वाहनांनी कसे चालावे या विषयावरचे अभिनय गीत सर्वांची दाद मिळवून गेले.



### सणांची महती

वर्षभर असणाऱ्या विविध सणांची गोष्टीरूपाने माहिती सांगितली गेली. यामध्ये संक्रांतीची गोष्ट, महादेवाची गोष्ट (महाशिवरात्र), बैलाची माहिती (बैलपोळा) नारळीपौर्णिमा, वारूळ तयार करून नागपंचमीची गोष्ट, अशा विषयांचा समावेश होता.

या व्यतिरिक्त टिळक पुण्यतिथी, महात्मा गांधी जयंती, संत नामदेव पुण्यतिथी, संत एकनाथ पुण्यतिथीच्या निमित्ताने मुलांना छोट्या छोट्या गोष्टी सांगितल्या. गोकुळाष्टमीच्या दिवशी कृष्णाच्या, गोपांच्या, गोपिकांच्या वेशात बाल सजले होते व या सर्वांची मंगळवार पेठेतून एक फेरी काढण्यात आली. अशीच मनोहारी मिरवणूक निघाली होती, आषाढीच्या एकादशीच्या दिवशी! संतांच्या, वारकऱ्यांच्या वेषातील बाल, त्यांच्यामध्ये विठ्ठल-रखुमाईच्या वेषातील दोघे बाल, अशी २०० बालांची रस्त्यावरून चाललेली दिंडी पाहून रस्त्यावरील लोक थांबत आणि प्रत्यक्ष पांडुरंगाचे, संतमहंतांचे दर्शन होते आहे, अशा भावनेने हात जोडीत या दिंडीचे स्वागत करीत होते.

### छंदवर्ग

बालवाडीच्या मोठ्या गटातील मुलांसाठी १ ते १५ एप्रिल या काळात छंदवर्गाचे आयोजन केले होते. रोज एक नवा विषय मुले शिकत होती. रंगकाम, चित्रकाम, कोलाज, ठसे

**बाबा आमटे** - कुष्ठरोग्यांच्या पुनर्वसनासाठी सर्व आयुष्य पणाला लावले. कुष्ठरूग्णांच्या मनात आत्मविश्वास उत्पन्न केला. समाजाच्या मनातील कुष्ठरोग दूर करण्याचे अथक प्रयत्न.





काम, माती काम, शिवणकाम यांच्या जोडीला प्रार्थना, गीते, अभिनय गीते, गोष्टी असा मनोरंजनाचा खजिना मुलांनी लुटला. मातीकाम करताना - चित्रे काढताना त्यांची तल्लीनता पहाण्यासारखी होती.

### ॐ नमस्ते गणपतये

लहान मुलांनी स्तोत्र म्हणताना बोबडेच उच्चार करायला पाहिजेत असे नाही. शुध्द व स्पष्ट उच्चारात गणेश अथर्वशीर्ष म्हणण्याचा एक उपक्रम बालवाडीच्या मोठ्या गटासाठी होता. अथर्वशीर्ष पाठांतर झालेच पण बालचमूंचा हा गट वेगवेगळ्या गणेश उत्सव मंडळांच्यासमोर जाऊन अथर्वशीर्ष म्हणत होता. या गटाची अशीच एक भेट पुण्यातील सुप्रसिध्द सारसबाग, गणपती मंदिराला झाली. या मुलांचे अथर्वशीर्ष ऐकून तेथील व्यवस्थापकांनी प्रत्येक मुलाला प्रसाद म्हणून श्रीफळ दिले.

## उद्योगशिक्षण वर्ग विभाग वृत्त

या विभागामध्ये शिवणवर्ग, फॅशनेबल ब्लाऊज शिलाई वर्ग, गृहपरिचर्या प्रशिक्षण वर्ग चालतात. त्याचबरोबर दोन ठिकाणी साक्षरतेचे वर्गही चालतात. रोजच्या चालणाऱ्या कार्यक्रमां-व्यतिरिक्त झालेल्या अन्य कार्यक्रमांचा हा थोडक्यात गोषवारा -

### ❖ गृहपरिचर्या प्रशिक्षण वर्ग

२० जानेवारी २००२ रोजी संपलेल्या तुकडीतील ३३ विद्यार्थिनींपैकी बहुतेक विद्यार्थिनींना कामे मिळायला सुरूवात झाली आहे. नवीन तुकडी जुलैमध्ये सुरू झाली. यामध्ये १८ विद्यार्थिनी आहेत. या वर्षात झालेले अन्य कार्यक्रम :

* गुरूपौर्णिमेनिमित्त सिंधूताई संकपाळ यांच्या अनाथाश्रमाच्या कामाची माहिती सांगितली.
* चंदूताई कर्नाटकी यांच्यावरील लेखाचे वाचन व त्यावर चर्चा
* रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, भगिनी निवेदिता यांचे चरित्र ज्ञानेश पुरंदरे यांनी सांगितले.
* रक्षाबंधनानिमित्त ससून रूग्णालय व केईएम हॉस्पिटलला भेट
* स्वदेशीचे महत्त्व : श्री. फणसे, भगवान कुलकर्णी

### ❖ साक्षरता वर्ग

या वर्गाचे आयोजन वर्धिनीच्या इमारतीत, तसेच भीमनगर वस्तीत केले जाते. या दोन्ही ठिकाणी सुमारे पन्नास महिला या वर्गाचा लाभ घेत आहेत. वर्षभरात अनेक उपक्रम साक्षरतावर्गामार्फत घेण्यात आले. त्यापैकी काही पुढीलप्रमाणे :-

### ❖ राष्ट्रपुरूष पुण्यस्मरण कार्यक्रम

यामध्ये लोकमान्य टिळक, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतिदिनाचे कार्यक्रम घेतले होते. महात्मा फुले व डॉ. भीमराव आंबेडकरांच्या जीवनावरील गाणी महिलांनी जोशात म्हटली.

**एकनाथजी रानडे** - विवेकानंद शीला स्मारकाच्या माध्यमातून विवेकानंद केंद्र हे देशाच्या एकात्मतेचे केंद्र बनविण्यासाठी अथक प्रयत्न. देशासाठी जगणाऱ्या तरूण जीवनवृतींची फळी निर्माण करून पूर्वांचलातील फुटीरतेची समस्या दूर करण्यासाठी शेवटच्या श्वासापर्यंत कार्यरत.

श्रावण महिन्यात श्रावणी शुक्रवार साजरा करण्याच्या निमित्ताने झालेल्या कार्यक्रमात भीमनगर येथील महिला मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती वत्सलाताई सरोदे या उपस्थित होत्या व त्यांनी पारंपारिक गाणीही म्हटली. याच निमित्ताने अल्पबचत, स्वच्छता या विषयांवरचे मार्गदर्शनही करण्यात आले. कार्यक्रमाच्या ठिकाणी कुष्ठरोग निर्मूलन या विषयावरील पोस्टर्सचे प्रदर्शनही लावण्यात आले होते.

कुटुंब न्यायालयात काम करणाऱ्या ॲड. अनिताताई पोळ यांनी महिलाविषयक कायद्यांची माहिती या महिलांना सांगितली.

**❖ महाभोंडल्यातील सहभाग**

संस्कारभारती या कला व संस्कृती या माध्यमातून समाजाचे जागरण करणाऱ्या संस्थेने महाभोंडल्याचे आयोजन केले होते. या महाभोंडल्यात सुमारे दहा हजाराहून अधिक महिलांनी सहभाग घेतला होता. या महाभोंडल्यात वर्धिनीच्या महिला विभागाचाही सहभाग होता. साक्षरता वर्ग, उद्योगशिक्षण वर्ग अशा माध्यमातून नित्य संपर्कात असलेल्या सुमारे ३०० महिला वर्धिनीच्या माध्यमातून त्यात सहभागी झाल्या होत्या. 'आपण फार शिकलेलो नाही' 'आपली परिस्थितीही बेताची आहे' 'शिकलेल्या महिला आपल्या बरोबर कशा वागतील' असे अनेक प्रश्न मनात घेऊन यातील अनेक महिला कार्यक्रमाला स्वखर्चाने उपस्थित राहिल्या. तेथील वातावरण भारून टाकणारे होते. पारंपारिक भोंडल्याच्या गीतांना आवश्यक तो सामाजिक स्पर्श देणारी नवीन गीते या निमित्ताने सर्व महिलांनी म्हटली गाणी म्हणत फेर धरताना आपण सर्व महिलांमधे कधी मिसळून गेलो हे समजलेच नाही. शिक्षित-अशिक्षित, गरीब-श्रीमंत असा भेद दूर करण्यासाठी भोंडल्यासारखा पारंपारिक कार्यक्रमही किती परिणामकारक ठरू शकतो याची अनुभूती या कार्यक्रमाला गेलेल्या महिलांनी घेतली.

## सहलीवर खर्च करण्यापेक्षा

*गृहपरिचर्या प्रशिक्षण वर्गाच्या विद्यार्थिनींची एक सहल कोल्हापूर येथे जाणार होती. सहलीसाठी प्रत्येकाने खर्चाची रक्कम जमा केली. कोल्हापूर सहलीपूर्वी संस्था-भेट कार्यक्रमाच्या अंतर्गत कुंभारवळण येथील सिंधूताई संकपाळ यांच्या ममता बालसदन केंद्राला भेट देण्यासाठी विद्यार्थिनी गेल्या होत्या. तेथील मुलांची पार्श्वभूमी ऐकल्यावर व वातावरण पाहिल्यावर मुलींना भरून आले. या मुलांसाठी सिंधूताई किती काबाडकष्ट करतात ते पाहिल्यावर परतताना सर्वांनी पुष्पाताईंना सांगितले की ताई कोल्हापूरची सहल आपण रद्द करू या आणि जे पैसे आम्ही त्यासाठी खर्च करणार होतो, ते सगळे पैसे तुम्ही आमच्यातर्फे ममता बालसदन केंद्राला द्या. सहलीवर पैसे खर्च करण्यापेक्षा हे काम इतके मोठे आहे की, त्यासाठीच हे पैसे खर्च झालेले आम्हाला आवडेल.*

**योगी श्री.अरविंद** - क्रांतीकारी योगी. भारतीय संस्कृतीचे महनीय प्रवक्ते. पाँडीचेरी येथे योग-साधनार्थ आश्रम स्थापन. भारतीय राष्ट्रवादाला आध्यत्मिक आणि सांस्कृतिक अधिष्ठान दिले. भारत अखंड होण्याची त्यांची भविष्यवाणी आहे.





**❖ गुरूपौर्णिमा**

शिकवायला येणाऱ्या शिक्षिकांना महिलांनी श्रीफळ व फूल देऊन कृतज्ञता व्यक्त केली. या दिवसाच्या पौराणिक महत्त्वाबरोबरच 'गुरू' ही संकल्पना रोजच्या जीवनात किती रूपातून आपल्या समोर येत असते, याबाबतही संवाद साधणाऱ्या गप्पांचा कार्यक्रम झाला.

## *शिकवायला लागले ......... आणि म्हणूनच शिकायलाही लागले.*

मी एक साधारण गृहिणी होते. मुलांच्या विश्वात रमायला मला फार आवडते. याच गोष्टीमुळे एक दिवस अनपेक्षितपणे वर्धिनीच्या या इमारतीत गेले .........तेथील पाकोळ्यांचे मुक्तपणे वागडणे पाहून वर्धिनीच्या या पाकोळी बालवाडीत शिक्षिका म्हणून काम करायला मिळाले तर किती बरे होईल; या विचारांनी मन मोहरून गेले. धीर केला आणि तेथील प्रमुखांना विनंती केली. आश्चर्य म्हणजे मला लगेच होकार मिळाला आणि माझ्या आवडीचे काम मला मिळाले. तीन तास छोट्यांच्या सहवासात मी इतकी रमायचे की, घरी जावेसे वाटतच नव्हते. या वातावरणामुळेच मला वाटले आपण खूप शिकले पाहिजे. बी.ए. चे शिक्षण सुरू केले. हार्मोनियम शिकायला लागले. माझे हे आनंदाचे दिवस कसे जात होते कळत नव्हते. पण अचानक या प्रवासात खंड पडला. रहाण्याची जागा बदलली. वर्धिनीपासून खूप दूर रहायला गेले. दूर रहात होते; पण मन मात्र रेंगाळत होते वर्धिनीच्या बालवाडीत, तेथील चिमण्यापाखरात. काय करावे काही सूचत नव्हते. इच्छा असूनही तेथे शिकवायला जाणे शक्य नव्हते. मग विचार केला नव्हे निश्चयच केला. आपणच एक बालवाडी सुरू करायची. आज माझी स्वतःची बालवाडी आहे. २५ मुलांच्या चिवचिवाटात माझे सुख मला पुनः मिळाले. आज मी जो आनंद मिळवते आहे. त्याचे एकमेव कारण वर्धिनीने दिलेला जिव्हाळा. आपलेपणाचे वातावरण. माहेरची माणसं वाटावी इतक्या आपुलकीने होणारे संवाद. आजही जेव्हा जेव्हा वर्धिनीत जायचा प्रसंग येतो, तेव्हा तेथून पाय निघत नाही. मला रोज जाता येत नसले, तरी माझे यजमान तेथेच काम करीत असल्याने त्या वातावरणाचा आनंद मला अप्रत्यक्षपणे रोजच मिळतो आहे.

सौ. सुनिता अशोक मुटकुळे

**❖ शारदामणि महिला विभाग - मासिक एकत्रीकरण**

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी वर्धिनी परिवारामधील महिलांच्या एकत्रीकरणाचा कार्यक्रम होतो. ऑक्टोबर महिन्यापासून याची सुरूवात झाली असून वर्षअखेरपर्यंत अशी तीन एकत्रीकरणे झाली. वर्धिनीच्या सर्व शाखा, प्रकल्प, बालवाडी, उद्योगशिक्षण वर्ग अशा सर्व माध्यमातून संपर्कात असलेल्या महिला, पालक, कार्यकर्त्या व विद्यार्थिनी या कार्यक्रमाला उपस्थित असतात.

**सुब्रह्मण्य भारती** - राष्ट्रीय कवी अनेकांच्या मनात आपल्या ओजस्वी रचनांनी देशभक्तीची प्रेरणा निर्माण केली. त्याकरीता अनेकवेळा तुरुंगवास. स्त्रीयांची स्वतंत्रता, अस्पृश्यता निवारण, जातीभेद निवारण याकरिता सामाजिक कार्यात अखंड कार्यरत.

श्रावण महिन्यात श्रावणी शुक्रवार साजरा करण्याच्या निमित्ताने झालेल्या कार्यक्रमात भीमनगर येथील महिला मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती वत्सलाताई सरोदे या उपस्थित होत्या व त्यांनी पारंपारिक गाणीही म्हटली. याच निमित्ताने अल्पबचत, स्वच्छता या विषयांवरचे मार्गदर्शनही करण्यात आले. कार्यक्रमाच्या ठिकाणी कुष्ठरोग निर्मूलन या विषयावरील पोस्टर्सचे प्रदर्शनही लावण्यात आले होते.

कुटुंब न्यायालयात काम करणाऱ्या ॲड. अनिताताई पोळ यांनी महिलाविषयक कायद्यांची माहिती या महिलांना सांगितली.

### ❖ महाभोंडल्यातील सहभाग

संस्कारभारती या कला व संस्कृती या माध्यमातून समाजाचे जागरण करणाऱ्या संस्थेने महाभोंडल्याचे आयोजन केले होते. या महाभोंडल्यात सुमारे दहा हजाराहून अधिक महिलांनी सहभाग घेतला होता. या महाभोंडल्यात वर्धिनीच्या महिला विभागाचाही सहभाग होता. साक्षरता वर्ग, उद्योगशिक्षण वर्ग अशा माध्यमातून नित्य संपर्कात असलेल्या सुमारे ३०० महिला वर्धिनीच्या माध्यमातून त्यात सहभागी झाल्या होत्या. 'आपण फार शिकलेलो नाही' 'आपली परिस्थितीही बेताची आहे' 'शिकलेल्या महिला आपल्या बरोबर कशा वागतील' असे अनेक प्रश्न मनात घेऊन यातील अनेक महिला कार्यक्रमाला स्वखर्चाने उपस्थित राहिल्या. तेथील वातावरण भारून टाकणारे होते. पारंपारिक भोंडल्याच्या गीतांना आवश्यक तो सामाजिक स्पर्श देणारी नवीन गीते या निमित्ताने सर्व महिलांनी म्हटली गाणी म्हणत फेर धरताना आपण सर्व महिलांमधे कधी मिसळून गेलो हे समजलेच नाही. शिक्षित-अशिक्षित, गरीब-श्रीमंत असा भेद दूर करण्यासाठी भोंडल्यासारखा पारंपारिक कार्यक्रमही किती परिणामकारक ठरू शकतो याची अनुभूती या कार्यक्रमाला गेलेल्या महिलांनी घेतली.

### सहलीवर खर्च करण्यापेक्षा

*गृहपरिचर्या प्रशिक्षण वर्गाच्या विद्यार्थिनींची एक सहल कोल्हापूर येथे जाणार होती. सहलीसाठी प्रत्येकाने खर्चाची रक्कम जमा केली. कोल्हापूर सहलीपूर्वी संस्था-भेट कार्यक्रमाच्या अंतर्गत कुंभारवळण येथील सिंधूताई संकपाळ यांच्या ममता बालसदन केंद्राला भेट देण्यासाठी विद्यार्थिनी गेल्या होत्या. तेथील मुलांची पार्श्वभूमी ऐकल्यावर व वातावरण पाहिल्यावर मुलींना भरून आले. या मुलांसाठी सिंधूताई किती काबाडकष्ट करतात ते पाहिल्यावर परतताना सर्वांनी पुष्पाताईंना सांगितले की ताई कोल्हापूरची सहल आपण रद्द करू या आणि जे पैसे आम्ही त्यासाठी खर्च करणार होतो, ते सगळे पैसे तुम्ही आमच्यातर्फे ममता बालसदन केंद्राला द्या. सहलीवर पैसे खर्च करण्यापेक्षा हे काम इतके मोठे आहे की, त्यासाठीच हे पैसे खर्च झालेले आम्हाला आवडेल.*

**योगी श्री.अरविंद** - क्रांतीकारी योगी. भारतीय संस्कृतीचे महनीय प्रवक्ते. पाँडीचेरी येथे योग-साधनार्थ आश्रम स्थापन. भारतीय राष्ट्रवादाला आध्यत्मिक आणि सांस्कृतिक अधिष्ठान दिले. भारत अखंड होण्याची त्यांची भविष्यवाणी आहे.





### ❖ गुरूपौर्णिमा

शिकवायला येणाऱ्या शिक्षिकांना महिलांनी श्रीफळ व फूल देऊन कृतज्ञता व्यक्त केली. या दिवसाच्या पौराणिक महत्त्वाबरोबरच 'गुरू' ही संकल्पना रोजच्या जीवनात किती रूपातून आपल्या समोर येत असते, याबाबतही संवाद साधणाऱ्या गप्पांचा कार्यक्रम झाला.

### शिकवायला लागले ......... आणि म्हणूनच शिकायलाही लागले.

मी एक साधारण गृहिणी होते. मुलांच्या विश्वात रमायला मला फार आवडते. याच गोष्टीमुळे एक दिवस अनपेक्षितपणे वर्धिनीच्या या इमारतीत गेले .........तेथील पाकोळ्यांचे मुक्तपणे वागडणे पाहून वर्धिनीच्या या पाकोळी बालवाडीत शिक्षिका म्हणून काम करायला मिळाले तर किती बरे होईल, या विचारांनी मन मोहरून गेले. धीर केला आणि तेथील प्रमुखांना विनंती केली. आश्चर्य म्हणजे मला लगेच होकार मिळाला आणि माझ्या आवडीचे काम मला मिळाले. तीन तास छोट्यांच्या सहवासात मी इतकी रमायचे की, घरी जावेसे वाटतच नव्हते. या वातावरणामुळेच मला वाटले आपण खूप शिकले पाहिजे. बी.ए. चे शिक्षण सुरू केले. हार्मोनियम शिकायला लागले. माझे हे आनंदाचे दिवस कसे जात होते कळत नव्हते. पण अचानक या प्रवासात खंड पडला. रहाण्याची जागा बदलली. वर्धिनीपासून खूप दूर रहायला गेले. दूर रहात होते; पण मन मात्र रेंगाळत होते वर्धिनीच्या बालवाडीत, तेथील चिमण्यापाखरात. काय करावे काही सूचत नव्हते. इच्छा असूनही तेथे शिकवायला जाणे शक्य नव्हते. मग विचार केला नव्हे निश्चयच केला. आपणच एक बालवाडी सुरू करायची. आज माझी स्वतःची बालवाडी आहे. २५ मुलांच्या चिवचिवाटात माझे सुख मला पुनः मिळाले. आज मी जो आनंद मिळवते आहे, त्याचे एकमेव कारण वर्धिनीने दिलेला जिव्हाळा, आपलेपणाचे वातावरण, माहेरची माणसं वाटावी इतक्या आपुलकीने होणारे संवाद. आजही जेव्हा जेव्हा वर्धिनीत जायचा प्रसंग येतो, तेव्हा तेथून पाय निघत नाही. मला रोज जाता येत नसले, तरी माझे यजमान तेथेच काम करीत असल्याने त्या वातावरणाचा आनंद मला अप्रत्यक्षपणे रोजच मिळतो आहे.

सौ. सुनिता अशोक मुटकुळे

### ❖ शारदामणि महिला विभाग - मासिक एकत्रीकरण

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी वर्धिनी परिवारामधील महिलांच्या एकत्रीकरणाचा कार्यक्रम होतो. ऑक्टोबर महिन्यापासून याची सुरूवात झाली असून वर्षअखेरपर्यंत अशी तीन एकत्रीकरणे झाली. वर्धिनीच्या सर्व शाखा, प्रकल्प, बालवाडी, उद्योगशिक्षण वर्ग अशा सर्व माध्यमातून संपर्कात असलेल्या महिला, पालक, कार्यकर्त्या व विद्यार्थिनी या कार्यक्रमाला उपस्थित असतात.

**सुब्रह्मण्य भारती** - राष्ट्रीय कवी अनेकांच्या मनात आपल्या ओजस्वी रचनांनी देशभक्तीची प्रेरणा निर्माण केली. त्याकरीता अनेकवेळा तुरूंगवास. स्त्रीयांची स्वतंत्रता, अस्पृश्यता निवारण, जातीभेद निवारण याकरिता सामाजिक कार्यात अखंड कार्यरत.

पहिले सत्र झाले वर्धिनीच्या प्रार्थनेचा अर्थ समजावून सांगण्याचे. वर्धिनीत रोज म्हटली जाणारी प्रार्थना काय आहे? त्यातून काय परिणाम होणे अपेक्षित आहे? आजपर्यंतच्या कामातील या दृष्टीने अनुभव काय असा विषय वर्धिनीचे पूर्णवेळ कार्यकर्ते श्री. शिरीष पटवर्धन यांनी मांडला. सुमारे २५ महिला उपस्थित होत्या.

दुसऱ्या मासिक सत्रात श्रीमती प्रभाताई गणोरकरांच्या सत्काराचा कार्यक्रम झाला यासंबंधी वृत्त स्वतंत्रपणे दिले आहे.

तिसऱ्या एकत्रीकरणाचा कार्यक्रम शनिवार दि. १४ डिसेंबर रोजी झाला. डॉ. श्रृती दातार यांच्या कथाकथनाने सर्वांना मोहून टाकले. केवळ कथा सांगून त्यांनी उपस्थितांचे मनोरंजन केले नाही तर कथा कशी जन्माला येते, कथाकथनासाठी कोणती कौशल्ये आत्मसात करायला हवीत असाही विषय मांडला. या कथाकथनानंतर संस्कारभारती या संस्थेच्या यांनी भौमितीक आकारांवर आधारित मनोहारी रांगोळ्या काढून दाखविल्या. रंगावली प्रशिक्षण सुरू करण्याच्या दृष्टीने या प्रात्याक्षिकाचे आयोजन केले होते.

## सामंजस्याची कास धरू या

डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात सामाजिक समरसता मंचातर्फे आयोजित 'समरसता साहित्य संमेलन' झाले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून अनेक प्रतिनिधी या संमेलनासाठी आले होते. स्त्री साहित्य या विषयावर केंद्रित असलेल्या या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा होत्या विख्यात लेखिका आणि कवयित्री प्रभाताई गणोरकर. वर्धिनीचे काम हे सामाजिक समरसतेच्या भावनेतूनच सुरू झाले आणि त्याच भावनेतूनच काम चालते. अशा या अनौपचारिक शिक्षण प्रयोगाच्या प्रकल्पात प्रभाताईंचा सत्कार व्हावा व त्यांचे विचार ऐकायला मिळावेत या हेतूने एक कार्यक्रम निश्चित करण्यात आला. २२ नोव्हेंबर रोजी दुपारी हा कार्यक्रम झाला. सुमारे २ तास चाललेल्या ह्या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रभाताईंनी व्यक्त केलेले, त्यांच्या वैयक्तिक जीवनातून त्यांना भावलेले व्यक्ती जीवनाविषयीचे / सामाजिक जीवनाविषयीचे विचार आणि त्यानंतर झालेली मनमोकळी चर्चा. सुमारे ८८ महिला या कार्यक्रमाला उपस्थित होत्या. ज्या प्रश्नांभोवती ही चर्चा रंगली ते प्रश्न असे होते. ❊ बदलत्या परिस्थितीत घरातील स्त्रियांची भूमिका नेमकी काय असावी (नव्या काळात सासू-सून नाते प्रत्यक्ष कसे असावे?) ❊ स्त्रिया घराबाहेर पडायला लागल्याने निर्माण झालेली अनुकूलता व त्यातून निर्माण झालेले प्रश्न ❊ स्त्री मुक्ती आवश्यक की स्त्री शक्तीचे जागरण आवश्यक?

कार्यक्रमाला नवयुवतींपासून ते वयाची पंचाहत्तरी ओलांडलेल्या महिला उपस्थित असल्याने प्रत्येक पिढीतील प्रतिनिधी आपल्याला भेडसावणारे प्रश्न मांडत होत्या. वेगवेगळ्या वयोगटात असलेल्या महिलांचे प्रश्न त्यांच्या दृष्टीने योग्य असले तरी सर्व कुटुंबाचा विचार करताना शेवटी सामंजस्याची कास धरावीच लागते. सर्व प्रश्नांची उत्तरे देताना प्रभाताईंना एका दृष्टीने कसरतच करावी लागत होती आणि म्हणूनच आपल्या बोलण्याचा समारोप करताना त्यांनी हा सामंजस्याचा मुद्दा विस्ताराने सर्वांसमोर मांडला. झालेली चर्चा अपुरी आहे असे प्रभाताईंपासून उपस्थित असलेल्या सर्वांनाच वाटत होते. परंतु वेळेच्या मर्यादेमुळे प्रभाताईंचे आभार मानून हा कार्यक्रम संपला.

**ठक्कर बाप्पा** - वरीष्ट अभियंता हे पद सोडून संपूर्ण जीवन वनवासींची दुर्दशा दूर करण्यासाठी व्यतीत. 'भारत सेवक समाज' 'भील सेवा मंडळ' या संस्थाद्वारे रचनात्मक कार्य.





## कठिण समय येता ...

सात वर्षांपूर्वी जरा भीतभीतच वर्धिनीच्या इमारतीत प्रवेश केला. वर्धिनीत चालणाऱ्या पाकोळी बालवाडीत काम करायची मनात इच्छा होती. या बालवाडीत मला काम मिळेल का? येथील वातावरण कसे असेल? 'स्व'-रूपवर्धिनी या नावाचा नेमका अर्थ काय आहे? असे अनेक प्रश्न मनात असताना त्याच गोंधळलेल्या मनस्थितीत वर्धिनीत प्रवेश केला. औपचारिक बोलण्यानंतर शिक्षिका म्हणून रूजू झाले. हळूहळू मुलांत मिसळू लागले. बालवाडीतल्या चिमुकल्या मुलांपासून वयाने ज्येष्ठ असलेल्या कार्यकर्त्यांशी अनौपचारिक संवाद सुरू झाले.

आज असं स्पष्टपणे जाणवतंय की बालवाडीतल्या चिमुकल्या पाकोळयांपासून वर्धिनीतल्या मोठ्या अनुभवी कार्यकर्त्यांकडून कितीतरी गोष्टी मी शिकले आहे. माझ्या रूपाची मला ओळख होते आहे. हे म्हणताना कितीतरी प्रसंग डोळ्यासमोर आहेत.

थंडीच्या दिवसात माझ्या वर्गातील चिमुरड्यांना सांगितले की रोज स्वेटर, मोजे, कानटोपी घालून यायचे; नाहीतर थंडीचा त्रास होईल. खरोखरीच त्याप्रमाणे कपडे वापरू लागली. पण एक दिवस या मुलांनी मला कोंडीत पकडले. मी स्वेटर घातला नव्हता. मुलं म्हणाली बाई तुम्ही स्वेटर घालत नाही, आजारी पडाल की! मला रोज स्वेटर घालावाच लागला. असेच एकदा नव्याने बालवाडीत आलेल्या व रडणाऱ्या मुलाच्या आईला मी म्हटले की हा जर रोज शाळेत आला तर मी याला बक्षिस देईन. एक दिवस हा चिमुरडा आईवडिलांना घेऊन घरी आला. मला समजेना हा कशासाठी आला आहे ? मी विचारले तर म्हणाला बाई तुम्ही मला बक्षिस देणार आहात ना? आपण शब्दाला पक्के असले पाहिजे, हे या चिमुरड्यांनी मला शिकवलं ! अशा आनंदी वातावरणात दिवस कसे जात होते मला समजलेच नाही. पण गेल्या वर्षी मात्र एक दिवस एका समस्येने माझ्या संसारात चिंता उत्पन्न केली. माझ्या यजमानांना ह्रदयविकाराचा झटका आला. तातडीने उपचार व तपासणी करणे गरजेचे होते घरात होते फक्त २०० रूपये ही घटना वर्धिनीत समजली मात्र आणि सर्वजण माझ्या पाठीशी उभे राहिले. यजमानांचे मोठे ऑपरेशन झाले. त्यातून बरे होऊन ते आता रोजचे सर्व काम करायला लागले आहेत. या सर्व काळात संकटाचा खंबीरपणे मुकाबला कसा करायचा हेच नकळत मी वर्धिनीच्या कार्यकर्त्यांकडून शिकत होते.

सौ. स्वाती कारेकर

**नारायण गुरू** - अस्पृश्य जातीत जन्म. संस्कृत व वेदान्ताचे गहन अध्ययन. अस्पृश्यांकरता मंदिरे उभारली. त्या द्वारे हिंदू संघटनेचे कार्य व अस्पृश्यांच धर्मांतरण रोखण्याचा यशस्वी प्रयत्न.

पहिले सत्र झाले वर्धिनीच्या प्रार्थनेचा अर्थ समजावून सांगण्याचे. वर्धिनीत रोज म्हटली जाणारी प्रार्थना काय आहे? त्यातून काय परिणाम होणे अपेक्षित आहे? आजपर्यंतच्या कामातील या दृष्टीने अनुभव काय असा विषय वर्धिनीचे पूर्णवेळ कार्यकर्ते श्री. शिरीष पटवर्धन यांनी मांडला. सुमारे २५ महिला उपस्थित होत्या.

दुसऱ्या मासिक सत्रात श्रीमती प्रभाताई गणोरकरांच्या सत्काराचा कार्यक्रम झाला यासंबंधी वृत्त स्वतंत्रपणे दिले आहे.

तिसऱ्या एकत्रीकरणाचा कार्यक्रम शनिवार दि. १४ डिसेंबर रोजी झाला. डॉ. श्रृती दातार यांच्या कथाकथनाने सर्वांना मोहून टाकले. केवळ कथा सांगून त्यांनी उपस्थितांचे मनोरंजन केले नाही तर कथा कशी जन्माला येते, कथाकथनासाठी कोणती कौशल्ये आत्मसात करायला हवीत असाही विषय मांडला. या कथाकथनानंतर संस्कारभारती या संस्थेच्या यांनी भौमितीक आकारांवर आधारित मनोहारी रांगोळ्या काढून दाखविल्या. रंगावली प्रशिक्षण सुरू करण्याच्या दृष्टीने या प्रात्याक्षिकाचे आयोजन केले होते.

## सामंजस्याची कास धरू या

डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात सामाजिक समरसता मंचातर्फे आयोजित 'समरसता साहित्य संमेलन' झाले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून अनेक प्रतिनिधी या संमेलनासाठी आले होते. स्त्री साहित्य या विषयावर केंद्रित असलेल्या या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा होत्या विख्यात लेखिका आणि कवयित्री प्रभाताई गणोरकर. वर्धिनीचे काम हे सामाजिक समरसतेच्या भावनेतूनच सुरू झाले आणि त्याच भावनेतूनच काम चालते. अशा या अनौपचारिक शिक्षण प्रयोगाच्या प्रकल्पात प्रभाताईंचा सत्कार व्हावा व त्यांचे विचार ऐकायला मिळावेत या हेतूने एक कार्यक्रम निश्चित करण्यात आला. २२ नोव्हेंबर रोजी दुपारी हा कार्यक्रम झाला. सुमारे २ तास चाललेल्या ह्या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रभाताईंनी व्यक्त केलेले, त्यांच्या वैयक्तिक जीवनातून त्यांना भावलेले व्यक्ती जीवनाविषयीचे / सामाजिक जीवनाविषयीचे विचार आणि त्यानंतर झालेली मनमोकळी चर्चा. सुमारे ८८ महिला या कार्यक्रमाला उपस्थित होत्या. ज्या प्रश्नांभोवती ही चर्चा रंगली ते प्रश्न असे होते. ✻ बदलत्या परिस्थितीत घरातील स्त्रियांची भूमिका नेमकी काय असावी (नव्या काळात सासू-सून नाते प्रत्यक्ष कसे असावे?) ✻ स्त्रिया घराबाहेर पडायला लागल्याने निर्माण झालेली अनुकूलता व त्यातून निर्माण झालेले प्रश्न ✻ स्त्री मुक्ती आवश्यक की स्त्री शक्तीचे जागरण आवश्यक?

कार्यक्रमाला नवयुवतींपासून ते वयाची पंचाहत्तरी ओलांडलेल्या महिला उपस्थित असल्याने प्रत्येक पिढीतील प्रतिनिधी आपल्याला भेडसावणारे प्रश्न मांडत होत्या. वेगवेगळ्या वयोगटात असलेल्या महिलांचे प्रश्न त्यांच्या दृष्टीने योग्य असले तरी सर्व कुटुंबाचा विचार करताना शेवटी सामंजस्याची कास धरावीच लागते. सर्व प्रश्नांची उत्तरे देताना प्रभाताईंना एका दृष्टीने कसरतच करावी लागत होती आणि म्हणूनच आपल्या बोलण्याचा समारोप करताना त्यांनी हा सामंजस्याचा मुद्दा विस्ताराने सर्वांसमोर मांडला. झालेली चर्चा अपुरी आहे असे प्रभाताईंपासून उपस्थित असलेल्या सर्वांनाच वाटत होते. परंतु वेळेच्या मर्यादेमुळे प्रभाताईंचे आभार मानून हा कार्यक्रम संपला.

**ठक्कर बाप्पा** - वरीष्ठ अभियंता हे पद सोडून संपूर्ण जीवन वनवासींची दुर्दशा दूर करण्यासाठी व्यतीत. 'भारत सेवक समाज' 'भील सेवा मंडळ' या संस्थाद्वारे रचनात्मक कार्य.





## कठिण समय येता ...

सात वर्षांपूर्वी जरा भीतभीतच वर्धिनीच्या इमारतीत प्रवेश केला. वर्धिनीत चालणाऱ्या पाकोळी बालवाडीत काम करायची मनात इच्छा होती. या बालवाडीत मला काम मिळेल का? येथील वातावरण कसे असेल? 'स्व'-रूपवर्धिनी या नावाचा नेमका अर्थ काय आहे? असे अनेक प्रश्न मनात असताना त्याच गोंधळलेल्या मनस्थितीत वर्धिनीत प्रवेश केला. औपचारिक बोलण्यानंतर शिक्षिका म्हणून रूजू झाले. हळूहळू मुलांत मिसळू लागले. बालवाडीतल्या चिमुकल्या मुलांपासून वयाने ज्येष्ठ असलेल्या कार्यकर्त्यांशी अनौपचारिक संवाद सुरू झाले.

आज असं स्पष्टपणे जाणवतंय की बालवाडीतल्या चिमुकल्या पाकोळयांपासून वर्धिनीतल्या मोठ्या अनुभवी कार्यकर्त्यांकडून कितीतरी गोष्टी मी शिकले आहे. माझ्या रूपाची मला ओळख होते आहे. हे म्हणताना कितीतरी प्रसंग डोळ्यासमोर आहेत.

थंडीच्या दिवसात माझ्या वर्गातील चिमुरड्यांना सांगितले की रोज स्वेटर, मोजे, कानटोपी घालून यायचे; नाहीतर थंडीचा त्रास होईल. खरोखरीच त्याप्रमाणे कपडे वापरू लागली. पण एक दिवस या मुलांनी मला कोंडीत पकडले. मी स्वेटर घातला नव्हता. मुलं म्हणाली बाई तुम्ही स्वेटर घालत नाही, आजारी पडाल की! मला रोज स्वेटर घालावाच लागला. असेच एकदा नव्याने बालवाडीत आलेल्या व रडणाऱ्या मुलाच्या आईला मी म्हटले की हा जर रोज शाळेत आला तर मी याला बक्षिस देईन. एक दिवस हा चिमुरडा आईवडिलांना घेऊन घरी आला. मला समजेना हा कशासाठी आला आहे ? मी विचारले तर म्हणाला बाई तुम्ही मला बक्षिस देणार आहात ना? आपण शब्दाला पक्के असले पाहिजे, हे या चिमुरड्यांनी मला शिकवलं ! अशा आनंदी वातावरणात दिवस कसे जात होते मला समजलेच नाही. पण गेल्या वर्षी मात्र एक दिवस एका समस्येने माझ्या संसारात चिंता उत्पन्न केली. माझ्या यजमानांना हृदयविकाराचा झटका आला. तातडीने उपचार व तपासणी करणे गरजेचे होते घरात होते फक्त २०० रूपये ही घटना वर्धिनीत समजली मात्र आणि सर्वजण माझ्या पाठीशी उभे राहिले. यजमानांचे मोठे ऑपरेशन झाले. त्यातून बरे होऊन ते आता रोजचे सर्व काम करायला लागले आहेत. या सर्व काळात संकटाचा खंबीरपणे मुकाबला कसा करायचा हेच नकळत मी वर्धिनीच्या कार्यकर्त्यांकडून शिकत होते.

सौ. स्वाती कारेकर

**नारायण गुरू** - अस्पृश्य जातीत जन्म. संस्कृत व वेदान्ताचे गहन अध्ययन. अस्पृश्यांकरता मंदिरे उभारली. त्या द्वारे हिंदू संघटनेचे कार्य व अस्पृश्यांच धर्मांतरण रोखण्याचा यशस्वी प्रयत्न.

## फिरती प्रयोगशाळा आणि ग्रामविकास विभाग

मुळशी खोऱ्यातील खेचरे, शेरे, पौड, चाले, कोळवण, काशिग, आसदे या गावांशी आपला संपर्क आहे. १९९६पासून हा प्रकल्प सुरू असून या निमित्ताने ग्रामीण विद्यार्थ्यांची विशेषतः विद्यार्थिनींची शिक्षणातील ओढ, धडपड जवळून अनुभवायला मिळते. शैक्षणिक मार्गदर्शनाच्या निमित्ताने संपर्कात आलेल्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अन्य उपक्रम घेण्याची संधी यानिमित्ताने मिळते. ग्रामीण भागात भेडसावणाऱ्या समस्यांची जाणीव तेथे सतत जाण्याने कार्यकर्त्यांना/ वर्धकांना होत रहाते. किंबहुना अशा जाणिवांचा विकास हाच अधिक काम करायला प्रेरणा देत रहातो. या प्रकल्पातील कामांचा हा गेल्या वर्षातील आढावा-

❊ **साप्ताहिक आरोग्य केंद्र** - डॉ. सौ. दड्डी व डॉ. सौ. कोठारी यांच्या सहकार्यामुळे काशिग येथे आठवड्यातून दोन दिवस वैद्यकीय केंद्र चालविले जाते. रूग्णांची उपस्थिती सामान्यपणे वीस असते.

❊ **शैक्षणिक मार्गदर्शन**

दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी व गणित या दोन विषयांच्या संपूर्ण उजळणीवर विशेष भर देण्यात आला. या उजळणीचा बहुतेक सर्व शाळांच्या सरावपरीक्षेमध्ये चांगला परिणाम दिसून आला.

❊ **सर्वांगीण विकासाच्या दिशेने**

'स्व'-रूपवर्धिनीचा मूळ उद्देश 'स्व' ला जागृत करण्याचा आहे. हे जागृत झालेले व्यक्तिमत्त्व व्यक्तिगत जीवनात यशस्वी होण्याबरोबरच समाजाच्या विकासासाठी धडपडणारे असावे; हा या सर्व धडपडीमागचा हेतू आहे. हाच उद्देश वर्धिनीच्या सर्व प्रकल्पांचा आहे. फिरत्या प्रयोगशाळेच्या या वर्षीच्या उपक्रम धडपडीत 'शेरे' येथील साप्ताहिक शाखेत खेळ, व्याख्याने, प्रश्नमंजूषा, पुस्तकवाचन असे अनेक उपक्रम घेण्यात आले. यापैकी सौ. बागेश्री पोंक्षे यांनी 'एक होता कार्व्हर' हे सांगितलेले चरित्र मुलांना फारच भावले. तसेच खेचरे गावातील मुलांसाठी चालविलेल्या पेटीवाचनालय उपक्रमाला मुलांचा मिळालेला प्रतिसाद उत्साह वाढविणारा होता. मुलांची वाचनाची आवड व धडपड पाहून शाळेतील शिक्षकही वाचनालयाच्या पुस्तकांची मागणी करायला लागले.

**दहावी झाली पुढे काय ?**



विद्यार्थी दहावीत गेला की चहुबाजूने त्याच्यावर अभ्यासाचे दडपण येते. कधी एकदा दहावीची परीक्षा होते, असे त्या विद्यार्थ्यांना वाटत असते. नंतरची सुटी कशी जाते हे समजतही नाही. निकालाचा दिवस आला की मग विषय सुरू होतो. "१०वी नंतर काय?" वर्षभर अभ्यासाच्या दडपणाखाली गोंधळलेल्या विद्यार्थ्यांपुढे हा प्रश्न आणखी सतावणारा ठरतो. ही मनस्थिती शहरातही असते व खेड्यातही असते. शहरात किमान वेगवेगळ्या वाटा आणि त्या दाखविणारी माणसे उपलब्ध होऊ शकतात; पण ग्रामीण भागात जिथे मूलभूत शैक्षणिक सुविधासुध्दा पूर्णपणे पोहोचलेल्या नाहीत तेथे ह्या प्रश्नांची दाहकता अधिक असते. ग्रामीण भागात गेल्या ६-७ वर्षांपासून काम करताना हे जाणवत होतेच. या वर्षी १०वी निकालाच्या दिवशीच १०वी उत्तीर्ण व अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना एका कार्यक्रमाचे निमंत्रण दिले. १४ मे रोजी पौड येथील शिवछत्रपती विद्यालयामध्ये न्यू इंग्लिश स्कूल, टिळकरोड या शाळेतील शिक्षक व समुपदेशनाचे स्वयंस्फुर्तीने काम करणारे श्री.अरूण कुंभार यांचे मुलांसमोर व्याख्यान झाले. कार्यक्रमाला ४ गावातील २५ विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी मोकळेपणाने आपले प्रश्न मांडले.

> **सेनापती बापट** - क्रांतीकारक चळवळीत सक्रीय सहभाग. नंतर समाजसेवेच्या कामाला वाहून घेतले. सार्वजनिक स्वच्छता, रस्ते सफाईसारख्या कामांच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांबावत जनजागृतीचे कार्य.





## स्पर्धा परीक्षा केंद्र

'सामाजिक जाणिवेचे नेतृत्व घडविणे' हा या केंद्राचा उद्देश आहे. या दिशेने या वर्षी झालेल्या वाटचालीचा वृत्तांत-

या वर्षी सुमारे २५० विद्यार्थ्यांनी केंद्राचा लाभ घेतला. आतापर्यंत पूर्वपरीक्षेच्या एकूण तीन तुकड्यांना व मुख्यपरीक्षेच्या एका तुकडीला मार्गदर्शन करण्यात आले आहे. मार्गदर्शनासाठी अनुभवी व तज्ज्ञ शिक्षक व प्राध्यापकांचा मिळणारा सहभाग खूप मोलाचा ठरेल, असा विश्वास वाटतो.

अभ्यासविषयक मार्गदर्शनाबरोबरच प्रेरणा-जागरण सभांचेही आयोजन केंद्रामार्फत केले गेले. प्रशासनात कशासाठी अधिकारी म्हणून जायचे? प्रशासनात काम कसे करावे लागते? अशा विषयांवर शिक्षण क्षेत्रातील तसेच प्रशासनात अधिकारी म्हणून प्रत्यक्ष काम करणाऱ्या तसेच निवृत्त झालेल्या काही तज्ज्ञ व्यक्तींनी मार्गदर्शन केले. या वर्षी केंद्रातील विद्यार्थ्यांना खालील तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले.

- ✯ श्री. महेशगौरी सहआयुक्त, पुणे पोलीस
- ✯ डॉ. धनागरे, निवृत्त कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- ✯ श्री. तुषार ठोंबरे, उपजिल्हाधिकारी, पुणे
- ✯ श्री. शैलेश सुर्यवंशी, तहसिलदार
- ✯ कु. दीपाली सडेकर, उपसंचालक (अर्थ- उच्च माध्य.शिक्षण संचालनालय)
- ✯ श्री. अनिल पाटील
- ✯ प्रा. डॉ. श्री. विवेक कुलकर्णी
- ✯ सौ. सविताताई कुलकर्णी

**साधना - एकाग्रतेसाठी**

शासनात अधिकारी म्हणून जायचे तर परीक्षांमध्ये यशस्वी व्हावे लागेलच. भरपूर अभ्यास चांगल्या मनस्थितीत आणि नियमित व्हायला हवा असे या

> **र.धो. कर्वे** - समाजस्वास्थ्यासाठी संततिनियमन व लैंगिक शिक्षण यासंबंधी बुध्दीवादी दृष्टीकोनातून विचार मांडले व या क्षेत्रात प्रत्यक्ष काम केले. समाजाचा रोष सहन केला परंतू देशहिताच्या दृष्टीकोनातून या विषयालाच जीवन सर्वस्व वनविले.

## फिरती प्रयोगशाळा आणि ग्रामविकास विभाग

मुळशी खोऱ्यातील खेचरे, शेरे, पौड, चाले, कोळवण, काशिग, आसदे या गावांशी आपला संपर्क आहे. १९९६पासून हा प्रकल्प सुरू असून या निमित्ताने ग्रामीण विद्यार्थ्यांची विशेषतः विद्यार्थिनींची शिक्षणातील ओढ, धडपड जवळून अनुभवायला मिळते. शैक्षणिक मार्गदर्शनाच्या निमित्ताने संपर्कात आलेल्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अन्य उपक्रम घेण्याची संधी यानिमित्ताने मिळते. ग्रामीण भागात भेडसावणाऱ्या समस्यांची जाणीव तेथे सतत जाण्याने कार्यकर्त्यांना/ वर्धकांना होत रहाते. किंबहुना अशा जाणिवांचा विकास हाच अधिक काम करायला प्रेरणा देत रहातो. या प्रकल्पातील कामांचा हा गेल्या वर्षातील आढावा-

❊ **साप्ताहिक आरोग्य केंद्र** - डॉ. सौ. दड्डी व डॉ. सौ. कोठारी यांच्या सहकार्यामुळे काशिग येथे आठवड्यातून दोन दिवस वैद्यकीय केंद्र चालविले जाते. रूग्णांची उपस्थिती सामान्यपणे वीस असते.

❊ **शैक्षणिक मार्गदर्शन**

दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी व गणित या दोन विषयांच्या संपूर्ण उजळणीवर विशेष भर देण्यात आला. या उजळणीचा बहुतेक सर्व शाळांच्या सरावपरीक्षेमध्ये चांगला परिणाम दिसून आला.

❊ **सर्वांगीण विकासाच्या दिशेने**

'स्व'-रूपवर्धिनीचा मूळ उद्देश 'स्व' ला जागृत करण्याचा आहे. हे जागृत झालेले व्यक्तिमत्त्व व्यक्तिगत जीवनात यशस्वी होण्याबरोबरच समाजाच्या विकासासाठी धडपडणारे असावे; हा या सर्व धडपडीमागचा हेतू आहे. हाच उद्देश वर्धिनीच्या सर्व प्रकल्पांचा आहे. फिरत्या प्रयोगशाळेच्या या वर्षीच्या उपक्रम धडपडीत 'शेरे' येथील साप्ताहिक शाखेत खेळ, व्याख्याने, प्रश्नमंजूषा, पुस्तकवाचन असे अनेक उपक्रम घेण्यात आले. यापैकी सौ. बागेश्री पोंक्षे यांनी 'एक होता कार्व्हर' हे सांगितलेले चरित्र मुलांना फारच भावले. तसेच खेचरे गावातील मुलांसाठी चालविलेल्या पेटीवाचनालय उपक्रमाला मुलांचा मिळालेला प्रतिसाद उत्साह वाढविणारा होता. मुलांची वाचनाची आवड व धडपड पाहून शाळेतील शिक्षकही वाचनालयाच्या पुस्तकांची मागणी करायला लागले.

**दहावी झाली पुढे काय ?**



विद्यार्थी दहावीत गेला की चहुबाजूने त्याच्यावर अभ्यासाचे दडपण येते. कधी एकदा दहावीची परीक्षा होते, असे त्या विद्यार्थ्यांना वाटत असते. नंतरची सुटी कशी जाते हे समजतही नाही. निकालाचा दिवस आला की मग विषय सुरू होतो. "१०वी नंतर काय?" वर्षभर अभ्यासाच्या दडपणाखाली गोंधळलेल्या विद्यार्थ्यांपुढे हा प्रश्न आणखी सतावणारा ठरतो. ही मनस्थिती शहरातही असते व खेड्यातही असते. शहरात किमान वेगवेगळ्या वाटा आणि त्या दाखविणारी माणसे उपलब्ध होऊ शकतात; पण ग्रामीण भागात जिथे मूलभूत शैक्षणिक सुविधासुध्दा पूर्णपणे पोहोचलेल्या नाहीत तेथे ह्या प्रश्नांची दाहकता अधिक असते. ग्रामीण भागात गेल्या ६-७ वर्षांपासून काम करताना हे जाणवत होतेच. या वर्षी १०वी निकालाच्या दिवशीच १०वी उत्तीर्ण व अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना एका कार्यक्रमाचे निमंत्रण दिले. १४ मे रोजी पौड येथील शिवछत्रपती विद्यालयामध्ये न्यू इंग्लिश स्कूल, टिळकरोड या शाळेतील शिक्षक व समुपदेशनाचे स्वयंस्फुर्तीने काम करणारे श्री.अरूण कुंभार यांचे मुलांसमोर व्याख्यान झाले. कार्यक्रमाला ४ गावातील २५ विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी मोकळेपणाने आपले प्रश्न मांडले.

**सेनापती बापट** - क्रांतीकारक चळवळीत सक्रीय सहभाग. नंतर समाजसेवेच्या कामाला वाहून घेतले. सार्वजनिक स्वच्छता, रस्ते सफाईसारख्या कामांच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांबावत जनजागृतीचे कार्य.





## स्पर्धा परीक्षा केंद्र

'सामाजिक जाणिवेचे नेतृत्व घडविणे' हा या केंद्राचा उद्देश आहे. या दिशेने या वर्षी झालेल्या वाटचालीचा वृत्तांत-

या वर्षी सुमारे २५० विद्यार्थ्यांनी केंद्राचा लाभ घेतला. आतापर्यंत पूर्वपरीक्षेच्या एकूण तीन तुकड्यांना व मुख्यपरीक्षेच्या एका तुकडीला मार्गदर्शन करण्यात आले आहे. मार्गदर्शनासाठी अनुभवी व तज्ज्ञ शिक्षक व प्राध्यापकांचा मिळणारा सहभाग खूप मोलाचा ठरेल, असा विश्वास वाटतो.

अभ्यासविषयक मार्गदर्शनाबरोबरच प्रेरणा-जागरण सभांचेही आयोजन केंद्रामार्फत केले गेले. प्रशासनात कशासाठी अधिकारी म्हणून जायचे? प्रशासनात काम कसे करावे लागते? अशा विषयांवर शिक्षण क्षेत्रातील तसेच प्रशासनात अधिकारी म्हणून प्रत्यक्ष काम करणाऱ्या तसेच निवृत्त झालेल्या काही तज्ज्ञ व्यक्तींनी मार्गदर्शन केले. या वर्षी केंद्रातील विद्यार्थ्यांना खालील तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले.

- ✯ श्री. महेशगौरी सहआयुक्त, पुणे पोलीस
- ✯ डॉ. धनागरे, निवृत्त कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- ✯ श्री. तुषार ठोंबरे, उपजिल्हाधिकारी, पुणे
- ✯ श्री. शैलेश सुर्यवंशी, तहसिलदार
- ✯ कु. दीपाली सडेकर, उपसंचालक (अर्थ- उच्च माध्य.शिक्षण संचालनालय)
- ✯ श्री. अनिल पाटील
- ✯ प्रा. डॉ. श्री. विवेक कुलकर्णी
- ✯ सौ. सविताताई कुलकर्णी

**साधना - एकाग्रतेसाठी**

शासनात अधिकारी म्हणून जायचे तर परीक्षांमध्ये यशस्वी व्हावे लागेलच. भरपूर अभ्यास चांगल्या मनस्थितीत आणि नियमित व्हायला हवा असे या

**र.धो. कर्वे** - समाजस्वास्थ्यासाठी संततिनियमन व लैंगिक शिक्षण यासंवंधी बुध्दीवादी दृष्टीकोनातून विचार मांडले व या क्षेत्रात प्रत्यक्ष काम केले. समाजाचा रोष सहन केला परंतू देशहिताच्या दृष्टीकोनातून या विषयालाच जीवन सर्वस्व वनविले.

केंद्रातील प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात असतेच. त्यांची ही इच्छा अधिक सफल करण्यासाठी रोज मार्गदर्शन तासिका सुरू होण्यापूर्वीही ओमकार उपासना होते. उपासनेनंतर काही प्रेरणादायी लेखांचे वाचन अथवा ज्येष्ठ कार्यकर्त्यांचे मार्गदर्शन अशा कार्यक्रमाची रचना या वर्षी करण्यात आली होती.

### घरापासून दूर असूनही ...

महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यातून, अनेक ग्रामीण भागातून आलेले विद्यार्थी या केंद्रात मार्गदर्शनाचा लाभ घेत आहेत. दूर ठिकाणाहून आलेल्या या विद्यार्थ्यांना त्यांची राहण्याची व्यवस्था, जेवणाची व्यवस्था अशा बाबतीतही योग्य ते मार्गदर्शन, सहाय्य केंद्रामार्फत केले जाते. प्रत्येकाची चौकशी वेळोवेळी तर केली जातेच पण त्यांच्या वाढदिवसाच्या दिवशी त्यांना आठवणीने शुभेच्छाही दिल्या जातात. वाढदिवसानिमित्त त्यांनी एखादा संकल्प करावा असा आग्रह केला जातो. अशा छोट्या छोट्या गोष्टींमुळे आपण घरापासून खूप दूर नाही, अशी भावना विद्यार्थ्यांची होते असा अनुभव येतो.

### ग्रंथालय आणि अभ्यासिका

हे आपल्या केंद्राचे वैशिष्ट्य. किमान ७०० पुस्तके या केंद्राच्या ग्रंथालयात आहेत. अभ्यासिकेची स्वतंत्र व्यवस्था आहे. सकाळी ८ पासून ते मध्यरात्रीपर्यंत या अभ्यासिकेचा लाभ केंद्रातील आणि अन्य विद्यार्थी घेतात. या वर्षी सुमारे २०० विद्यार्थ्यांनी अभ्यासिका व्यवस्थेचा लाभ घेतला. या अभ्यासिकेत नोकरी-व्यवसाय करून अभ्यासाला येणारे विद्यार्थीही आहेत. यातील दोन विद्यार्थी विशेष श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

### यशाच्या दिशेने

केंद्र सुरू होऊन दोनच वर्षे पूर्ण झाली आहेत. परंतु येथील वातावरणाचा परिणाम हळूहळू जाणवू लागला आहे. यशाच्या दिशेने काही पावले निश्चित पडली आहेत.

आपल्या केंद्रातील सचिन गावडे हे पोलीस उपनिरिक्षक पदाच्या परीक्षेत महाराष्ट्रात १६ वे आले, तर चौघांची निवड केंद्रीय राखीव पोलीस दलात अधिकारी म्हणून नुकतीच झाली आहे.

---

**हेल्पर्स फॉर हॅन्डीकॅप्स** या संस्थेचा सर्व कारभार देणग्यांवर चालतो. पण देणग्यांवर, समाजाच्या आधारावर काम करणाऱ्यांना अंतर्मुख करायला लावणारी ही एक घटना! संस्थेचे काम पहाताना तेथील शिस्त जाणवत होतीच. प्रत्येक गोष्टीची नोंद ठेवण्याची तेथील पध्दत खूपच आवडली. एक एक विभागाचे काम कसे चालते ते पहात आम्ही भांडार विभागात गेलो. केवळ धान्य व इतर सामानाची आवक जावक एवढ्याच नोंदी नव्हत्या तर, रोजच्या जेवणातील उरलेल्या अन्नाची नोंद ठेवणारे एक रजिस्टर आम्ही पाहिले. हे रजिस्टर पाहिल्यावर आम्ही विचारले ताई या नोंदींची काय आवश्यकता? त्या म्हणाल्या, "अर्धीसुध्दा पोळी वाया जाणे म्हणजे समाजाचा विश्वासघात! ज्या समाजाच्या आधारावर हे काम चालते, त्या समाजाने दिलेल्या प्रत्येक पैशाचा विनियोग योग्यच झाला पाहिजे; हा कटाक्ष आम्ही पाळतो. म्हणूनच उरलेल्या अन्नाची नोंद होते व दुसऱ्या दिवशी त्याचा विनियोग कसा झाला याचीही नोंद होते. तसेच अन्न वाया जाऊ नये याचीही काळजी घेतली जाते".

**कर्मवीर भाऊराव पाटील** - शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे साधन मानून बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी 'रयत शिक्षण संस्थेच्या ' माध्यमातून शिक्षणप्रसाराला वाहून घेतले. विद्यार्थ्यांच्या मनात स्वाभिमान जागवण्यासाठी 'कमवा व शिका' ही स्वावलंबन योजना राबवली.



'स्व'-रूपवर्धिनी कार्यवृत्त २००२

## घडावी विवेकी कृती ध्यास हा ...

कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. धनागरे यांची दि. ३ फेब्रुवारी, २००२ रोजी 'स्व'-रूपवर्धिनीला भेट झाली. निमित्त होते स्पर्धापरीक्षा केंद्रातील विद्यार्थ्यांशी संवादाचे.

शासनामध्ये उच्च पदांवर अधिकारी म्हणून काम करताना आलेले अनुभव त्यांनी विद्यार्थ्यांसमोर मोकळेपणाने मांडले. विशेषत: शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून पदभार स्विकारल्यानंतर जे जे अनुभव आले, कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून काम करताना आलेल्या धमक्यांना कसे सामोरे जावे लागले, याचे अनुभव त्यांनी मांडले. ते मांडत असताना आपण शासनाच्या नियमांचे जर कठोरपणाने पालन करीत असू तर, तुमच्या विरोधात कितीही आरडाओरडा झाला तरी तुम्हाला कोणी धक्का लावू शकत नाही हे स्वानुभवातून सांगितले. त्यांच्या कुलगुरू पदाच्या काळातील संघर्ष हा प्रामुख्याने भ्रष्टाचाराविरूध्द, राजकीय वजन वापरून विद्यापीठाचा मुक्त वापर करणाऱ्याविरूध्द होता. यातील काही अनुभव पुढीलप्रमाणे :

१) एका राजकीय पक्षाच्या अ.भा. अध्यक्षांच्या सभेसाठी विद्यापीठाचे मैदान सभेसाठी त्या पक्षाला हवे होते. त्या पक्षाच्या मंत्र्याने प्रसंगी धमकी देऊन मैदान मागितले, पण कुलगुरू बधत नाही हे पाहून राज्यपालांच्यामार्फत घडवून आणण्याचा प्रयत्न केला. डॉ. धनागरे हे नियमाने बांधील आहेत याची जाणीव असल्याने राज्यपालांनी त्यांना असे करण्यास भाग पाडले नाही. आडूनआडून सुचवण्याचा प्रयत्न केला परंतु डॉ. धनागरे यांच्या ठाम नकारापुढे त्यांचेही काही चालले नाही.

२) कॉपी प्रकरणात पकडल्या गेलेल्यांमध्ये उच्चपदस्थांच्या मुलांचा समावेश होता. त्यात विद्यापीठातील काही कर्मचारीही सामील होते. परंतु अत्यंत कठोरपणाने या सर्वांवर त्यांनी कायदेशीर कारवाई केली.

असे काही अनुभव सांगताना ते म्हणाले की, कोल्हापूर येथे कुस्ती हा आवडता खेळ आहे, हे कोल्हापूर येथे जाताना माहीती होते. परंतु गेल्यापासून पाच वर्षे सतत कुस्तीच खेळावी लागेल याची कल्पना नव्हती!

विद्यार्थ्यांना उद्देशून ते म्हणाले की, जे शासनाचे नियम आहेत त्याचे अधिकारी म्हणून काम करताना अत्यंत कठोरपणाने पालन तुम्ही केलेत तर तुमच्या विरूध्द कोणीही काहीही करू शकत नाही. पण जर तुम्ही वाकलात, नियमात तडजोड केली, कोणाला सवलत दिली तर, राजकीय क्षेत्रातील लोक तसेच तथाकथित उच्चपदस्थ याचा त्यांच्या सोयीसाठी गैरवापर करतात. नियम काय आहे आणि आपली सद्सद्विवेकबुध्दी काय सांगते याचा विचार करूनच अधिकाऱ्याने निर्णय घ्यावा, असे त्यांनी अनुभवातून सांगितले.

स्पर्धा परीक्षेमध्ये निवड करताना फार भ्रष्टाचार होतो असा समज विद्यार्थ्यांमध्ये असतो. स्वत: स्पर्धा परीक्षा समितीवर काम केलेले असल्याने त्यांनी हे सांगितले की तुमची जर गुणवत्ता वरची असेल तर, तुम्हाला कोणीही डावलू शकत नाही आणि त्यामुळे आवश्यक तेवढी गुणवत्ता प्राप्त करणे याचा विद्यार्थ्यांनी अधिक विचार करावा.

यावेळी झालेल्या प्रश्नोत्तरांमध्ये शिवाजी विद्यापीठातून पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांनी काही प्रश्न विद्यापीठाच्या कारभारा संदर्भात उपस्थित केले. त्या सर्व प्रश्नांचीही त्यांनी सविस्तर उत्तरे दिली. अधिकाधिक महाविद्यालयांना भेट देणारे कुलगुरू अशी त्यांची प्रतिमा कशी निर्माण झाली, या भेटींचा कसा उपयोग झाला, याचेही काही अनुभव त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. दीड-दोन तास रंगलेला हा कार्यक्रम थोड्या अपुऱ्या भेटीच्या हुरहुरीतच थांबवावा लागला. परंतु पुन: भेट द्यायचे त्यांनी मान्य केले, याचा विद्यार्थ्यांना खूप आनंद झाला.

**डॉ. शिवाजीराव पटवर्धन** - सविनय कायदेभंग चळवळीत सहभाग. सक्तमजुरीही भोगली. तपोवन या कुष्ठरूग्णांच्या पुनर्वसनासाठी स्थापन केलेल्या संस्थेच्या माध्यमातून कुष्ठरूग्णांची सेवा हीच खरी ईश्वराची सेवा या निष्ठेने आयुष्याच्या अखेरीपर्यंत काम केले.

केंद्रातील प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात असतेच. त्यांची ही इच्छा अधिक सफल करण्यासाठी रोज मार्गदर्शन तासिका सुरू होण्यापूर्वीही ओमकार उपासना होते. उपासनेनंतर काही प्रेरणादायी लेखांचे वाचन अथवा ज्येष्ठ कार्यकर्त्यांचे मार्गदर्शन अशा कार्यक्रमाची रचना या वर्षी करण्यात आली होती.

### घरापासून दूर असूनही ...

महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यातून, अनेक ग्रामीण भागातून आलेले विद्यार्थी या केंद्रात मार्गदर्शनाचा लाभ घेत आहेत. दूर ठिकाणाहून आलेल्या या विद्यार्थ्यांना त्यांची राहण्याची व्यवस्था, जेवणाची व्यवस्था अशा बाबतीतही योग्य ते मार्गदर्शन, सहाय्य केंद्रामार्फत केले जाते. प्रत्येकाची चौकशी वेळोवेळी तर केली जातेच पण त्यांच्या वाढदिवसाच्या दिवशी त्यांना आठवणीने शुभेच्छाही दिल्या जातात. वाढदिवसानिमित्त त्यांनी एखादा संकल्प करावा असा आग्रह केला जातो. अशा छोट्या छोट्या गोष्टींमुळे आपण घरापासून खूप दूर नाही, अशी भावना विद्यार्थ्यांची होते असा अनुभव येतो.

### ग्रंथालय आणि अभ्यासिका

हे आपल्या केंद्राचे वैशिष्ट्य. किमान ७०० पुस्तके या केंद्राच्या ग्रंथालयात आहेत. अभ्यासिकेची स्वतंत्र व्यवस्था आहे. सकाळी ८ पासून ते मध्यरात्रीपर्यंत या अभ्यासिकेचा लाभ केंद्रातील आणि अन्य विद्यार्थी घेतात. या वर्षी सुमारे २०० विद्यार्थ्यांनी अभ्यासिका व्यवस्थेचा लाभ घेतला. या अभ्यासिकेत नोकरी-व्यवसाय करून अभ्यासाला येणारे विद्यार्थीही आहेत. यातील दोन विद्यार्थी विशेष श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

### यशाच्या दिशेने

केंद्र सुरू होऊन दोनच वर्षे पूर्ण झाली आहेत. परंतु येथील वातावरणाचा परिणाम हळूहळू जाणवू लागला आहे. यशाच्या दिशेने काही पावले निश्चित पडली आहेत.

आपल्या केंद्रातील सचिन गावडे हे पोलीस उपनिरिक्षक पदाच्या परीक्षेत महाराष्ट्रात १६ वे आले; तर चौघांची निवड केंद्रीय राखीव पोलीस दलात अधिकारी म्हणून नुकतीच झाली आहे.

---

**हेल्पर्स फॉर हॅन्डीकॅप्स** या संस्थेचा सर्व कारभार देणग्यांवर चालतो. पण देणग्यांवर, समाजाच्या आधारावर काम करणाऱ्यांना अंतर्मुख करायला लावणारी ही एक घटना! संस्थेचे काम पहाताना तेथील शिस्त जाणवत होतीच. प्रत्येक गोष्टीची नोंद ठेवण्याची तेथील पध्दत खूपच आवडली. एक एक विभागाचे काम कसे चालते ते पहात आम्ही भांडार विभागात गेलो. केवळ धान्य व इतर सामानाची आवक जावक एवढ्याच नोंदी नव्हत्या तर, रोजच्या जेवणातील उरलेल्या अन्नाची नोंद ठेवणारे एक रजिस्टर आम्ही पाहिले. हे रजिस्टर पाहिल्यावर आम्ही विचारले ताई या नोंदींची काय आवश्यकता? त्या म्हणाल्या, "अर्धीसुध्दा पोळी वाया जाणे म्हणजे समाजाचा विश्वासघात! ज्या समाजाच्या आधारावर हे काम चालते, त्या समाजाने दिलेल्या प्रत्येक पैशाचा विनियोग योग्यच झाला पाहिजे, हा कटाक्ष आम्ही पाळतो. म्हणूनच उरलेल्या अन्नाची नोंद होते व दुसऱ्या दिवशी त्याचा विनियोग कसा झाला याचीही नोंद होते. तसेच अन्न वाया जाऊ नये याचीही काळजी घेतली जाते".

**कर्मवीर भाऊराव पाटील** - शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे साधन मानून बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी 'रयत शिक्षण संस्थेच्या ' माध्यमातून शिक्षणप्रसाराला वाहून घेतले. विद्यार्थ्यांच्या मनात स्वाभिमान जागवण्यासाठी 'कमवा व शिका' ही स्वावलंबन योजना राबवली.





## घडावी विवेकी कृती ध्यास हा ...

कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. धनागरे यांची दि. ३ फेब्रुवारी, २००२ रोजी 'स्व'-रूपवर्धिनीला भेट झाली. निमित्त होते स्पर्धापरीक्षा केंद्रातील विद्यार्थ्यांशी संवादाचे.

शासनामध्ये उच्च पदांवर अधिकारी म्हणून काम करताना आलेले अनुभव त्यांनी विद्यार्थ्यांसमोर मोकळेपणाने मांडले. विशेषतः शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून पदभार स्विकारल्यानंतर जे जे अनुभव आले, कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून काम करताना आलेल्या धमक्यांना कसे सामोरे जावे लागले, याचे अनुभव त्यांनी मांडले. ते मांडत असताना आपण शासनाच्या नियमांचे जर कठोरपणाने पालन करीत असू तर, तुमच्या विरोधात कितीही आरडाओरडा झाला तरी तुम्हाला कोणी धक्का लावू शकत नाही हे स्वानुभवातून सांगितले. त्यांच्या कुलगुरू पदाच्या काळातील संघर्ष हा प्रामुख्याने भ्रष्टाचाराविरूध्द, राजकीय वजन वापरून विद्यापीठाचा मुक्त वापर करणाऱ्यांविरूध्द होता. यातील काही अनुभव पुढीलप्रमाणे :

१) एका राजकीय पक्षाच्या अ.भा. अध्यक्षांच्या सभेसाठी विद्यापीठाचे मैदान सभेसाठी त्या पक्षाला हवे होते. त्या पक्षाच्या मंत्र्याने प्रसंगी धमकी देऊन मैदान मागितले, पण कुलगुरू बधत नाही हे पाहून राज्यपालांच्यामार्फत घडवून आणण्याचा प्रयत्न केला. डॉ. धनागरे हे नियमाने बांधील आहेत याची जाणीव असल्याने राज्यपालांनी त्यांना असे करण्यास भाग पाडले नाही. आडूनआडून सुचवण्याचा प्रयत्न केला परंतु डॉ. धनागरे यांच्या ठाम नकारापुढे त्यांचेही काही चालले नाही.

२) कॉपी प्रकरणात पकडल्या गेलेल्यांमध्ये उच्चपदस्थांच्या मुलांचा समावेश होता. त्यात विद्यापीठातील काही कर्मचारीही सामील होते. परंतु अत्यंत कठोरपणाने या सर्वांवर त्यांनी कायदेशीर कारवाई केली.

असे काही अनुभव सांगताना ते म्हणाले की, कोल्हापूर येथे कुस्ती हा आवडता खेळ आहे, हे कोल्हापूर येथे जाताना माहीती होते. परंतु गेल्यापासून पाच वर्षे सतत कुस्तीच खेळावी लागेल याची कल्पना नव्हती!

विद्यार्थ्यांना उद्देशून ते म्हणाले की, जे शासनाचे नियम आहेत त्यांचे अधिकारी म्हणून काम करताना अत्यंत कठोरपणाने पालन तुम्ही केलेत तर तुमच्या विरूध्द कोणीही काहीही करू शकत नाही. पण जर तुम्ही वाकलात, नियमात तडजोड केली, कोणाला सवलत दिली तर, राजकीय क्षेत्रातील लोक तसेच तथाकथित उच्चपदस्थ याचा त्यांच्या सोयीसाठी गैरवापर करतात. नियम काय आहे आणि आपली सद्सद्विवेकबुध्दी काय सांगते याचा विचार करूनच अधिकाऱ्याने निर्णय घ्यावा, असे त्यांनी अनुभवातून सांगितले.

स्पर्धा परीक्षेमध्ये निवड करताना फार भ्रष्टाचार होतो असा समज विद्यार्थ्यांमध्ये असतो. स्वतः स्पर्धा परीक्षा समितीवर काम केलेले असल्याने त्यांनी हे सांगितले की तुमची जर गुणवत्ता वरची असेल तर, तुम्हाला कोणीही डावलू शकत नाही आणि त्यामुळे आवश्यक तेवढी गुणवत्ता प्राप्त करणे याचा विद्यार्थ्यांनी अधिक विचार करावा.

यावेळी झालेल्या प्रश्नोत्तरामध्ये शिवाजी विद्यापीठातून पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांनी काही प्रश्न विद्यापीठाच्या कारभारा संदर्भात उपस्थित केले. त्या सर्व प्रश्नांचीही त्यांनी सविस्तर उत्तरे दिली. अधिकाधिक महाविद्यालयांना भेट देणारे कुलगुरू अशी त्यांची प्रतिमा कशी निर्माण झाली, या भेटींचा कसा उपयोग झाला, याचेही काही अनुभव त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. दीड-दोन तास रंगलेला हा कार्यक्रम थोड्या अपुऱ्या भेटीच्या हुरहुरीतच थांबवावा लागला. परंतु पुनः भेट द्यायचे त्यांनी मान्य केले, याचा विद्यार्थ्यांना खूप आनंद झाला.

**डॉ. शिवाजीराव पटवर्धन** - सविनय कायदेभंग चळवळीत सहभाग. सक्तमजुरीही भोगली. तपोवन या कुष्ठरूग्णांच्या पुनर्वसनासाठी स्थापन केलेल्या संस्थेच्या माध्यमातून कुष्ठरूग्णांची सेवा हीच खरी ईश्वराची सेवा या निष्ठेने आयुष्याच्या अखेरीपर्यंत काम केले.

## गजाआडची दिवाळी, अश्रु ओघळले गाली

✍ योगेश मुकनाक

दीपावली म्हणजे दिव्यांची आरास. सर्वत्र झगमगाट. रांगोळी. उत्तम फराळ, रंगीबिरंगी नवीन कपडे, नवीन खरेदी. फटाक्यांची आतिषबाजी. सगळीकडे उत्साहाला उधाण आलेले असते. जो तो आनंद मिळविण्यात मश्गुल असतो. परीक्षा संपल्या, शाळांना सुट्या लागल्या. सुटीत बागेत फिरायला जाणे, सिनेमा पाहणे, मनसोक्त क्रिकेट खेळणे आणि दिवाळीत घरात केलेल्या फराळाचा आस्वाद घेणे. एवढेच मुले सुटीत करतात किंवा टीव्हीसमोर बसून तासनतास घालवतात.

परंतु या दिवाळीच्या सुटीत स्वामी विवेकानंद शाखेच्या वर्धकांना आपली सुटी अशी वाया घालवावी हे मान्य नव्हते. सुटीचा खूप चांगला उपयोग झाला पाहिजे अशी तेथील वर्धकांची आंतरिक इच्छा होती. म्हणूनच सुटीत वेगवेगळ्या संस्थांना भेटी देण्याचे ठरले. आपला घरचा फराळ फक्त आपणच खावा काय? नाही.



ज्या मुलांचे कोणी नाही किंवा असूनही त्यांच्याकडे कोणी लक्ष देत नाहीत, कोणता तरी गुन्हा केलाय, चोरी, अगदी खून सुध्दा, घरातून पळून आलेली, समाजाने झिडकारलेली, वाईट असा शिक्का कपाळावर मारून घेतलेली मुले होय पुण्यातील रिमांड होममधील मुले ....

अशा दुर्लक्षित मुलांबरोबर आपण दिवाळी साजरी केली तर? त्यांच्याबरोबर फराळ करूयात म्हणून विवेकानंद शाखेतील सर्व वर्धक लक्ष्मीपूजनाच्या दिवशी रिमांड होममध्ये गेले.

तेथील मुलांची संख्या २५० ते ३००. एवढ्या मुलांपर्यंत पोहचणे शक्य नव्हते म्हणून फक्त ४० ते ५० मुलांचा गट घेऊन आम्ही त्या मुलांशी संवाद साधला. सहा गट पाडून प्रत्येक गटात शाखेतील चार वर्धक व तेथील काही मुले गप्पा गोष्टी, गाणी म्हणणे असे झाले. त्यात त्या मुलांनीही उत्स्फूर्त भाग घेतला. परंतु जेव्हा गटांगटांत बसून ही मुले बोलू लागली. बोलू कसली, आपली व्यथा मांडू लागली, तेव्हा प्रत्येक वर्धकाच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले.

किशोर हा सांगली जिल्ह्यातील मुलगा. वय वर्षे १५. दोन वर्षांपूर्वी रागाच्या भरात एकाचा खून केला. अजून सज्ञान नाही म्हणून रिमांड होममध्ये शिक्षा भोगतोय.

हरदळअप्पा आंध्र प्रदेशातील मुलगा. वय वर्षे १०. घरातून पळून आला. घरी आईवडील आहेत; परंतु अनेक पत्र पाठवूनही कोणी न्यायला सोडाचं, साधे उत्तरही पाठवत नाहीत.

अनुताई वाघ - वनवासी मुलांच्या कल्याणासाठी व त्यांच्यात शिक्षणाचा प्रचार प्रसार करण्यासाठी कुरणशाळा, अंगणवाडी, बालवाडया अशा विविध शैक्षणिक उपक्रमातून समाजकार्य.





पुण्यातील पर्वतीपायथा झोपडपट्टीत तीन खून करून शिक्षा भोगणारा वसंत.

अशी अनेक उदाहरणे. त्यांच्या कर्मकहाण्या अंगावर शहारे आणणाऱ्या होत्या. परंतु खून करून मारामाऱ्या करून कोणी हिरो बनत नाही, हे आता त्यांना कळून चुकलं आहे. त्यांना आता पश्चात्ताप होतो आहे. येथे रिमांड होममध्ये आईवडिलांपासून दूर राहणेही त्यांना आवडत नाही. परंतु रागाच्या भरात हातून मोठी चूक झाली आणि त्याची शिक्षा, प्रायश्चित्त ते येथे भोगत आहेत. तीच मुले आमच्या वर्धकांना सांगत होती बाबांनो, **'आततायीपणे कोणतीही गोष्ट करू नका. आम्ही फार मोठी चूक केली, त्याची फळे आम्ही येथे भोगत आहोत. परंतु तुम्ही काही तसे करू नका.'**

अजून खूप खूप बोलायचे होते. हृदयातील वेदना सांगायच्या होत्या. परंतु वेळेचे बंधन होते. त्या नव्या मित्रांबरोबर फराळ घेऊन पुन्हा नक्की भेटायला येऊ असे आश्वासन देऊन आम्ही वर्धकांनी त्याचा जड पावलांनी निरोप घेतला.

खऱ्या अर्थाने दिवाळी साजरी झाली... गजाआडची दिवाळी ! अश्रु ओघळणारी ...... त्यांच्या आणि आमच्याही गालांवरून !

## टिपणे अभ्यासदौऱ्यातील

✍ सुमित डोळे.

परीक्षा संपली की वेध लागतात गिरीभ्रमणाचे! याही वर्षी परीक्षा संपल्यावर गिरीभ्रमणाचे बेत मनात आखत होतो आणि एक दिवस युवक विभागाच्या बैठकीत सूचना मिळाली की, १० वी - १२ वी मधील वर्धकांनी भेटून जायचे. मला वाटले की बहुतेक गिरिभ्रमणाचा कार्यक्रम ठरला असावा. प्रत्यक्ष भेटल्यावर लक्षात आले की, आम्हाला कोल्हापूरला अभ्यास दौऱ्यासाठी जायचे आहे. अजित नाईक हे आमच्याबरोबर प्रमुख म्हणून येणार आहेत. या कोल्हापूरच्या दौऱ्यात काही सामाजिक संस्था व शिक्षणसंस्थांना भेटी द्यायला सांगितले होते. या प्रत्येक ठिकाणी 'स्व'-रूपवर्धिनीची ओळख कशी करून द्याल, तेथील काम कसे समजावून घ्याल, या सर्वांविषयी तपशीलात सूचना मिळाल्या.

दोन एप्रिल रोजी या दौऱ्यासाठी मी व अन्य एकूण ११ युवक पुण्याहून निघालो. पुण्यात शिबिरांच्या निमित्ताने काही संस्थांना भेटी दिल्याही होत्या. परंतु अन्य गावी पूर्ण अनोळखी वातावरणात जाण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. ७ एप्रिल रोजी परतल्यावर मात्र मिळालेले समाधान, झालेले शिक्षण शब्दात मांडणे थोडे अवघडच आहे. तरीही हा एक प्रयत्न..... या अभ्यास दौऱ्यातील अनुभव शब्दात बांधण्याचा !

**१) 'स्व'-निर्मितीचा आनंद देणारे ...... अपंगमती विकास केंद्र**

ज्या मुलांचा बुध्द्यांक ७० पेक्षा कमी आहे, अशाच मुलांना (मतिमंद मुलांना) या संस्थेत प्रवेश दिला जातो. सुरूवातीला साधनांचा वापर करून शिक्षण दिले जाते. मुलांना आवडतील असे खेळ खेळण्यासाठी एक तास असतो. या वातावरणात मुले इतकी रमतात की,

मधुकरराव देवल - दलित व मागासवर्गीय समाजाच्या उत्थानासाठी सहकारी तत्वावरील शेतीचा प्रयोग यशस्वीपणे राबविला, समाजाचा उत्कर्ष शिक्षणप्रसाराशिवाय अशक्यच म्हणून दलित व मागासवर्गीय समाजातील मुलांसाठी शैक्षणिक कार्य.

# गजाआडची दिवाळी, अश्रु ओघळले गाली

योगेश मुकनाक

दीपावली म्हणजे दिव्यांची आरास. सर्वत्र झगमगाट. रांगोळी. उत्तम फराळ, रंगीबिरंगी नवीन कपडे, नवीन खरेदी. फटाक्यांची आतिषबाजी. सगळीकडे उत्साहाला उधाण आलेले असते. जो तो आनंद मिळविण्यात मश्गुल असतो. परीक्षा संपल्या, शाळांना सुट्या लागल्या. सुटीत बागेत फिरायला जाणे, सिनेमा पाहणे, मनसोक्त क्रिकेट खेळणे आणि दिवाळीत घरात केलेल्या फराळाचा आस्वाद घेणे. एवढेच मुले सुटीत करतात किंवा टीव्हीसमोर बसून तासनतास घालवतात.

परंतु या दिवाळीच्या सुटीत स्वामी विवेकानंद शाखेच्या वर्धकांना आपली सुटी अशी वाया घालवावी हे मान्य नव्हते. सुटीचा खूप चांगला उपयोग झाला पाहिजे अशी तेथील वर्धकांची आंतरिक इच्छा होती. म्हणूनच सुटीत वेगवेगळ्या संस्थांना भेटी देण्याचे ठरले. आपला घरचा फराळ फक्त आपणच खावा काय? नाही.



ज्या मुलांचे कोणी नाही किंवा असूनही त्यांच्याकडे कोणी लक्ष देत नाहीत, कोणता तरी गुन्हा केलाय, चोरी, अगदी खून सुध्दा, घरातून पळून आलेली, समाजाने झिडकारलेली, वाईट असा शिक्का कपाळावर मारून घेतलेली मुले होय पुण्यातील रिमांड होममधील मुले ....

अशा दुर्लक्षित मुलांबरोबर आपण दिवाळी साजरी केली तर? त्यांच्याबरोबर फराळ करूयात म्हणून विवेकानंद शाखेतील सर्व वर्धक लक्ष्मीपूजनाच्या दिवशी रिमांड होममध्ये गेले.

तेथील मुलांची संख्या २५० ते ३००. एवढ्या मुलांपर्यंत पोहचणे शक्य नव्हते म्हणून फक्त ४० ते ५० मुलांचा गट घेऊन आम्ही त्या मुलांशी संवाद साधला. सहा गट पाडून प्रत्येक गटात शाखेतील चार वर्धक व तेथील काही मुले गप्पा गोष्टी, गाणी म्हणणे असे झाले. त्यात त्या मुलांनीही उत्स्फूर्त भाग घेतला. परंतु जेव्हा गटांगटांत बसून ही मुले बोलू लागली. बोलू कसली, आपली व्यथा मांडू लागली, तेव्हा प्रत्येक वर्धकाच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले.

किशोर हा सांगली जिल्ह्यातील मुलगा. वय वर्षे १५. दोन वर्षापूर्वी रागाच्या भरात एकाचा खून केला. अजून सज्ञान नाही म्हणून रिमांड होममध्ये शिक्षा भोगतोय.

हरदळअप्पा आंध्र प्रदेशातील मुलगा. वय वर्षे १०. घरातून पळून आला. घरी आईवडील आहेत; परंतु अनेक पत्र पाठवूनही कोणी न्यायला सोडाचं, साधे उत्तरही पाठवत नाहीत.

**अनुताई वाघ** - वनवासी मुलांच्या कल्याणासाठी व त्यांच्यात शिक्षणाचा प्रचार प्रसार करण्यासाठी कुरणशाळा, अंगणवाडी, बालवाडया अशा विविध शैक्षणिक उपक्रमातून समाजकार्य.





पुण्यातील पर्वतीपायथा झोपडपट्टीत तीन खून करून शिक्षा भोगणारा वसंत.

अशी अनेक उदाहरणे. त्यांच्या कर्मकहाण्या अंगावर शहारे आणणाऱ्या होत्या. परंतु खून करून मारामाऱ्या करून कोणी हिरो बनत नाही, हे आता त्यांना कळून चुकलं आहे. त्यांना आता पश्चात्ताप होतो आहे. येथे रिमांड होममध्ये आईवडिलांपासून दूर राहणेही त्यांना आवडत नाही. परंतु रागाच्या भरात हातून मोठी चूक झाली आणि त्याची शिक्षा, प्रायश्चित्त ते येथे भोगत आहेत. तीच मुले आमच्या वर्धकांना सांगत होती बाबांनो, **'आततायीपणे कोणतीही गोष्ट करू नका. आम्ही फार मोठी चूक केली, त्याची फळे आम्ही येथे भोगत आहोत. परंतु तुम्ही काही तसे करू नका.'**

अजून खूप खूप बोलायचे होते. हृदयातील वेदना सांगायच्या होत्या. परंतु वेळेचे बंधन होते. त्या नव्या मित्रांबरोबर फराळ घेऊन पुन्हा नक्की भेटायला येऊ असे आश्वासन देऊन आम्ही वर्धकांनी त्याचा जड पावलांनी निरोप घेतला.

खऱ्या अर्थाने दिवाळी साजरी झाली... गजाआडची दिवाळी ! अश्रु ओघळणारी ...... त्यांच्या आणि आमच्याही गालांवरून !

# टिपणे अभ्यासदौऱ्यातील

सुमित डोळे.

परीक्षा संपली की वेध लागतात गिरीभ्रमणाचे! याही वर्षी परीक्षा संपल्यावर गिरीभ्रमणाचे बेत मनात आखत होतो आणि एक दिवस युवक विभागाच्या बैठकीत सूचना मिळाली की, १० वी - १२ वी मधील वर्धकांनी भेटून जायचे. मला वाटले की बहुतेक गिरिभ्रमणाचा कार्यक्रम ठरला असावा. प्रत्यक्ष भेटल्यावर लक्षात आले की, आम्हाला कोल्हापूरला अभ्यास दौऱ्यासाठी जायचे आहे. अजित नाईक हे आमच्याबरोबर प्रमुख म्हणून येणार आहेत. या कोल्हापूरच्या दौऱ्यात काही सामाजिक संस्था व शिक्षणसंस्थांना भेटी द्यायला सांगितले होते. या प्रत्येक ठिकाणी 'स्व'-रूपवर्धिनीची ओळख कशी करून द्याल, तेथील काम कसे समजावून घ्याल, या सर्वांविषयी तपशीलात सूचना मिळाल्या.

दोन एप्रिल रोजी या दौऱ्यासाठी मी व अन्य एकूण ११ युवक पुण्याहून निघालो. पुण्यात शिबिरांच्या निमित्ताने काही संस्थांना भेटी दिल्याही होत्या. परंतु अन्य गावी पूर्ण अनोळखी वातावरणात जाण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. ७ एप्रिल रोजी परतल्यावर मात्र मिळालेले समाधान, झालेले शिक्षण शब्दात मांडणे थोडे अवघडच आहे. तरीही हा एक प्रयत्न..... या अभ्यास दौऱ्यातील अनुभव शब्दात बांधण्याचा !

**१) 'स्व'-निर्मितीचा आनंद देणारे ...... अपंगमती विकास केंद्र**

ज्या मुलांचा बुध्द्यांक ७० पेक्षा कमी आहे, अशाच मुलांना (मतिमंद मुलांना) या संस्थेत प्रवेश दिला जातो. सुरूवातीला साधनांचा वापर करून शिक्षण दिले जाते. मुलांना आवडतील असे खेळ खेळण्यासाठी एक तास असतो. या वातावरणात मुले इतकी रमतात की,

**मधुकरराव देवल** - दलित व मागासवर्गीय समाजाच्या उत्थानासाठी सहकारी तत्वावरील शेतीचा प्रयोग यशस्वीपणे राबविला, समाजाचा उत्कर्ष शिक्षणप्रसाराशिवाय अशक्यच म्हणून दलित व मागासवर्गीय समाजातील मुलांसाठी शैक्षणिक कार्य.

शिक्षकांचे न ऐकणाऱ्या, त्रास देणाऱ्या विद्यार्थ्याला तुझी शाळा बंद करीन; ही मात्रा लगेच लागू पडते. हळूहळू या मुलांचा आत्मविश्वास वाढून त्यांना व्यक्तिमत्त्व बदलावयाला सहाय्यभूत होतो. पुढे मुलांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे व्यवसाय प्रशिक्षण दिले जाते व त्याचा मोबदलाही दिला जातो. प्रवेश घेताना असलेली मतिमंद अवस्था बाहेर पडताना कितीतरी बदलली जाते; याचे रोकडे अनुभवच तेथे ऐकायला मिळाले. अशा प्रशिक्षणातून बाहेर पडलेले विद्यार्थी फाईल्सचे उत्पादन, त्याचे मार्केटिंग, घाऊक बाजारातून किराणा-भुसाराची खरेदी, त्याची विक्री, सांधणीचे रूमाल तयार करून विकणे असे विविध प्रकारचे व्यवसाय आज उत्तमरित्या करीत आहेत. हे अनुभव ऐकल्यावर एका संस्कृत सुभाषिताची आठवण झाली.

"अमन्त्रमक्षरं नास्ति नास्ति मूलमनौषधम् ।
अयोग्यः पुरूषो नास्ति योजकस्तत्र दुर्लभः ।।

**२) प्रेरणा शासकीय अधिकारी होण्यामागची -**

एखाद्या सामाजिक संकटाच्या प्रसंगातून एखाद्या व्यक्तीला शासकीय अधिकारी होण्याची प्रेरणा मिळू शकते व जिद्दीने हे स्वप्न खरे होऊ शकते, हा आमच्या दृष्टीने एक धक्काच होता. किंबहुना सामाजिक संवेदनशीलता असाही चमत्कार घडवू शकते, हेच नकळत आम्ही शिकलो. त्याचे असे झाले की, पुण्यातीलच संगिता गोडबोले या सध्या कोल्हापूर येथे प्राप्तिकर सहआयुक्त म्हणून काम करतात. त्यांची भेट घ्यायला आम्ही गेलो होतो. गप्पांना सुरूवात करतानाच आमच्यातील एकाने घाईघाईत विचारले "संगिताताई! तुम्ही कोणत्या प्रेरणेने या क्षेत्रात आल्या आहात?" त्या हसल्या. म्हणाल्या "मी अधिकारी व्हायला माझ्या महाविद्यालयातील काही ग्रामीण विद्यार्थी कारणीभूत ठरले. दुष्काळामुळे या विद्यार्थ्यांचे डबे त्यांच्या गावावरून येईनात, पैसे मिळणे शक्यच नव्हते. अशा परिस्थितीत या मुलांची मनस्थिती फार दोलायमान झाली. मग मी व माझ्या मैत्रिणींनी ठरवले की, या मुलांच्या डब्याची सोय पुण्यातूनच करायची, त्यासाठी मेस चालवायची. ठरल्याप्रमाणे ही मेस चालवली. पण हे काम करताना मनात विचार आला की, दुष्काळासारख्या परिस्थितीला काही प्रमाणात निसर्ग जरी कारणीभूत असला, तरी सुयोग्य नियोजनाचा अभाव; हे महत्त्वाचे कारण आहे. हे चित्र बदलायचे असेल तर तसे अधिकारी शासनात हवेत. आपणच का नाही अधिकारी व्हायचे ? मनात विचार आला आणि मग पक्के ठरवलेही." संगिताताईंच्या या दृष्टिकोनामुळे आम्हालाही विचारांची एक दिशा मिळाली असे वाटते. त्यांच्या या मनमोकळ्या बोलण्यामुळे खूप खूप प्रश्न विचारावे असे वाटू लागले आणि मग एका पाठोपाठ प्रश्न समोर येऊ लागले.

प्राप्तिकर म्हणजे काय? तो कोणाला लागू होतो? प्राप्तिकर अधिकारी म्हणून काम करताना किती अभ्यास करावा लागतो? कर चुकवणाऱ्या लोकांकडे छापे घालताना अनुभव कशा प्रकारचे आले? भिती वाटली नाही का? कोणी लाच द्यायचा प्रयत्न केला नाही का? या सर्व प्रश्नांची त्यांनी न कंटाळता, सविस्तर उत्तरे दिली. काही लोक कर चुकवण्यासाठी कसे खोटे हिशेब दाखवतात, किती गैरप्रकार करतात याचे अनुभव त्यांनी सांगितले आणि म्हणाल्या की, तुमचे सामान्यज्ञान चांगले हवे, निरीक्षण हवे. या सगळ्याचा उपयोग काम करताना होतो. आपण आपल्या कामातून आनंद मिळवायचा प्रयत्न केला तर, कोणतेही काम करताना कधी त्रास होणार नाही. तत्त्वांशी एकनिष्ठ





रहाणे हे आपल्याच हातात असते.

**३) सहकारात् समृध्दी -** वारणानगर म्हणजे सहकार क्षेत्रातील एक आदर्श गाव. सहकाराच्या तत्त्वावर एका छोट्या गावात किती समृध्दी येऊ शकते, खेडे केवळ स्वयंपूर्ण नाही तर, बाहेरून आलेल्या हजारो लोकांच्या जीवनाचा आधार बनते याचे प्रत्यक्ष दर्शन वारणानगर मधील विविध सहकारी उद्योग पाहिल्यावर स्पष्टपणे जाणवले. वारणा डेअरी, वारणा भगिनी गृहउद्योग, पतपेढी अशा अनेक ठिकाणांना आम्ही भेटी दिल्या. तेथे काम करणाऱ्यांशी गप्पा मारल्या. महिला गृहउद्योग संस्थेत पापड बनवण्याचा उद्योग आहे. वारणानगरमधील सर्व कर्मचाऱ्यांचे गणवेश शिवण्याचा उद्योग आहे, आज या उद्योगाचा व्याप जरी प्रचंड असला तरी त्याची सुरूवात अगदी छोटी होती. पण सहकाराच्या तत्त्वावर, सगळ्यांच्याच समृध्दीचा विचार समोर ठेऊन केलेल्या धडपडीतून आजची स्थिती आली आहे. पापड बनवण्याच्या उद्योगात आता ५ मिनिटात ७० किलो पीठ मळणारी यंत्रेसुध्दा आहेत. महिलांना घरबसल्या उद्योग मिळावा, त्यातून चार पैसे मिळावे या विचारातून सुरू झालेल्या या गृहउद्योगांना आता लाखो रूपयांचा फायदा होतो आहे.

वारणानगरची डेअरी ही आय.एस.ओ ९००१ प्रमाणित आहे. आजूबाजूच्या खेड्यांतील शेतकऱ्यांचे हजारो लीटर दूध ही डेअरी गुणवत्तेच्या निकषावर घेते. या दुधावरची प्रक्रिया, लस्सीसारखे-श्रीखंडासारखे पदार्थ बनविण्याचे विभाग यांचा व्याप खूप मोठा आहे. परंतु डेअरीत हिंडताना जाणवली ती कमालीची स्वच्छता! या भेटीत अत्यंत चविष्ट श्रीखंडाचा, लस्सीचा स्वाद जसा मिळाला तसे हेही समजले की, या क्षेत्रात रोजगाराची खूप मोठी संधी आहे. पण त्यासाठी डेअरीफार्मचा पदविका अभ्यासक्रम झालेला असला पाहिजे, असे शिक्षण घेतलेली व्यक्ती शेकडो गरीब शेतकऱ्यांचे दूध संकलित करून त्यांनाही सुखाची हिरवळ दाखवू शकते.

**४) 'असल्या पंचायती' नक्कीच हव्यात** - ही नसती पंचायत कशाला? असे आपण अनेकदा म्हणत असतो. गारगोटी येथील मौनी विद्यापीठाला आम्ही भेट दिल्यावर तेथील पंचायती राज प्रशिक्षण केंद्र बघितल्यावर मात्र वाटले 'असल्या पंचायती' नक्कीच हव्यात! मौनी विद्यापीठ हे भारतातील एकमेव ग्रामीण विद्यापीठ. येथे ग्रामसेवक, सरपंच, ग्रामपंचायत सभासद यांच्या प्रशिक्षणाचा वर्ग चालतो. प्रशासन जेव्हा सामान्य माणसापर्यंत खऱ्या अर्थाने पोहोचते, तेव्हाच शासकीय कार्यक्रम यशस्वी होताना दिसतात. अलिकडे ग्रामपंचायतींना खूप अधिकार दिले जात आहेत. परंतु अधिकारप्राप्त व्यक्ती प्रशिक्षित नसतील तर या अधिकारांचा उपयोग काय? या विद्यापीठाने म्हणूनच हा प्रशिक्षण कार्यक्रम आग्रहाने राबविला आहे. ग्रामीण भागातील सरपंच, सभासद यांच्या शैक्षणिक पार्श्वभूमीचा विचार करूनच एकूण या दिवसांचा अभ्यासक्रम तयार केला आहे. या प्रशिक्षणाबरोबरच या विद्यापीठात गटविकास अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणाचाही वर्ग चालतो.

**५) अपंग कोण ? -** रस्त्याने जाताना, गाडीमध्ये एखादी अपंग व्यक्ती बघितली की फार वाईट वाटते! साध्या साध्या गोष्टी करताना त्यांना होणारे कष्ट पाहून कणव येते. कोल्हापूरला **हेल्पर्स फॉर हॅन्डीकॅप** ही संस्था बघायला गेलो. मनामध्ये अपंगांची संस्था म्हणून काही वेगळेच चित्र होते. काम पाहिले आणि मग मात्र मनात प्रश्न उभा राहिला खरंच यांना अपंग का म्हणायचं?

जन्माने धडधाकट असलेल्या शिक्षणाला घरात अनुकूल वातावरण लाभलेल्या नसिमाताई हूरजूक या शालेय व

शिक्षकांचे न ऐकणाऱ्या, त्रास देणाऱ्या विद्यार्थ्याला तुझी शाळा बंद करीन; ही मात्रा लगेच लागू पडते. हळूहळू या मुलांचा आत्मविश्वास वाढून त्यांना व्यक्तिमत्त्व बदलावयाला सहाय्यभूत होतो. पुढे मुलांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे व्यवसाय प्रशिक्षण दिले जाते व त्याचा मोबदलाही दिला जातो. प्रवेश घेताना असलेली मतिमंद अवस्था बाहेर पडताना कितीतरी बदलली जाते; याचे रोकडे अनुभवच तेथे ऐकायला मिळाले. अशा प्रशिक्षणातून बाहेर पडलेले विद्यार्थी फाईल्सचे उत्पादन, त्याचे मार्केटिंग, घाऊक बाजारातून किराणा-भुसाराची खरेदी, त्याची विक्री, सांधणीचे रूमाल तयार करून विकणे असे विविध प्रकारचे व्यवसाय आज उत्तमरित्या करीत आहेत. हे अनुभव ऐकल्यावर एका संस्कृत सुभाषिताची आठवण झाली.

"अमन्त्रमक्षरं नास्ति नास्ति मूलमनौषधम् ।
अयोग्यः पुरूषो नास्ति योजकस्तत्र दुर्लभः ॥

**२) प्रेरणा शासकीय अधिकारी होण्यामागची -**

एखाद्या सामाजिक संकटाच्या प्रसंगातून एखाद्या व्यक्तीला शासकीय अधिकारी होण्याची प्रेरणा मिळू शकते व जिद्दीने हे स्वप्न खरे होऊ शकते, हा आमच्या दृष्टीने एक धक्काच होता. किंबहुना सामाजिक संवेदनशीलता असाही चमत्कार घडवू शकते, हेच नकळत आम्ही शिकलो. त्याचे असे झाले की, पुण्यातीलच संगिता गोडबोले या सध्या कोल्हापूर येथे प्राप्तिकर सहआयुक्त म्हणून काम करतात. त्यांची भेट घ्यायला आम्ही गेलो होतो. गप्पांना सुरूवात करतानाच आमच्यातील एकाने घाईघाईत विचारले "संगिताताई! तुम्ही कोणत्या प्रेरणेने या क्षेत्रात आल्या आहात?" त्या हसल्या. म्हणाल्या "मी अधिकारी व्हायला माझ्या महाविद्यालयातील काही ग्रामीण विद्यार्थी कारणीभूत ठरले. दुष्काळामुळे या विद्यार्थ्यांचे डबे त्यांच्या गावावरून येईनात, पैसे मिळणे शक्यच नव्हते. अशा परिस्थितीत या मुलांची मनस्थिती फार दोलायमान झाली. मग मी व माझ्या मैत्रिणींनी ठरवले की, या मुलांच्या डब्याची सोय पुण्यातूनच करायची, त्यासाठी मेस चालवायची. ठरल्याप्रमाणे ही मेस चालवली. पण हे काम करताना मनात विचार आला की, दुष्काळासारख्या परिस्थितीला काही प्रमाणात निसर्ग जरी कारणीभूत असला, तरी सुयोग्य नियोजनाचा अभाव; हे महत्त्वाचे कारण आहे. हे चित्र बदलायचे असेल तर तसे अधिकारी शासनात हवेत. आपणच का नाही अधिकारी व्हायचे ? मनात विचार आला आणि मग पक्के ठरवलेही." संगिताताईंच्या या दृष्टिकोनामुळे आम्हालाही विचारांची एक दिशा मिळाली असे वाटते. त्यांच्या या मनमोकळ्या बोलण्यामुळे खूप खूप प्रश्न विचारावे असे वाटू लागले आणि मग एका पाठोपाठ प्रश्न समोर येऊ लागले.

प्राप्तिकर म्हणजे काय? तो कोणाला लागू होतो? प्राप्तिकर अधिकारी म्हणून काम करताना किती अभ्यास करावा लागतो? कर चुकवणाऱ्या लोकांकडे छापे घालताना अनुभव कशा प्रकारचे आले? भिती वाटली नाही का? कोणी लाच द्यायचा प्रयत्न केला नाही का? या सर्व प्रश्नांची त्यांनी न कंटाळता, सविस्तर उत्तरे दिली. काही लोक कर चुकवण्यासाठी कसे खोटे हिशेब दाखवतात, किती गैरप्रकार करतात याचे अनुभव त्यांनी सांगितले आणि म्हणाल्या की, तुमचे सामान्यज्ञान चांगले हवे, निरीक्षण हवे. या सगळ्याचा उपयोग काम करताना होतो. आपण आपल्या कामातून आनंद मिळवायचा प्रयत्न केला तर, कोणतेही काम करताना कधी त्रास होणार नाही. तत्त्वांशी एकनिष्ठ

**संत गाडगे महाराज** - स्वच्छतेचा संस्कार, शिक्षणाचा संस्कार, अंधश्रद्धेविरूद्ध समाज जागरणासाठी रस्तेसफाई, कीर्तन, आंदोलने अशा विविध माध्यमातून समाजप्रबोधन.





रहाणे हे आपल्याच हातात असते.

**३) सहकारात् समृध्दी -** वारणानगर म्हणजे सहकार क्षेत्रातील एक आदर्श गाव. सहकाराच्या तत्त्वावर एका छोट्या गावात किती समृध्दी येऊ शकते, खेडे केवळ स्वयंपूर्ण नाही तर, बाहेरून आलेल्या हजारो लोकांच्या जीवनाचा आधार बनते याचे प्रत्यक्ष दर्शन वारणानगर मधील विविध सहकारी उद्योग पाहिल्यावर स्पष्टपणे जाणवले. वारणा डेअरी, वारणा भगिनी गृहउद्योग, पतपेढी अशा अनेक ठिकाणांना आम्ही भेटी दिल्या. तेथे काम करणाऱ्यांशी गप्पा मारल्या. महिला गृहउद्योग संस्थेत पापड बनवण्याचा उद्योग आहे. वारणानगरमधील सर्व कर्मचाऱ्यांचे गणवेश शिवण्याचा उद्योग आहे, आज या उद्योगाचा व्याप जरी प्रचंड असला तरी त्याची सुरूवात अगदी छोटी होती. पण सहकाराच्या तत्त्वावर, सगळ्यांच्याच समृध्दीचा विचार समोर ठेऊन केलेल्या धडपडीतून आजची स्थिती आली आहे. पापड बनवण्याच्या उद्योगात आता ५ मिनिटात ७० किलो पीठ मळणारी यंत्रेसुध्दा आहेत. महिलांना घरबसल्या उद्योग मिळावा, त्यातून चार पैसे मिळावे या विचारातून सुरू झालेल्या या गृहउद्योगांना आता लाखो रूपयांचा फायदा होतो आहे.

वारणानगरची डेअरी ही आय.एस.ओ ९००१ प्रमाणित आहे. आजूबाजूच्या खेड्यांतील शेतकऱ्यांचे हजारो लीटर दूध ही डेअरी गुणवत्तेच्या निकषावर घेते. या दुधावरची प्रक्रिया, लस्सीसारखे-श्रीखंडासारखे पदार्थ बनविण्याचे विभाग यांचा व्याप खूप मोठा आहे. परंतु डेअरीत हिंडताना जाणवली ती कमालीची स्वच्छता! या भेटीत अत्यंत चविष्ट श्रीखंडाचा, लस्सीचा स्वाद जसा मिळाला तसे हेही समजले की, या क्षेत्रात रोजगाराची खूप मोठी संधी आहे. पण त्यासाठी डेअरीफार्मचा पदविका अभ्यासक्रम झालेला असला पाहिजे, असे शिक्षण घेतलेली व्यक्ती शेकडो गरीब शेतकऱ्यांचे दूध संकलित करून त्यांनाही सुखाची हिरवळ दाखवू शकते.

**४) 'असल्या पंचायती' नक्कीच हव्यात** - ही नसती पंचायत कशाला? असे आपण अनेकदा म्हणत असतो. गारगोटी येथील मौनी विद्यापीठाला आम्ही भेट दिल्यावर तेथील पंचायती राज प्रशिक्षण केंद्र बघितल्यावर मात्र वाटले 'असल्या पंचायती' नक्कीच हव्यात! मौनी विद्यापीठ हे भारतातील एकमेव ग्रामीण विद्यापीठ. येथे ग्रामसेवक, सरपंच, ग्रामपंचायत सभासद यांच्या प्रशिक्षणाचा वर्ग चालतो. प्रशासन जेव्हा सामान्य माणसापर्यंत खऱ्या अर्थाने पोहोचते, तेव्हाच शासकीय कार्यक्रम यशस्वी होताना दिसतात. अलिकडे ग्रामपंचायतींना खूप अधिकार दिले जात आहेत. परंतु अधिकारप्राप्त व्यक्ती प्रशिक्षित नसतील तर या अधिकारांचा उपयोग काय? या विद्यापीठाने म्हणूनच हा प्रशिक्षण कार्यक्रम आग्रहाने राबविला आहे. ग्रामीण भागातील सरपंच, सभासद यांच्या शैक्षणिक पार्श्वभूमीचा विचार करूनच एकूण या दिवसांचा अभ्यासक्रम तयार केला आहे. या प्रशिक्षणाबरोबरच या विद्यापीठात गटविकास अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणाचाही वर्ग चालतो.

**५) अपंग कोण ? -** रस्त्याने जाताना, गाडीमध्ये एखादी अपंग व्यक्ती बघितली की फार वाईट वाटते! साध्या साध्या गोष्टी करताना त्यांना होणारे कष्ट पाहून कणव येते. कोल्हापूरला **हेल्पर्स फॉर हॅन्डीकॅप** ही संस्था बघायला गेलो. मनामध्ये अपंगांची संस्था म्हणून काही वेगळेच चित्र होते. काम पाहिले आणि मग मात्र मनात प्रश्न उभा राहिला खरंच यांना अपंग का म्हणायचं?

जन्माने धडधाकट असलेल्या शिक्षणाला घरात अनुकूल वातावरण लाभलेल्या नसिमाताई हूरजूक या शालेय व

**संत तुकडोजी महाराज** - भजन व कीर्तनाच्या माध्यमातून सर्वसामान्य लोकांमध्ये राष्ट्रीयवृत्ती जागवण्याचे कार्य. ग्रामविकास, ग्रामसुधारणा हा त्यांच्या कार्यातील एक अत्यंत महत्त्वाचा भाग

काही प्रमाणात महाविद्यालयीन जीवनातील आनंद उपभोगत होत्या. नाचणे, खेळणे या आकृष्ट करणाऱ्या विषयात रमल्या होत्या. एका अपघाताने हळूहळू पण अनपेक्षितपणे त्यांना कायमचे अपंगत्व आले आणि त्यांचे जीवनच बदलून गेले. आपले अपंगत्व स्विकारण्यासाठी त्यांना बराच कालावधी लागला; पण त्यातून सावरल्या. स्वतः अपंग असलेल्या पण ते अपंगत्व स्विकारून जीवनात यशस्वी झालेल्या एका व्यक्तीच्या प्रेरणेतून त्या उभ्या राहिल्या, त्या अशा अपंगत्व लाभलेल्या शेकडो जणांना प्रेरणा द्यायला! संस्थेच्या इमारतीत शिरल्या शिरल्याच एका वाक्याने आणि एका चित्राने सारे काही सांगून टाकले. **"फॉर अस टू स्काय इज द लिमिट"** हे त्यांचे ब्रीदवाक्य. एका भिंतीवर होते चाकांच्या खुर्चीत बसलेल्या एका अपंगाचे चित्र होते. पण या अपंग व्यक्तीला पंख दाखवले होते.



स्वतः नसीमाताई बाहेरगावी होत्या. परंतु आमचे स्वागत सोनालीताई नवांगुळ यांनी केले. संस्थेतील एकेका कार्यकर्त्याची ओळख, एकेका विद्यार्थ्याची ओळख म्हणजे आम्हाला एकएक धक्का होता. खंडाळ्याला सहलीत कड्यावरून पडून अपंग झालेले अविनाश देशपांडे, दोन्ही हात नसतानाही जणू हातानेच लाटते आहे इतक्या सहजपणाने पायाने पोळ्या लाटणारी एक मुलगी, दोन्ही हात व पाय नाहीत तरीही न खचता तोंडात पेन धरून लिहिणारा आणि तरीही १०वीत ८३% गुण मिळविणारा विद्यार्थी. हात नसलेल्या एका विद्यार्थ्याने आपल्या सुंदर **पायाक्षराने** धडधाकट मुलांच्या **हस्ताक्षर** स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला अशी अनेक गुणी मुले व त्यांच्यासाठी धडपडणारे, शरीराने अपंग पण मनाने खंबीर कार्यकर्ते आम्ही पाहिले. हे सर्व पाहिल्यावर आपण आपल्या क्षमतांचा किती कमी वापर करतो याची लाज वाटली.

कोल्हापूरच्या या अभ्यास दौऱ्यात दादा पाटील, भारतीय मजदूर संघाचे जयंत देशपांडे व त्यांचे अन्य सहकारी यांनी आमची सर्व व्यवस्था आपलेपणाने केली होती. आवश्यक त्या सर्व सोयी उपलब्ध करून दिल्या. त्या सर्वांविषयी कृतज्ञता व्यक्त करून, अंबामातेचे दर्शन घेऊन आणि विविध संस्थांच्या भेटीतले प्रेरणादायी प्रसंग मनात साठवून आम्ही पुण्याच्या दिशेने मार्गस्थ झालो.

**हे तर जीवन आहे**

*सोनालीताईने आमचे स्वागत केले. संस्थेची ओळख करून दिली. नंतर तेथील अन्य कार्यकर्त्यांशी बोलताना कळले की, काही दिवसांपूर्वी सोनालीताईंनी जेवताना मांडीवर ताट ठेवले होते. पण कमरेखाली संवेदनाच नसल्याने गरम पदार्थाचा चटका मांडीला बसलेला कळलाच नाही. मांडी भाजली. मोठा फोड आला. त्याचे ऑपरेशन नेमके आमच्या भेटीच्या दिवशी होते पण आम्ही येणार व नसीमाताई पण नाहीत म्हणून त्यांनी त्यांचे ऑपरेशन पुढे ढकलले. याची जराशीही जाणीव होऊ न देता हसतखेळत सोनालीताईंनी आमच्याबरोबर गप्पा मारल्या. माहिती सांगितली. हे सगळे कळल्यावर आम्हाला फारच हळहळ वाटली. ही घटना आम्हालाच चटका लावून गेली. नकळत आम्ही सर्वजण गंभीर झालो. ते पाहून सोनालीताईच म्हणाली, "एवढे गंभीर कशाला होताय, हे तर जीवन आहे. आपण सगळ्या गोष्टींना हसत सामोरं गेल की, बघा कशी मजा येते".*

**जगन्नाथ शंकरशेट** - सनातनी लोकांचा प्रखर विरोध असतानाही १८४८ मध्ये मुंबई येथील स्वतःच्या घरी मुलींची शाळा सुरू केली.







# अर्थतज्ज्ञ डॉ. आंबेडकरांचा आर्थिक दृष्टीकोन

**श्री मिलिंद कांबळे**

(श्री मिलिंद कांबळे हे इंजिनिअर असून शिक्षणानंतर काही वर्षे त्यांनी विद्यार्थी परिषदेचे पूर्णवेळ काम केले आहे. सध्या स्वतःचा बांधकाम व्यवसाय आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संबंधीच्या त्यांच्या वेबसाईटची नोंद **लिम्का बुक ऑफ रेकॉर्डस्ने** घेतलेली आहे. डॉ. आंबेडकर हा त्यांच्या अभ्यासाचा विषय आहे. सप्टेंबर महिन्यात मासिक प्रबोधन बैठकीत त्यांनी मांडलेल्या विचारांचा हा सारांश)

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा परिचय समाजाला 'अर्थतज्ज्ञ' म्हणून फारसा नाही. घटनेचे शिल्पकार, दलितांचे उद्धारकर्ते, राष्ट्रपुरूष अशा शब्दांमध्ये सामान्यपणे त्यांचा परिचय करून दिला जातो. घटनानिर्मितीतील त्यांचे योगदान मोलाचे आहे त्यामुळेच 'Architect of Indian Constitution' अशी त्यांची ओळख अधिक आहे.

खरे पाहता ते अर्थशास्त्राचे विद्यार्थी. परदेशी विद्यापीठांनी (कोलंबिया विद्यापीठ, लंडन इन्स्टिट्यूट ऑफ इकॉनॉमिक्स) त्यांना तीन पदव्या प्रदान केल्या आहेत. अशा तीन तीन पदव्या (परदेशी विद्यापीठांच्या) प्राप्त असलेले हे त्या काळातील एकमेव उदाहरण.

सिडनेहॅम कॉलेजमध्ये ते प्राध्यापक होते. त्यांनी केलेल्या सामाजिक चळवळीचा पाया हा मुख्यतः आर्थिक प्रश्नांवर आधारीत होता; हे त्यांच्या लढ्यांचे मूल्यमापन करताना जाणवते. दीनदलित, कष्टकरी समाजाची आर्थिक मुक्ती झाली पाहिजे, त्यासाठी त्यांनी लढा उभा केला, असे स्पष्टपणे जाणवते.

अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात एम. ए. साठी सादर केलेल्या त्यांच्या प्रबंधाचा विषय होता **ॲडमिनिस्ट्रेशन ॲण्ड फायनान्स ऑफ ईस्ट इंडिया कंपनी** (वर्ष १९१५) (ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन व वित्तव्यवहार, वर्ष १९१५)

१९१७ साली पी.एच.डी.साठीचा विषय होता **इव्हॅल्यूएशन ऑफ प्रोव्हेन्शिअल फायनान्स इन ब्रिटीश इंडिया** (ब्रिटीश भारतातील प्रांतिक वित्तव्यवहाराचे मूल्यमापन)

त्यांच्या तिसऱ्या निबंधाचा विषय होता **द प्रॉब्लेम ऑफ रूपी, इटस् ओरिजीन ॲण्ड इटस् सोल्यूशन'** (रूपयाचा प्रश्न, उद्‌गम आणि उपाय)

त्यांचे पदवीपर्यंतचे शिक्षण-उच्चशिक्षण, त्यांनी प्राप्त केलेल्या पदव्या, त्यांचे लिखाण, या सर्वांचा विषय अर्थशास्त्राशी संबंधित आहे.

१९२१ ते १९५६ या काळात त्यांनी एकही शब्द अर्थशास्त्रावर लिहिला नाही, हे जरी खरे असले तरी, त्यांनी जे लढे उभे केले, त्यामागे मात्र आर्थिक दृष्टिकोनच होता.

१७९२ साली ब्रिटिशांनी भारतात कंपनी स्थापन केली. कंपनी सरकार व व्यापाराच्या माध्यमातून पुढे राज्य

**बाळशास्त्री जांभेकर** - हिंदू समाजातील अनिष्ट प्रथा बंद पडाव्यात. किमान त्यांना आळा बसावा यासाठी अथक प्रयत्न. त्यातूनच विधवा पूनर्विवाह, स्त्री शिक्षण याचा त्यांनी पुरस्कार केला. शुध्दीकरण चळवळीला प्रोत्साहन दिले.

काही प्रमाणात महाविद्यालयीन जीवनातील आनंद उपभोगत होत्या. नाचणे, खेळणे या आकृष्ट करणाऱ्या विषयात रमल्या होत्या. एका अपघाताने हळूहळू पण अनपेक्षितपणे त्यांना कायमचे अपंगत्व आले आणि त्यांचे जीवनच बदलून गेले. आपले अपंगत्व स्विकारण्यासाठी त्यांना बराच कालावधी लागला; पण त्यातून सावरल्या. स्वतः अपंग असलेल्या पण ते अपंगत्व स्विकारून जीवनात यशस्वी झालेल्या एका व्यक्तीच्या प्रेरणेतून त्या उभ्या राहिल्या, त्या अशा अपंगत्व लाभलेल्या शेकडो जणांना प्रेरणा द्यायला! संस्थेच्या इमारतीत शिरल्या शिरल्याच एका वाक्याने आणि एका चित्राने सारे काही सांगून टाकले. **"फॉर अस टू स्काय इज द लिमिट"** हे त्यांचे ब्रीदवाक्य. एका भिंतीवर होते चाकांच्या खुर्चीत बसलेल्या एका अपंगाचे चित्र होते. पण या अपंग व्यक्तीला पंख दाखवले होते.



स्वतः नसीमाताई बाहेरगावी होत्या. परंतु आमचे स्वागत सोनालीताई नवांगुळ यांनी केले. संस्थेतील एकेका कार्यकर्त्याची ओळख, एकेका विद्यार्थ्याची ओळख म्हणजे आम्हाला एकएक धक्का होता. खंडाळ्याला सहलीत कड्यावरून पडून अपंग झालेले अविनाश देशपांडे, दोन्ही हात नसतानाही जणू हातानेच लाटते आहे इतक्या सहजपणाने पायाने पोळ्या लाटणारी एक मुलगी, दोन्ही हात व पाय नाहीत तरीही न खचता तोंडात पेन धरून लिहिणारा आणि तरीही १०वीत ८३% गुण मिळविणारा विद्यार्थी. हात नसलेल्या एका विद्यार्थ्याने आपल्या सुंदर **पायाक्षराने** धडधाकट मुलांच्या **हस्ताक्षर** स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला अशी अनेक गुणी मुले व त्यांच्यासाठी धडपडणारे, शरीराने अपंग पण मनाने खंबीर कार्यकर्ते आम्ही पाहिले. हे सर्व पाहिल्यावर आपण आपल्या क्षमतांचा किती कमी वापर करतो याची लाज वाटली.

कोल्हापूरच्या या अभ्यास दौऱ्यात दादा पाटील, भारतीय मजदूर संघाचे जयंत देशपांडे व त्यांचे अन्य सहकारी यांनी आमची सर्व व्यवस्था आपलेपणाने केली होती. आवश्यक त्या सर्व सोयी उपलब्ध करून दिल्या. त्या सर्वांविषयी कृतज्ञता व्यक्त करून, अंबामातेचे दर्शन घेऊन आणि विविध संस्थांच्या भेटीतले प्रेरणादायी प्रसंग मनात साठवून आम्ही पुण्याच्या दिशेने मार्गस्थ झालो.

### हे तर जीवन आहे

*सोनालीताईने आमचे स्वागत केले. संस्थेची ओळख करून दिली. नंतर तेथील अन्य कार्यकर्त्यांशी बोलताना कळले की, काही दिवसांपूर्वी सोनालीताईंनी जेवताना मांडीवर ताट ठेवले होते. पण कमरेखाली संवेदनाच नसल्याने गरम पदार्थाचा चटका मांडीला बसलेला कळलाच नाही. मांडी भाजली. मोठा फोड आला. त्याचे ऑपरेशन नेमके आमच्या भेटीच्या दिवशी होते पण आम्ही येणार व नसीमाताई पण नाहीत म्हणून त्यांनी त्यांचे ऑपरेशन पुढे ढकलले. याची जराशीही जाणीव होऊ न देता हसतखेळत सोनालीताईंनी आमच्याबरोबर गप्पा मारल्या. माहिती सांगितली. हे सगळे कळल्यावर आम्हाला फारच हळहळ वाटली. ही घटना आम्हालाच चटका लावून गेली. नकळत आम्ही सर्वजण गंभीर झालो. ते पाहून सोनालीताईच म्हणाली, "एवढे गंभीर कशाला होताय, हे तर जीवन आहे. आपण सगळ्या गोष्टींना हसत सामोरं गेल की, बघा कशी मजा येते".*

**जगन्नाथ शंकरशेठ** - सनातनी लोकांचा प्रखर विरोध असतानाही १८४८ मध्ये मुंबई येथील स्वतःच्या घरी मुलींची शाळा सुरू केली.







## अर्थतज्ज्ञ डॉ. आंबेडकरांचा आर्थिक दृष्टीकोन

श्री मिलिंद कांबळे

(श्री मिलिंद कांबळे हे इंजिनिअर असून शिक्षणानंतर काही वर्षे त्यांनी विद्यार्थी परिषदेचे पूर्णवेळ काम केले आहे. सध्या स्वतःचा बांधकाम व्यवसाय आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संबंधीच्या त्यांच्या वेबसाईटची नोंद **लिम्का बुक ऑफ रेकॉर्डस्ने** घेतलेली आहे. डॉ. आंबेडकर हा त्यांच्या अभ्यासाचा विषय आहे. सप्टेंबर महिन्यात मासिक प्रबोधन बैठकीत त्यांनी मांडलेल्या विचारांचा हा सारांश)

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा परिचय समाजाला 'अर्थतज्ज्ञ' म्हणून फारसा नाही. घटनेचे शिल्पकार, दलितांचे उद्धारकर्ते, राष्ट्रपुरूष अशा शब्दांमध्ये सामान्यपणे त्यांचा परिचय करून दिला जातो. घटनानिर्मितीतील त्यांचे योगदान मोलाचे आहे त्यामुळेच 'Architect of Indian Constitution' अशी त्यांची ओळख अधिक आहे.

खरे पाहता ते अर्थशास्त्राचे विद्यार्थी. परदेशी विद्यापीठांनी (कोलंबिया विद्यापीठ, लंडन इन्स्टिट्यूट ऑफ इकॉनॉमिक्स) त्यांना तीन पदव्या प्रदान केल्या आहेत. अशा तीन तीन पदव्या (परदेशी विद्यापीठांच्या) प्राप्त असलेले हे त्या काळातील एकमेव उदाहरण.

सिडनेहॅम कॉलेजमध्ये ते प्राध्यापक होते. त्यांनी केलेल्या सामाजिक चळवळीचा पाया हा मुख्यतः आर्थिक प्रश्नांवर आधारीत होता; हे त्यांच्या लढ्यांचे मूल्यमापन करताना जाणवते. दीनदलित, कष्टकरी समाजाची आर्थिक मुक्ती झाली पाहिजे, त्यासाठी त्यांनी लढा उभा केला, असे स्पष्टपणे जाणवते.

अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात एम. ए. साठी सादर केलेल्या त्यांच्या प्रबंधाचा विषय होता **ॲडमिनिस्ट्रेशन ॲण्ड फायनान्स ऑफ ईस्ट इंडिया कंपनी** (वर्ष १९१५) (ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन व वित्तव्यवहार, वर्ष १९१५)

१९१७ साली पी.एच.डी.साठीचा विषय होता **इव्हॅल्यूएशन ऑफ प्रोव्हेन्शिअल फायनान्स इन ब्रिटीश इंडिया** (ब्रिटीश भारतातील प्रांतिक वित्तव्यवहाराचे मूल्यमापन)

त्यांच्या तिसऱ्या निबंधाचा विषय होता **द प्रॉब्लेम ऑफ रूपी, इटस् ओरिजीन ॲण्ड इटस् सोल्यूशन'** (रूपयाचा प्रश्न, उद्‌गम आणि उपाय)

त्यांचे पदवीपर्यंतचे शिक्षण-उच्चशिक्षण, त्यांनी प्राप्त केलेल्या पदव्या, त्यांचे लिखाण, या सर्वांचा विषय अर्थशास्त्राशी संबंधित आहे.

१९२१ ते १९५६ या काळात त्यांनी एकही शब्द अर्थशास्त्रावर लिहिला नाही, हे जरी खरे असले तरी, त्यांनी जे लढे उभे केले, त्यामागे मात्र आर्थिक दृष्टिकोनच होता.

१७९२ साली ब्रिटिशांनी भारतात कंपनी स्थापन केली. कंपनी सरकार व व्यापाराच्या माध्यमातून पुढे राज्य

**बाळशास्त्री जांभेकर** - हिंदू समाजातील अनिष्ट प्रथा बंद पडाव्यात. किमान त्यांना आळा बसावा यासाठी अथक प्रयत्न. त्यातूनच विधवा पूनर्विवाह, स्त्री शिक्षण याचा त्यांनी पुरस्कार केला. शुध्दीकरण चळवळीला प्रोत्साहन दिले.

केले. १५० वर्षे राज्य केले. यापैकी १७९२ ते १८५८ ही ६६ वर्षे ईस्ट इंडिया कंपनीने भारतावर राज्य केले. १८५७ चा संग्राम झाला म्हणून कंपनी बरखास्त केली नाही, तर इंग्लंडमध्ये सत्तांतर झाले म्हणून कंपनी बरखास्त केली. १८५८ ते १९४७ ही ९० वर्षे ब्रिटिश सरकार म्हणून देशावर राज्य केले.

डॉ. आंबेडकर यांच्या एम. ए. चा विषय हा पहिल्या ६६ वर्षांच्या ब्रिटिश राजवटीचा (१७९२ ते १८५८) आढावा घेणारा होता.

दुसरा पी.एच.डी. चा प्रबंध हा १८५८ ते १९२१ पर्यंत **सेंटर ॲण्ड स्टेट - ॲलोकेशन ॲण्ड डिस्ट्रीब्यूशन ऑफ टॅक्सेस** (केंद्र व राज्य : कराचे विभाजन आणि वितरण) असा होता.

ईस्ट इंडिया कंपनी भारतात आली. या कंपनीचे २४ संचालक होते. कंपनीचा कारभार दोन स्तरांवर होता. **कंपनी सरकार** आणि **व्यापार** यावर नियंत्रण ब्रिटिश सरकारचे होते.

१७९२ ते १८५८ या ६६ वर्षातील कंपनीच्या आर्थिक व्यवहाराचे त्यांनी आपल्या निबंधात खुलासेवार विवेचन केले आहे. कर उत्पन्न वाढविण्यासाठी ईस्ट इंडिया कंपनीने ज्या जाचक अटी लादल्या होत्या, त्याचा पंचनामा डॉ. आंबेडकरांनी केला आहे. ब्रिटिशांचा वसाहतवाद जगभर असूनही ब्रिटिश कंपनीच्या आर्थिक बाबींचा पंचनामा डॉ. आंबेडकरांनी निबंधाच्या माध्यमातून जगासमोर परखडपणे मांडला आणि पी.एच.डी मिळविली. या पंचनाम्यात त्यांनी दाखवून दिले की, ३३ वर्षे कंपनीला फायदा होता तर ३३ वर्षे कंपनीला तोटा झाला.

**भारतात उत्पन्न होणाऱ्या सर्व पैशांपैकी ७०% रक्कम ब्रिटिश हे त्यांच्या अन्य देशात वसाहती निर्माण करण्यासाठी खर्च करायचे व केवळ २० ते ३०% रक्कम ही लोकोपयोगी कामांवर खर्च करायचे. तसेच कंपनीने अनावश्यक खर्च खूप केला. या कंपनीच्या अधिकाऱ्यांना भरपूर पगारही होता.** मुगल साम्राज्याचा पाया अकबराने घातला. शेतसारा पध्दत त्याने आणली. **शेतकरी शेतमजूर यांच्यावर प्रचंड कर लादून ब्रिटिशांनी (कंपनीने) प्रचंड लूट कशी केली, याचा पंचनामा डॉ. आंबेडकरांनी प्रबंधात केला आहे.**

डॉ. आंबेडकरांचे तीन गुरू आपल्याला माहिती आहेत- गौतम बुध्द, संत कबीर व महात्मा फुले. परंतु आर्थिक विषयात त्यांचे गुरू होते प्रोफेसर सेलेगमन् आणि प्रोफेसर एडविन कॅनन.

ईस्ट इंडिया कंपनीने म्हणजेच ब्रिटिश सरकारने **१८३८ ते १८४६ या कालावधीत इंग्लंडच्या मँचेस्टर शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी जो खर्च झाला, त्यापेक्षा अर्ध्याहून कमी खर्च भारतातील लोकोपयोगी कामांवर केला, हे डॉ. आंबेडकरांनी सप्रमाण सिध्द केले. विशेष म्हणजे त्यांच्या प्रबंध मार्गदर्शकाने हा प्रबंध मान्य केला.**

त्यांचा दुसरा निबंध होता **प्रोव्हिन्शिअल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया.** या निबंधात त्यांनी १८३३ ते १९२१ या कालावधीचा आढावा घेतला. ज्यांच्यावर देशाच्या आर्थिक कारभाराची जबाबदारी आहे, त्यांनी पैसा उभा करणे व खर्च करणे यापलिकडे पाहिले पाहिजे. सामाजिक संपत्ती हे पैतृकधन आहे. बंगाल, मद्रास व मुंबई या प्रांतिक सरकारमार्फत ब्रिटीश सरकारचे काम चालू होते. या कारभारातील 'ॲलोकेशन ॲण्ड डिस्ट्रीब्यूशन ऑफ टॅक्सेस' यावर डॉ. आंबेडकरांनी संशोधन केले.

**गोपाळ हरी देशमुख (लोकहितवादी) -** विपूल लेखनाच्या माध्यमातून समाजातील नानाविध दोष आणि विकृतींवर त्यांनी निर्भयपणे कोरडे ओढले.





**आज जे वित्तआयोग व ज्या पंचवार्षिक योजना बनतात, त्यांचा मूळ विचार हा आंबेडकरांच्या शोधनिबंधात आहे.** 'द प्रॉब्लेम ऑफ रूपी इट्स ओरिजीन ॲण्ड इट्स सोल्यूशन (रूपयाचा प्रश्न - उद्गम आणि उपाय) हा शोधनिबंध ज्या 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' या जगप्रसिध्द संस्थेत सादर केला व पी.एच.डी. प्राप्त केली, तो शोधनिबंध लिहिताना त्यांनी किती वाचन केले असेल याचा अंदाज या संस्थेच्या ग्रंथालयात गेल्यावर लक्षात येईल. या ग्रंथालयात एक फलक लावलेला आहे व त्यावर लिहिले आहे **'या ग्रंथालयातील जास्तीत जास्त पुस्तकांचा संदर्भ डॉ. आंबेडकरांनी आपल्या शोधनिबंधासाठी घेतला आहे.'**

१९१७ च्या प्रबंधात कररचना विषयाचे त्यांनी विवेचन केले आहे. १९२१ च्या प्रबंधात ब्रिटिश कालावधीपूर्वीची भारतातील सोन्याची नाणी (मोहरा) चांदीची नाणी (नाणी) याच्याशी ब्रिटिश तांब्याच्या नाण्यांची तुलना केली आहे. प्रत्येक राजाची स्वतंत्र चलने होती. मालाची देवाणघेवाण करताना किंमत ठरवणे अवघड होत असे. यातून नाण्याचे / चलनाचे मूल्य ठरवणारा वर्ग (सोनार / सराफ) निर्माण झाला. हे सराफ नाण्यातील सोन्याच्या अंशावरून मूल्य ठरवायचे. ब्रिटीशांनी ही अडचणीची व्यवस्था नाकारली. सर्व राज्यांचा कारभार सुरळीत व्हावा, परदेशी व्यापार सुरळीत व्हावा यासाठी त्यात एकसूत्रता आणली. १८७२ च्या कालखंडात जगामध्ये चांदीचे नाणे प्रमुख होते. (१८७२ ते १८९०). सोने-चांदीत सोन्याला अधिक किंमत, त्यातून गोल्ड एक्स्चेंज (सुवर्ण विनिमय) आले. प्रो. जॉन केन्स हे अर्थतज्ज्ञ, कुठली अर्थव्यवस्था भारतात असावी, याचा विचार करण्यासाठी भारतात आले. त्यांचा निष्कर्ष असा की, भारतात सुवर्णसाठा कमी आहे. जर जगाचे परिमाण (गोल्ड एक्स्चेंज) भारताने स्वीकारले, तर भारतात अडचणी येतील. यातूनच रुपयाचे १९२० सालीच अवमूल्यन झाले आणि भारतात येऊ घातलेल्या परकीय भांडवलाबाबत अडचणी येऊ लागल्या "भारतात सोन्याचा साठा कमी --- त्यामुळे सुवर्ण परिमाण भारताने स्वीकारू नये" या प्रा. जॉन केन्स यांच्या निष्कर्षाबाबत डॉ. आंबेडकरांनी त्यांच्याशी विद्वत्तापूर्ण सामना केला. पण त्याकडे कोणाचे लक्ष गेले नाही.

### डॉ. आंबेडकरांच्या चळवळीचा कालखंड

आर्थिक विषयामधील अभ्यासाच्या आधारावरच पुढे डॉ. आंबेडकरांनी भारतातील सामाजिक प्रश्नांची तड लावण्यासाठी लढे दिले. उदाहरणार्थ (१) खोत पध्दत (जमीनदारी) नष्ट झाली पाहिजे (२) सावकारी नियंत्रण कायदा १९२६ साली मुंबई विधानसभेत मांडला गेला. ग्रामीण जीवनात 'सावकारी' ही रक्तपिपासू बनते. दीनदलित या सावकारीच्या रेट्याने पिचून जात. त्याविरुध्द त्यांनी चळवळ उभी केली.

अभ्यासातून डॉ. आंबेडकरांनी अर्थिक तत्त्व व्यवहारात आणले. त्यातून सामाजिक चळवळी, लढे उभे राहिले. या अर्थानी डॉ. आंबेडकर हे व्यावहारिक अर्थतज्ज्ञ होते.

डॉ. आंबेडकरांच्या चरित्राचा अभ्यास करताना, त्यांच्या आर्थिक विषयातील शोधनिबंधांचे वाचन करताना, त्यांची भाषणे वाचताना, डॉ. आंबेडकरांचे नवे नवे पैलू डोळयासमोर येतात. आजच्या देशाच्या स्थितीतही त्यांच्या विचारांचा अभ्यास अतिशय मार्गदर्शक ठरू शकतो.

**विष्णूबुवा ब्रह्मचारी -** समाजातील विषमतेप्रमाणेच अतिशुद्रांवर होणाऱ्या अमानुष अन्यायाविरुध्दही विष्णूबुवांनी आवाज उठवला. तसेच वैदिक धर्माची निंदानालस्ती करणाऱ्या खिस्ती धर्मोपदेशकांच्या बेजबाबदार प्रचाराला आळा घातला.

केले. १५० वर्षे राज्य केले. यापैकी १७९२ ते १८५८ ही ६६ वर्षे ईस्ट इंडिया कंपनीने भारतावर राज्य केले. १८५७ चा संग्राम झाला म्हणून कंपनी बरखास्त केली नाही, तर इंग्लंडमध्ये सत्तांतर झाले म्हणून कंपनी बरखास्त केली. १८५८ ते १९४७ ही ९० वर्षे ब्रिटिश सरकार म्हणून देशावर राज्य केले.

डॉ. आंबेडकर यांच्या एम. ए. चा विषय हा पहिल्या ६६ वर्षांच्या ब्रिटिश राजवटीचा (१७९२ ते १८५८) आढावा घेणारा होता.

दुसरा पी.एच.डी. चा प्रबंध हा १८५८ ते १९२१ पर्यंत **सेंटर ॲण्ड स्टेट - ॲलोकेशन ॲण्ड डिस्ट्रीब्यूशन ऑफ टॅक्सेस** (केंद्र व राज्य : कराचे विभाजन आणि वितरण) असा होता.

ईस्ट इंडिया कंपनी भारतात आली. या कंपनीचे २४ संचालक होते. कंपनीचा कारभार दोन स्तरांवर होता. **कंपनी सरकार** आणि **व्यापार** यावर नियंत्रण ब्रिटिश सरकारचे होते.

१७९२ ते १८५८ या ६६ वर्षातील कंपनीच्या आर्थिक व्यवहाराचे त्यांनी आपल्या निबंधात खुलासेवार विवेचन केले आहे. कर उत्पन्न वाढविण्यासाठी ईस्ट इंडिया कंपनीने ज्या जाचक अटी लादल्या होत्या, त्याचा पंचनामा डॉ. आंबेडकरांनी केला आहे. ब्रिटिशांचा वसाहतवाद जगभर असूनही ब्रिटिश कंपनीच्या आर्थिक बाबींचा पंचनामा डॉ. आंबेडकरांनी निबंधाच्या माध्यमातून जगासमोर परखडपणे मांडला आणि पी.एच.डी मिळविली. या पंचनाम्यात त्यांनी दाखवून दिले की, ३३ वर्षे कंपनीला फायदा होता तर ३३ वर्षे कंपनीला तोटा झाला.

**भारतात उत्पन्न होणाऱ्या सर्व पैशांपैकी ७०% रक्कम ब्रिटिश हे त्यांच्या अन्य देशात वसाहती निर्माण करण्यासाठी खर्च करायचे व केवळ २० ते ३०% रक्कम ही लोकोपयोगी कामांवर खर्च करायचे. तसेच कंपनीने अनावश्यक खर्च खूप केला. या कंपनीच्या अधिकाऱ्यांना भरपूर पगारही होता.** मुगल साम्राज्याचा पाया अकबराने घातला. शेतसारा पध्दत त्याने आणली. **शेतकरी शेतमजूर यांच्यावर प्रचंड कर लादून ब्रिटिशांनी (कंपनीने) प्रचंड लूट कशी केली, याचा पंचनामा डॉ. आंबेडकरांनी प्रबंधात केला आहे.**

डॉ. आंबेडकरांचे तीन गुरू आपल्याला माहिती आहेत- गौतम बुध्द, संत कबीर व महात्मा फुले. परंतु आर्थिक विषयात त्यांचे गुरू होते प्रोफेसर सेलेगमन् आणि प्रोफेसर एडविन कॅनन.

ईस्ट इंडिया कंपनीने म्हणजेच ब्रिटिश सरकारने **१८३८ ते १८४६ या कालावधीत इंग्लंडच्या मँचेस्टर शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी जो खर्च झाला, त्यापेक्षा अर्ध्याहून कमी खर्च भारतातील लोकोपयोगी कामांवर केला, हे डॉ. आंबेडकरांनी सप्रमाण सिध्द केले. विशेष म्हणजे त्यांच्या प्रबंध मार्गदर्शकाने हा प्रबंध मान्य केला.**

त्यांचा दुसरा निबंध होता **प्रोव्हिन्शिअल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया.** या निबंधात त्यांनी १८३३ ते १९२१ या कालावधीचा आढावा घेतला. ज्यांच्यावर देशाच्या आर्थिक कारभाराची जबाबदारी आहे, त्यांनी पैसा उभा करणे व खर्च करणे यापलिकडे पाहिले पाहिजे. सामाजिक संपत्ती हे पैतृकधन आहे. बंगाल, मद्रास व मुंबई या प्रांतिक सरकारमार्फत ब्रिटीश सरकारचे काम चालू होते. या कारभारातील 'ॲलोकेशन ॲण्ड डिस्ट्रीब्यूशन ऑफ टॅक्सेस' यावर डॉ. आंबेडकरांनी संशोधन केले.

**गोपाळ हरी देशमुख (लोकहितवादी) -** विपूल लेखनाच्या माध्यमातून समाजातील नानाविध दोष आणि विकृतींवर त्यांनी निर्भयपणे कोरडे ओढले.





**आज जे वित्तआयोग व ज्या पंचवार्षिक योजना बनतात, त्यांचा मूळ विचार हा आंबेडकरांच्या शोधनिबंधात आहे.** 'द प्रॉब्लेम ऑफ रूपी इट्स ओरिजीन ॲण्ड इट्स सोल्यूशन (रूपयाचा प्रश्न - उद्गम आणि उपाय) हा शोधनिबंध ज्या 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' या जगप्रसिध्द संस्थेत सादर केला व पी.एच.डी. प्राप्त केली, तो शोधनिबंध लिहिताना त्यांनी किती वाचन केले असेल याचा अंदाज या संस्थेच्या ग्रंथालयात गेल्यावर लक्षात येईल. या ग्रंथालयात एक फलक लावलेला आहे व त्यावर लिहिले आहे **'या ग्रंथालयातील जास्तीत जास्त पुस्तकांचा संदर्भ डॉ. आंबेडकरांनी आपल्या शोधनिबंधासाठी घेतला आहे.'**

१९१७ च्या प्रबंधात कररचना विषयाचे त्यांनी विवेचन केले आहे. १९२१ च्या प्रबंधात ब्रिटिश कालावधीपूर्वीची भारतातील सोन्याची नाणी (मोहरा) चांदीची नाणी (नाणी) याच्याशी ब्रिटिश तांब्याच्या नाण्यांची तुलना केली आहे. प्रत्येक राजाची स्वतंत्र चलने होती. मालाची देवाणघेवाण करताना किंमत ठरवणे अवघड होत असे. यातून नाण्याचे / चलनाचे मूल्य ठरवणारा वर्ग (सोनार / सराफ) निर्माण झाला. हे सराफ नाण्यातील सोन्याच्या अंशावरून मूल्य ठरवायचे. ब्रिटीशांनी ही अडचणीची व्यवस्था नाकारली. सर्व राज्यांचा कारभार सुरळीत व्हावा, परदेशी व्यापार सुरळीत व्हावा यासाठी त्यात एकसूत्रता आणली. १८७२ च्या कालखंडात जगामध्ये चांदीचे नाणे प्रमुख होते. (१८७२ ते १८९०). सोने-चांदीत सोन्याला अधिक किंमत, त्यातून गोल्ड एक्स्चेंज (सुवर्ण विनिमय) आले. प्रो. जॉन केन्स हे अर्थतज्ज्ञ, कुठली अर्थव्यवस्था भारतात असावी, याचा विचार करण्यासाठी भारतात आले. त्यांचा निष्कर्ष असा की, भारतात सुवर्णसाठा कमी आहे. जर जगाचे परिमाण (गोल्ड एक्स्चेंज) भारताने स्वीकारले, तर भारतात अडचणी येतील. यातूनच रुपयाचे १९२० सालीच अवमूल्यन झाले आणि भारतात येऊ घातलेल्या परकीय भांडवलाबाबत अडचणी येऊ लागल्या "भारतात सोन्याचा साठा कमी --- त्यामुळे सुवर्ण परिमाण भारताने स्वीकारू नये" या प्रा. जॉन केन्स यांच्या निष्कर्षाबाबत डॉ. आंबेडकरांनी त्यांच्याशी विद्वत्तापूर्ण सामना केला. पण त्याकडे कोणाचे लक्ष गेले नाही.

## डॉ. आंबेडकरांच्या चळवळीचा कालखंड

आर्थिक विषयामधील अभ्यासाच्या आधारावरच पुढे डॉ. आंबेडकरांनी भारतातील सामाजिक प्रश्नांची तड लावण्यासाठी लढे दिले. उदाहरणार्थ (१) खोत पध्दत (जमीनदारी) नष्ट झाली पाहिजे (२) सावकारी नियंत्रण कायदा १९२६ साली मुंबई विधानसभेत मांडला गेला. ग्रामीण जीवनात 'सावकारी' ही रक्तपिपासू बनते. दीनदलित या सावकारीच्या रेट्याने पिचून जात. त्याविरुध्द त्यांनी चळवळ उभी केली.

अभ्यासातून डॉ. आंबेडकरांनी अर्थिक तत्त्व व्यवहारात आणले. त्यातून सामाजिक चळवळी, लढे उभे राहिले. या अर्थानी डॉ. आंबेडकर हे व्यावहारिक अर्थतज्ज्ञ होते.

डॉ. आंबेडकरांच्या चरित्राचा अभ्यास करताना, त्यांच्या आर्थिक विषयातील शोधनिबंधांचे वाचन करताना, त्यांची भाषणे वाचताना, डॉ. आंबेडकरांचे नवे नवे पैलू डोळयासमोर येतात. आजच्या देशाच्या स्थितीतही त्यांच्या विचारांचा अभ्यास अतिशय मार्गदर्शक ठरू शकतो.

**विष्णूबुवा ब्रह्मचारी -** समाजातील विषमतेप्रमाणेच अतिशुद्रांवर होणाऱ्या अमानुष अन्यायाविरुध्दही विष्णूबुवांनी आवाज उठवला. तसेच वैदिक धर्माची निंदानालस्ती करणाऱ्या खिस्ती धर्मोपदेशकांच्या बेजबाबदार प्रचाराला आळा घातला.

## विजय निश्चित हमारा है ।

श्री. मुकुंद सदाशिव गोरे

*दरवर्षी वर्षप्रतिपदेला वर्धिनीचे सर्व कार्यकर्ते सामूहिक उपासनेसाठी एकत्र जमतात. बरोबर सकाळी ६.०० वाजता उपासना सुरू होते. ॐकाराचा सामूहिक स्वर एका वेगळ्याच वातावरणात घेऊन जातो. या वर्षी या कार्यक्रमासाठी सुमारे १३० कार्यकर्ते उपस्थित होते. सामूहिक उपासनेनंतर होणाऱ्या प्रबोधन सत्रासाठी या वर्षी श्री. मुकुंदराव गोरे उपस्थित होते. संघप्रचारक म्हणून व्यक्तिगत जीवनाकडे पाठ फिरवून गेली सुमारे ३० वर्षे भारतीय मजदूर संघाचे संघटक या नात्याने ते काम करीत आहेत. जागतिक स्पर्धेच्या बदलत्या वातावरणात हा देश सामर्थ्यशाली व्हायचा असेल, तर देशाला विकासपथावर घेऊन जाणाऱ्या सर्व विषयांचा समग्र अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. अशा अभ्यासाला व त्याद्वारे समाजाचे काम करायला प्रेरणा देणाऱ्या 'समग्र अध्ययन केंद्राची' जवाबदारी सध्या ते पार पाडीत आहेत. वर्षप्रतिपदेच्या निमित्ताने उपस्थित सर्व कार्यकर्त्यांसमोर त्यांनी मांडलेल्या विचारांचा हा आढावा-*

'ज्या दिवशी प्रभू रामचंद्र अयोध्येत परत आले व सिंहासनाधिष्ठित झाले तो दिवस. प्रभू रामचंद्र सिंहासनाधिष्ठित झाल्याचा आनंद अयोध्यावासीयांनी गुढ्या-तोरणे उभारून व्यक्त केला. ती परंपरा आजही गुढ्या उभारून आपण चालू ठेवली आहे.



मर्यादा पुरुषोत्तम प्रभु श्रीराम

आज सर्वजण व्यक्तिगत जीवन उत्तुंग करण्यासाठी धडपड करीत आहेत. आपली धडपड चालू असते ती हिंदुत्व रोमारोमात भिनविण्याची. हिंदूतत्त्वज्ञानात व्यक्ति आणि जग यांच्यातील संबंध अधिक स्पष्टपणे मांडले आहेत. जीवात्मा-परमात्मा हा एका योनीतून दुसऱ्या योनीत प्रवेश करतो. आपल्या जीवनात आपण काय केले पाहिजे यासंबधी आपल्या तत्त्वज्ञानात असे म्हटले आहे, की या जन्मी आपण जसे कार्य करू त्यानुसार पुढील जन्म मिळतो. ( यथा कर्मम् , यथा श्रुतम्...... कठोपनिषद) भारतीय लोक मानवदेहाकडे विशेष गोष्ट म्हणून पाहतात. पृथ्वीतलावर जन्म मिळणे, त्यात तो भारतात मिळणे व त्यातही तो मानवी जन्म मिळणे ही भाग्याची गोष्ट आहे; अशी येथील धारणा आहे. (नाना सुकृतांचे फळ, तो हा नरदेह केवळ.... समर्थ रामदास) आपले भाग्य की आपण

महात्मा ज्योतिबा फुले - वहुजन समाजाला आणि अस्पृश्य समाजाला जागृत करून त्यास आपल्या न्याय्य हक्कांसाठी संघर्ष करण्याची शिकवण दिली. तसेच स्त्रियांसाठी शाळा, विधवा पुनर्विवाह अशा माध्यमातून स्त्री उध्दाराचे प्रचंड कार्य.





वर्धिनीच्या सहवासात आलो. "मला पुढील जन्म माणूस म्हणून अमेरिकेत मिळण्यापेक्षा भारतभूमीत एक यःकश्चित कीडा म्हणून मिळाला, तरी मी तो पसंत करीन." असे साने गुरूजींनी म्हटले आहे. (तुझ्या धुळीतला कीट झालो तरी पसंत!). या नरदेहाचा काही तरी उचित उपयोग व्हावा, मी जो पैसा मिळवतो, माझ्याकडे जे जे काही आहे, त्याचा उपयोग चांगल्या कामी व्हावा, हे अभिप्रेत आहे. (.......भूमी भार होऊ नये हे ......, काहीच धरी न मनी, मृतप्राय काया जन्मा येऊनी.... समर्थ रामदास)

महात्मा गांधींच्या लेखनात, व्याख्यानात अनेकदा धर्मराज्याचा, रामराज्याचा उल्लेख आलेला आढळतो. हे रामराज्य नेमके कसे होते?

**प्रजाजन -** लोक बहुश्रुत होते. धनवान होते. त्यांना इतरांच्या संपत्तीचे (धनाचे) आकर्षण नव्हते. सर्व कुटुंबे धनधान्य, गायी-घोडे यांनी परिपूर्ण होती. मुकूट नाही, कानात कुंडले नाहीत असा कोणीही नव्हता. लोक आपल्या अंगाला सुगंध लावीत असत इतकी समृध्द होती.

**अयोध्यानगरी -** अयोध्यानगरी आयाताकृती होती. राजमार्ग आखलेले होत. मोठे होते. या मार्गावर फुलांचा आणि पाण्याचा सडा टाकलेला असे. अयोध्यानगरीच्या बाहेर सर्व बाजूंनी खंदक खणलेले होते. त्यात पाणी होत. पाण्यात सुसरी मगरी होत्या. अशा सुरक्षित रचनेमुळे ही नगरी 'अवध' म्हणजे जिंकायला अवघड होती.

अयोध्यानगरीमधील महाल - पर्वताइतके उंच आणि रत्नाने मढलेले प्रासाद अशी अयोध्यानगरी समृध्द होती.

भूतकाळातील अशा समृध्दीच्या वर्णनात रममाण होऊन चालणार नाही.सद्यस्थिती दुर्दैवाने चांगली नाही. अतिशय वेदना देणारी, अस्वस्थ करणारी स्थिती आहे. रामयणकालीन जीवनाचा विचार करता आजचे जीवन कसे आहे? शिकलेल्या लोकांचे जीवन त्यामानाने चांगले आहे. त्या तुलनेत सर्व लोकांच्या आवश्यक गरजांची पूर्ती करणाऱ्या श्रमिकांचे जीवन कसे आहे?

- रोजच्या जेवणात लागणारा भात पिकवणारा शेतकरी... वर्षातील काही महिने फणसावर, आंब्यावर त्याला जगावे लागते.

- कापड विणणारा मजूर आपल्यासाठी सुंदर वस्त्र निर्माण करतो, परंतु त्याला स्वतःला पुरेसे कपडे वापरायला मिळत नाहीत, अशी त्यांची आर्थिक स्थिती असते. उंच उंच इमारतींच्या बांधकामावर डोक्यावरून वीटा वाहून नेणाऱ्या मजूर स्त्रीला मात्र रहाण्यासाठी घर नसते. अशा प्रकारचा समाज मोठ्या प्रमाणावर असताना केवळ स्वतःचा विचार करणे हे पाप आहे.

सॅम्युअल हटिंग्टन यांनी गत पाचशे वर्षांचा जगाचा आर्थिक इतिहास लिहीला आहे. इ.स. १७५० सालची स्थिती पाहिली तर असे लक्षात येईल की उर्वरीत जगाच्या तुलनेत भारतात उत्पादित वस्तूंचे (Manufactured Goods) चे प्रमाण अधिक होते. भारतातील उत्पादित वस्तूंचा दर्जाही श्रेष्ठ होता. भारतात बनवलेल्या वस्तू वापरण्याची क्रेझ जगामध्ये होती. विशेषतः ब्रिटनमध्ये भारतातील कापडापासून बनविलेले कपडे, मोठ्या प्रमाणात वापरले जायचे.

विष्णूशास्त्री पंडित - इंदूप्रकाश या साप्ताहिकाच्या माध्यमातून स्त्रियांच्या प्रश्नांसंबंधी वेळोवेळी निर्भिडपणे मते मांडली. जुन्या धर्मग्रंथांच्या सखोल अध्ययनातून प्राचीन समाजरचनेत स्त्रियांना मानाचे स्थान होते हे दाखवून दिले. विष्णूशास्त्री हे कर्ते सुधारक होते.

# विजय निश्चित हमारा है ।

✍ श्री. मुकुंद सदाशिव गोरे

*दरवर्षी वर्षप्रतिपदेला वर्धिनीचे सर्व कार्यकर्ते सामूहिक उपासनेसाठी एकत्र जमतात. बरोबर सकाळी ६.०० वाजता उपासना सुरू होते. ॐकाराचा सामूहिक स्वर एका वेगळ्याच वातावरणात घेऊन जातो. या वर्षी या कार्यक्रमासाठी सुमारे १३० कार्यकर्ते उपस्थित होते. सामूहिक उपासनेनंतर होणाऱ्या प्रबोधन सत्रासाठी या वर्षी श्री. मुकुंदराव गोरे उपस्थित होते. संघप्रचारक म्हणून व्यक्तिगत जीवनाकडे पाठ फिरवून गेली सुमारे ३० वर्षे भारतीय मजदूर संघाचे संघटक या नात्याने ते काम करीत आहेत. जागतिक स्पर्धेच्या बदलत्या वातावरणात हा देश सामर्थ्यशाली व्हायचा असेल, तर देशाला विकासपथावर घेऊन जाणाऱ्या सर्व विषयांचा समग्र अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. अशा अभ्यासाला व त्याद्वारे समाजाचे काम करायला प्रेरणा देणाऱ्या 'समग्र अध्ययन केंद्राची' जवाबदारी सध्या ते पार पाडीत आहेत. वर्षप्रतिपदेच्या निमित्ताने उपस्थित सर्व कार्यकर्त्यांसमोर त्यांनी मांडलेल्या विचारांचा हा आढावा-*


मर्यादा पुरुषोत्तम प्रभु श्रीराम

'ज्या दिवशी प्रभू रामचंद्र अयोध्येत परत आले व सिंहासनाधिष्ठित झाले तो दिवस. प्रभू रामचंद्र सिंहासनाधिष्ठित झाल्याचा आनंद अयोध्यावासीयांनी गुढ्या-तोरणे उभारून व्यक्त केला. ती परंपरा आजही गुढ्या उभारून आपण चालू ठेवली आहे.

आज सर्वजण व्यक्तिगत जीवन उत्तुंग करण्यासाठी धडपड करीत आहेत. आपली धडपड चालू असते ती हिंदुत्व रोमारोमात भिनविण्याची. हिंदूतत्त्वज्ञानात व्यक्ति आणि जग यांच्यातील संबंध अधिक स्पष्टपणे मांडले आहेत. जीवात्मा-परमात्मा हा एका योनीतून दुसऱ्या योनीत प्रवेश करतो. आपल्या जीवनात आपण काय केले पाहिजे यासंबधी आपल्या तत्त्वज्ञानात असे म्हटले आहे, की या जन्मी आपण जसे कार्य करू त्यानुसार पुढील जन्म मिळतो. ( यथा कर्मम् , यथा श्रृतम्...... कठोपनिषद) भारतीय लोक मानवदेहाकडे विशेष गोष्ट म्हणून पाहतात. पृथ्वीतलावर जन्म मिळणे, त्यात तो भारतात मिळणे व त्यातही तो मानवी जन्म मिळणे ही भाग्याची गोष्ट आहे; अशी येथील धारणा आहे. (नाना सुकृतांचे फळ, तो हा नरदेह केवळ.... समर्थ रामदास) आपले भाग्य की आपण वर्धिनीच्या सहवासात आलो. "मला पुढील जन्म माणूस म्हणून अमेरिकेत मिळण्यापेक्षा भारतभूमीत एक यःकश्चित कीडा म्हणून मिळाला, तरी मी तो पसंत करीन." असे साने गुरूजींनी म्हटले आहे. (तुझ्या धुळीतला कीट झालो तरी पसंत!). या नरदेहाचा काही तरी उचित उपयोग व्हावा, मी जो पैसा मिळवतो, माझ्याकडे जे जे काही आहे, त्याचा उपयोग चांगल्या कामी व्हावा, हे अभिप्रेत आहे. (.......भूमी भार होऊ नये हे ......, काहीच धरी न मनी, मृतप्राय काया जन्मा येऊनी.... समर्थ रामदास)

महात्मा गांधींच्या लेखनात, व्याख्यानात अनेकदा धर्मराज्याचा, रामराज्याचा उल्लेख आलेला आढळतो. हे रामराज्य नेमके कसे होते?

**प्रजाजन -** लोक बहुश्रृत होते. धनवान होते. त्यांना इतरांच्या संपत्तीचे (धनाचे) आकर्षण नव्हते. सर्व कुटुंबे धनधान्य, गायी-घोडे यांनी परिपूर्ण होती. मुकूट नाही, कानात कुंडले नाहीत असा कोणीही नव्हता. लोक आपल्या अंगाला सुगंध लावीत असत इतकी समृध्द होती.

**अयोध्यानगरी -** अयोध्यानगरी आयाताकृती होती. राजमार्ग आखलेले होत. मोठे होते. या मार्गांवर फुलांचा आणि पाण्याचा सडा टाकलेला असे. अयोध्यानगरीच्या बाहेर सर्व बाजूंनी खंदक खणलेले होते. त्यात पाणी होत. पाण्यात सुसरी मगरी होत्या. अशा सुरक्षित रचनेमुळे ही नगरी 'अवध' म्हणजे जिंकायला अवघड होती.

अयोध्यानगरीमधील महाल - पर्वताइतके उंच आणि रत्नाने मढलेले प्रासाद अशी अयोध्यानगरी समृध्द होती.

भूतकाळातील अशा समृध्दीच्या वर्णनात रममाण होऊन चालणार नाही.सद्यस्थिती दुर्दैवाने चांगली नाही. अतिशय वेदना देणारी, अस्वस्थ करणारी स्थिती आहे. रामयणकालीन जीवनाचा विचार करता आजचे जीवन कसे आहे? शिकलेल्या लोकांचे जीवन त्यामानाने चांगले आहे. त्या तुलनेत सर्व लोकांच्या आवश्यक गरजांची पूर्ती करणाऱ्या श्रमिकांचे जीवन कसे आहे?

- रोजच्या जेवणात लागणारा भात पिकवणारा शेतकरी... वर्षातील काही महिने फणसावर, आंब्यावर त्याला जगावे लागते.

- कापड विणणारा मजूर आपल्यासाठी सुंदर वस्त्र निर्माण करतो, परंतु त्याला स्वतःला पुरेसे कपडे वापरायला मिळत नाहीत, अशी त्यांची आर्थिक स्थिती असते. उंच उंच इमारतींच्या बांधकामावर डोक्यावरून वीटा वाहून नेणाऱ्या मजूर स्त्रीला मात्र रहाण्यासाठी घर नसते. अशा प्रकारचा समाज मोठ्या प्रमाणावर असताना केवळ स्वतःचा विचार करणे हे पाप आहे.

सॅम्युअल हटिंग्टन यांनी गत पाचशे वर्षांचा जगाचा आर्थिक इतिहास लिहीला आहे. इ.स. १७५० सालची स्थिती पाहिली तर असे लक्षात येईल की उर्वरीत जगाच्या तुलनेत भारतात उत्पादित वस्तूंचे (Manufactured Goods) चे प्रमाण अधिक होते. भारतातील उत्पादित वस्तूंचा दर्जाही श्रेष्ठ होता. भारतात बनवलेल्या वस्तू वापरण्याची क्रेझ जगामध्ये होती. विशेषतः ब्रिटनमध्ये भारतातील कापडापासून बनविलेले कपडे, मोठ्या प्रमाणात वापरले जायचे.

**महात्मा ज्योतिबा फुले -** बहुजन समाजाला आणि अस्पृश्य समाजाला जागृत करून त्यास आपल्या न्याय्य हक्कांसाठी संघर्ष करण्याची शिकवण दिली. तसेच स्त्रियांसाठी शाळा, विधवा पुनर्विवाह अशा माध्यमातून स्त्री उध्दाराचे प्रचंड कार्य.



'स्व'-रूपवर्धिनी कार्यवृत्त २००२

**विष्णूशास्त्री पंडित -** इंदूप्रकाश या साप्ताहिकाच्या माध्यमातून स्त्रियांच्या प्रश्नांसंबंधी वेळोवेळी निर्भिडपणे मते मांडली. जुन्या धर्मग्रंथांच्या सखोल अध्ययनातून प्राचीन समाजरचनेत स्त्रियांना मानाचे स्थान होते हे दाखवून दिले. विष्णूशास्त्री हे कर्ते सुधारक होते.

याच्या विरोधात ब्रिटिश सरकारने १७१७ साली कालिकतकडून जाणारे कापड वापरायला बंदी घालणारा कायदा (कॅलिको ॲक्ट) केला. १८६० पर्यंत भारतीय मालावर प्रचंड कर होता. या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणजे, येथील उद्योग मारण्यात आले. उद्योग नष्ट करीत येथील स्वावलंबी जीवन उध्वस्त करण्यात आले.

१९४७ साली संपूर्ण जगाच्या उत्पादनाच्या तुलनेत भारताचा वाटा केवळ १% होता. २००० साली जगाच्या उत्पादनाच्या तुलनेत भारताचा वाटा घसरून केवळ ०.६% इतका खाली आला आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे, स्वराज्य मिळवल्यावर'स्व'च्या विकासाचा विचार नीट झाला नाही. स्वतंत्र झाल्यावर आम्ही रशियाचे केवळ अंधानुकरण केले, पंचवार्षिक योजना आखल्या, उद्योग क्षेत्रावर आणि अन्य क्षेत्रात सरकारचे नियंत्रण वाढविले. १९९० नंतर अमेरिका, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक यांच्या दबावाखाली खासगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाचा नारा सुरू झाला. काही देशात ही गोष्ट १९८० पासूनच सुरू होती. १९४५ साली दुसरे महायुध्द संपल्यावर जपान व चीन वगळता उर्वरीत जगावर युरोपचा दबदबा वाढविण्यासाठी युध्दोत्तर जगाची रचना करताना जागतिक बँक, नाणेनिधी, गॅट, इ. संघटनांची स्थापना करण्यात आली. रा. स्व. संघाचे द्वितीय सरसंचालक प.पू.श्री गुरूजी यांनी १९६० साली इशारा दिला होता की भारताने जागतिक बँकेच्या आहारी जाऊ नये. परंतु आजतागायत सरकारच्या धोरणात काहीही फरक पडलेला नाही.जागतिकीकरणाचे परिणाम आता जाणवू लागले आहेत. समाजवाद/साम्यवाद संपला. आता मुक्त बाजाराधारित अर्थव्यवस्थेचा जमाना आहे त्याचे दुष्परिणाम सर्व जगात दिसू लागले आहेत. सर्व जगात मोठ्या प्रमाणावर बेकारी वाढू लागली आहे (जपानमध्ये सुध्दा) वाढती बेकारी, वाढती गरिबी हा आताच्या काळातील सर्वात मोठा धोका आहे. माणूस व जनावर यात फरक काय? माणूस स्वतः घर बांधतो; जनावरे स्वतः घर बांधत नाहीत. परंतु घरच नाही अशा बेघर लोकांचे प्रमाण न्यूयार्क मध्ये ३% , लंडनमध्ये १०,००० लोकांची बेघर म्हणून नोंद झालेले आहे. आपल्याकडे शहरात पदपथावर राहणाऱ्यांचे प्रमाण प्रचंड आहे.

निसर्गाचा ऱ्हास, वाढते प्रदूषण, यातून पृथ्वी राहील का अशी चिंता निर्माण झाली आहे. असाध्य रोगराई वाढू लागली आहे. जगभरामध्ये आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होत आहे. जगातील एकूण संपत्तीच्या ४०% संपत्ती जगातील केवळ १% लोकांच्या हातात आहे. केवळ २०० व्यक्तींच्याजवळ २८० कोटी लोकांच्या संपत्ती इतका वाटा आहे. तर केवळ ३ व्यक्तींच्या हातात ७०० कोटी जनतेचे उत्पन्न एकवटले आहे. प्यायला पाणी मिळत नाही अशी १८० कोटी जनता जगात आहे, तर एकवेळचे जेवण मिळत नाही अशी ११० कोटी जनता जगात आहे. मोठ्या प्रमाणावर शोषण, थोडयांच्या हातात धनाचे केंद्रीकरण, मोठया प्रमाणावर शहरीकरण; त्यातून रोगराई, गुन्हेगारी, बालगुन्हेगारी यामध्ये वाढ होत आहे. आतंकवाद, तस्करी, नशायुक्त पदार्थांचे सेवन याच्या प्रमाणात प्रचंड वाढ होत आहे. ज्या मार्गाने

**सार्वजनिक काका** (गणेश वासुदेव जोशी) - सार्वजनिक सभा या सनदशीर मार्गाने काम करणाऱ्या संस्थेच्या माध्यमातून जनतेला जागृत व संघटीत करण्याचे महत्त्वाचे काम सार्वजनिक काकांनी केले. स्वदेशीचा प्रचार हेही सार्वजनिक काकांचे आणखीन एक महत्त्वाचे कार्य.





आपण चाललो आहोत हा मार्ग सुखाकडे नेणारा नाही. साम्यवाद, समाजवाद तसेच मुक्त व्यापार अर्थव्यवस्था कोलमडण्याच्याच मार्गावर आहे.माकडिणीच्या गोष्टीप्रमाणे, अविकसित देशांना, अप्रगत देशांना आपल्या पायाखाली दाबण्याचे प्रयत्न अमेरिकेसारख्या भांडवलशाही देशांचे चालू आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर जगासमोर तिसऱ्या पर्यायाची आवश्यकता आहे. तो पुढे का येत नाही हे सांगता येत नाही. पूर्वीच्या निष्ठा चुकीच्या होत्या हा विचार इतका प्रखर झाला की, त्यामुळे जे परीक्षानळीत घेता येते, जे डोळयांना दिसते, केवळ त्यावरच विश्वास ठेवला जाऊ लागला. मन दिसत नाही म्हणजे मन नाही? आत्मा दिसत नाही म्हणजे आत्मा नाही? अशा विचारसरणीतून जडवाद फोफावला. स्वामी विवेकानंदांनी असे म्हटले होते की अध्यात्मधारित जीवनरचना आवश्यक आहे. आजूबाजूच्या समाजाकडे, सृष्टीकडे पाहिले पाहिजे. समाज-सृष्टी-परमेष्टी यातून एकात्म मानवजीवन निर्माण करता येईल का? जगातील काही लोक निसर्गाला शत्रू मानतात की काय असे वाटावे, अशी त्यांची निसर्गविरोधी कृती व धोरणे दिसतात. एकदा निसर्गाला शत्रू मानले की, त्याच्यावर मात करण्याची प्रवृत्ती बळावते. असा समाज निसर्गाचे रक्षण करा असे कसे म्हणेल ? प्रदूषणासंदर्भात आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्य केले गेलेले नियम पाळणार नाही असे ठामपणे बुश यांनी म्हटले.अमेरिकेच्या प्रदूषणाच्या संदर्भातील भूमिकेविरूध्द युरोपमध्ये प्रखर निदर्शने करण्यात आली. जगातील फक्त ४% लोकसंख्या एकूण प्रदूषणाच्या २७% प्रदूषण करते, तर जगाच्या एकूण उत्पन्नातील २५% उत्पन्न वापरते. या तुलनेत जगातील १६% लोक जगातील एकूण उत्पन्नाच्या १% उत्पन्न वापरतात. या पार्श्वभूमीवर आपण पर्याय देऊ शकतो का ?

जास्तीत जास्त नवीन निर्माण होते ते जमिनीतून. चीनकडे, इटलीकडे भारतापेक्षा अधिक भूभाग आहे. परंतु आजही सर्वात जास्त सुपीक जमिनीचे क्षेत्र भारताकडे आहे. कधीही न गोठणारा व माशांसारखी समृध्द जलसंपत्ती लाभलेला समुद्रकिनारा फक्त आणि फक्त भारताजवळ आहे. खनिजसंपत्ती भारताकडे किती आहे याचा अंदाज येणे कठीण आहे. उदयपूर जवळील जस्ताच्या खाणीचे उदाहरण : जमिनीच्याखाली किमान २०० मीटर खोल जायचे व खणत खणत खनिजसंपत्ती बाहेर काढायची,हे काम सोपे नाही. खणणाऱ्या कामगारांना श्वास घेता आला पाहिजे व हे सर्व करायला अद्ययावत तंत्रज्ञान असावे लागते. उदयपूरला खाणीत खोदकाम करताना या २०० मीटरपेक्षा खोल क्षेत्रात असे लक्षात आले की, हया ठिकाणी पूर्वी कोणीतरी खनिजसंपत्ती काढण्याचा उद्योग केलेला आहे. तेथे आधारासाठी उभारलेले लाकडी खांब आढळले. या खांबांची कार्बन टेस्ट केल्यावर लक्षात आले की हे खांब दोन ते तीन हजार वर्षांपूर्वीचे आहेत. याचा अर्थ सरळ आहे की, इतक्या वर्षांपासून या खाणीतून जस्त काढूनही ते संपलेले नाही.

मध्यप्रदेशातील बैलाडी येथे १४ लोखंडाच्या खाणी आहेत. त्यापैकी फक्त २ उघडलेल्या आहेत. १९५० पासून जपान येथील लोहमाती मातीमोल भावाने नेते

**सावित्रीबाई फुले** - स्त्री शिक्षणाप्रमाणेच ज्योतिबा फुल्यांच्या सर्व कामात सावित्रीबाई सावलीसारख्या ज्योतिबांच्या मागे उभ्या होत्या.

याच्या विरोधात ब्रिटिश सरकारने १७१७ साली कालिकतकडून जाणारे कापड वापरायला बंदी घालणारा कायदा (कॅलिको ॲक्ट) केला. १८६० पर्यंत भारतीय मालावर प्रचंड कर होता. या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणजे, येथील उद्योग मारण्यात आले. उद्योग नष्ट करीत येथील स्वावलंबी जीवन उध्वस्त करण्यात आले.

१९४७ साली संपूर्ण जगाच्या उत्पादनाच्या तुलनेत भारताचा वाटा केवळ १% होता. २००० साली जगाच्या उत्पादनाच्या तुलनेत भारताचा वाटा घसरून केवळ ०.६% इतका खाली आला आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे, स्वराज्य मिळवल्यावर'स्व'च्या विकासाचा विचार नीट झाला नाही. स्वतंत्र झाल्यावर आम्ही रशियाचे केवळ अंधानुकरण केले, पंचवार्षिक योजना आखल्या, उद्योग क्षेत्रावर आणि अन्य क्षेत्रात सरकारचे नियंत्रण वाढविले. १९९० नंतर अमेरिका, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक यांच्या दबावाखाली खासगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाचा नारा सुरू झाला. काही देशात ही गोष्ट १९८० पासूनच सुरू होती. १९४५ साली दुसरे महायुध्द संपल्यावर जपान व चीन वगळता उर्वरीत जगावर युरोपचा दबदबा वाढविण्यासाठी युध्दोत्तर जगाची रचना करताना जागतिक बँक, नाणेनिधी, गॅट, इ. संघटनांची स्थापना करण्यात आली. रा. स्व. संघाचे द्वितीय सरसंचालक प.पू.श्री गुरूजी यांनी १९६० साली इशारा दिला होता की भारताने जागतिक बँकेच्या आहारी जाऊ नये. परंतु आजतागायत सरकारच्या धोरणात काहीही फरक पडलेला नाही.जागतिकीकरणाचे परिणाम आता जाणवू लागले आहेत. समाजवाद/साम्यवाद संपला. आता मुक्त बाजाराधारित अर्थव्यवस्थेचा जमाना आहे त्याचे दुष्परिणाम सर्व जगात दिसू लागले आहेत. सर्व जगात मोठ्या प्रमाणावर बेकारी वाढू लागली आहे (जपानमध्ये सुध्दा) वाढती बेकारी, वाढती गरिबी हा आताच्या काळातील सर्वात मोठा धोका आहे. माणूस व जनावर यात फरक काय? माणूस स्वतः घर बांधतो; जनावरे स्वतः घर बांधत नाहीत. परंतु घरच नाही अशा बेघर लोकांचे प्रमाण न्यूयार्क मध्ये ३% , लंडनमध्ये १०,००० लोकांची बेघर म्हणून नोंद झालेले आहे. आपल्याकडे शहरात पदपथावर राहणाऱ्यांचे प्रमाण प्रचंड आहे.

निसर्गाचा ऱ्हास, वाढते प्रदूषण, यातून पृथ्वी राहील का अशी चिंता निर्माण झाली आहे. असाध्य रोगराई वाढू लागली आहे. जगभरामध्ये आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होत आहे. जगातील एकूण संपत्तीच्या ४०% संपत्ती जगातील केवळ १% लोकांच्या हातात आहे. केवळ २०० व्यक्तींच्याजवळ २८० कोटी लोकांच्या संपत्ती इतका वाटा आहे. तर केवळ ३ व्यक्तींच्या हातात ७०० कोटी जनतेचे उत्पन्न एकवटले आहे. प्यायला पाणी मिळत नाही अशी १८० कोटी जनता जगात आहे, तर एकवेळचे जेवण मिळत नाही अशी ११० कोटी जनता जगात आहे. मोठ्या प्रमाणावर शोषण, थोडयांच्या हातात धनाचे केंद्रीकरण, मोठ्या प्रमाणावर शहरीकरण; त्यातून रोगराई, गुन्हेगारी, बालगुन्हेगारी यामध्ये वाढ होत आहे. आतंकवाद, तस्करी, नशायुक्त पदार्थांचे सेवन याच्या प्रमाणात प्रचंड वाढ होत आहे. ज्या मार्गाने

**सार्वजनिक काका** (गणेश वासुदेव जोशी) - सार्वजनिक सभा या सनदशीर मार्गाने काम करणाऱ्या संस्थेच्या माध्यमातून जनतेला जागृत व संघटीत करण्याचे महत्त्वाचे काम सार्वजनिक काकांनी केले. स्वदेशीचा प्रचार हेही सार्वजनिक काकांचे आणखीन एक महत्त्वाचे कार्य.





आपण चाललो आहोत हा मार्ग सुखाकडे नेणारा नाही. साम्यवाद, समाजवाद तसेच मुक्त व्यापार अर्थव्यवस्था कोलमडण्याच्याच मार्गावर आहे.माकडिणीच्या गोष्टीप्रमाणे, अविकसित देशांना, अप्रगत देशांना आपल्या पायाखाली दाबण्याचे प्रयत्न अमेरिकेसारख्या भांडवलशाही देशांचे चालू आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर जगासमोर तिसऱ्या पर्यायाची आवश्यकता आहे. तो पुढे का येत नाही हे सांगता येत नाही. पूर्वीच्या निष्ठा चुकीच्या होत्या हा विचार इतका प्रखर झाला की, त्यामुळे जे परीक्षानळीत घेता येते, जे डोळयांना दिसते, केवळ त्यावरच विश्वास ठेवला जाऊ लागला. मन दिसत नाही म्हणजे मन नाही? आत्मा दिसत नाही म्हणजे आत्मा नाही? अशा विचारसरणीतून जडवाद फोफावला. स्वामी विवेकानंदांनी असे म्हटले होते की अध्यात्मधारित जीवनरचना आवश्यक आहे. आजूबाजूच्या समाजाकडे, सृष्टीकडे पाहिले पाहिजे. समाज-सृष्टी-परमेष्टी यातून एकात्म मानवजीवन निर्माण करता येईल का? जगातील काही लोक निसर्गाला शत्रू मानतात की काय असे वाटावे, अशी त्यांची निसर्गविरोधी कृती व धोरणे दिसतात. एकदा निसर्गाला शत्रू मानले की, त्याच्यावर मात करण्याची प्रवृत्ती बळावते. असा समाज निसर्गाचे रक्षण करा असे कसे म्हणेल ? प्रदूषणासंदर्भात आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्य केले गेलेले नियम पाळणार नाही असे ठामपणे बुश यांनी म्हटले.अमेरिकेच्या प्रदूषणाच्या संदर्भातील भूमिकेविरूध्द युरोपमध्ये प्रखर निदर्शने करण्यात आली. जगातील फक्त ४% लोकसंख्या एकूण प्रदूषणाच्या २७% प्रदूषण करते, तर जगाच्या एकूण उत्पन्नातील २५% उत्पन्न वापरते. या तुलनेत जगातील १६% लोक जगातील एकूण उत्पन्नाच्या १% उत्पन्न वापरतात. या पार्श्वभूमीवर आपण पर्याय देऊ शकतो का ?

जास्तीत जास्त नवीन निर्माण होते ते जमिनीतून. चीनकडे, इटलीकडे भारतापेक्षा अधिक भूभाग आहे. परंतु आजही सर्वात जास्त सुपीक जमिनीचे क्षेत्र भारताकडे आहे. कधीही न गोठणारा व माशांसारखी समृध्द जलसंपत्ती लाभलेला समुद्रकिनारा फक्त आणि फक्त भारताजवळ आहे. खनिजसंपत्ती भारताकडे किती आहे याचा अंदाज येणे कठीण आहे. उदयपूर जवळील जस्ताच्या खाणीचे उदाहरण : जमिनीच्याखाली किमान २०० मीटर खोल जायचे व खणत खणत खनिजसंपत्ती बाहेर काढायची,हे काम सोपे नाही. खणणाऱ्या कामगारांना श्वास घेता आला पाहिजे व हे सर्व करायला अद्ययावत तंत्रज्ञान असावे लागते. उदयपूरला खाणीत खोदकाम करताना या २०० मीटरपेक्षा खोल क्षेत्रात असे लक्षात आले की, हया ठिकाणी पूर्वी कोणीतरी खनिजसंपत्ती काढण्याचा उद्योग केलेला आहे. तेथे आधारासाठी उभारलेले लाकडी खांब आढळले. या खांबांची कार्बन टेस्ट केल्यावर लक्षात आले की हे खांब दोन ते तीन हजार वर्षांपूर्वीचे आहेत. याचा अर्थ सरळ आहे की, इतक्या वर्षांपासून या खाणीतून जस्त काढूनही ते संपलेले नाही.

मध्यप्रदेशातील बैलाडी येथे १४ लोखंडाच्या खाणी आहेत. त्यापैकी फक्त २ उघडलेल्या आहेत. १९५० पासून जपान येथील लोहमाती मातीमोल भावाने नेते

**सावित्रीबाई फुले** - स्त्री शिक्षणाप्रमाणेच ज्योतिबा फुल्यांच्या सर्व कामात सावित्रीबाई सावलीसारख्या ज्योतिबांच्या मागे उभ्या होत्या.

आहे व आपल्यालाच १००% चढया भावाने लोह विकते. ही स्थिती पाहून अतिशय वाईट वाटते.

२०१० ते २०२० या कालावधीत जगात काय काय घडेल याचा विचार केला तर असे लक्षात येईल की उत्पादनाच्या कामासाठी जी मनुष्यशक्ती लागते या मध्ये काम करणाऱ्यांची संख्या ही सर्वात मोलाची आहे. श्रीमंत राष्ट्रांमध्ये मनुष्यशक्तीचे - हे काम करणाऱ्यांच्या संख्येचे प्रमाण पूर्ण बिघडले आहे. २०१० ते २०२० या काळात केवळ भारताकडे हे काम करणाऱ्यांची संख्या मोठया प्रमाणावर उपलब्ध असेल ( वय वर्षे २० ते ६० यातील वयोगट हा काम करणाऱ्यांच्या संख्या म्हणून मानला जातो) संपूर्ण जगातील कुटुंब व्यवस्था मोडकळीला आलेली आहे. भारतातही याचा काही परिणाम होऊ लागले असले, तरी कुटुंब व्यवस्था भक्कम आहे आणि त्यामुळे 'सोशल सिक्युरीटी' ची भारताला आवश्यकता नाही. आज स्थिती अशी आहे की मूळचे पुण्यात असलेले व आज अमेरिकेत राहणारे भारतीय (पुण्याचे) तेथून परत आले तरी अमेरिका अडचणीत येईल. अमेरिकेमधील शास्त्रज्ञांमध्ये प्रत्येक तीन जणात एक भारतीय आहे. आपण हे सर्व परत आले तर अमेरिका टिकेल का? या सर्व पार्श्वभूमीचा विचार करण्याची आवश्यकता आहे. रामायणकालीन वर्णनामध्ये लोक दीर्घायुषी होते असे वर्णन आहे. म्हणजे कुटुंबामध्ये नातू, पणतू, खापरपणतू यांनी युक्त कुटुंब असायचे असे वर्णन आहे.

आपण आपल्याकडे धर्म या शब्दाचा उपयोग 'कर्तव्य' या भावनेतून करतो. (पितृधर्म, पुत्रधर्म, राजधर्म, इ.) व्यक्तीचे 'हक्क' या विषयाला काही स्थान नव्हते. कर्तव्याला मोठे स्थान होते. असा समृध्द वारसा व परंपरा असताना पाश्चिमात्यांच्या अंधानुकरणाची चाकोरी आपण सोडून दिली पाहिजे. आपले विचार चुकीचे आहेत याची जाणीव पाश्चिमात्यांनाही होऊ लागली आहे. भौतिक साधने मिळूनही ते सुखी नाहीत, समाधानी नाहीत. व्यक्तिगत जीवनात अस्वस्थता आहेत. यातूनच त्यांना भारताविषयी आकर्षण वाटू लागले आहे. पुन्हा एकदा समर्थपणे उभे राहण्याचा निर्धार वर्षप्रतिपदेच्या निमित्ताने आपण केला पाहिजे. " समर्थ भारत, समृध्द भारत " हे प्रत्येकाचे ध्येय व्हायला हवे. त्यासाठी आपल्याला आळस टाकावा लागेल. झोप सोडावी लागेल. प्रचंड कष्ट करावे लागतील. असत् क्रिया त्यागावी लागेल.'वाया जाऊ नेदी एकही क्षण..... समर्थ रामदास' अवगुणांचा करूनी त्याग......... तो साधक. कुठल्या सद्गुणांचा विचार करता येईल हे ज्याचे त्याने ठरवावे. 'आगे!..... और आगे!...... सदा आगेही बढते जाना है! ...... विजय निश्चित हमारा है '। परम पूजनीय श्री. गुरूजींचे हे शब्द विसरता कामा नयेत.



**गोपाळ गणेश आगरकर** - न्यु इंग्लिश स्कूल सारख्या शैक्षणिक माध्यमातून, केसरी व सुधारक या सारख्या वृत्तपत्राच्या माध्यमातून देशभक्तीचा संस्कार प्रभावीपणे जागविला. शुध्द बुध्दीवादाच्या आधारावर हिंदू धर्मातील अनेक अनिष्ट रुढींवर प्रखर लढा दिला.





## असा खर्च झाला प्रत्येक रूपया

पहाता पहाता काम सुरू होऊन चोवीस वर्षे झाली. दोन तपांच्या या वाटचालीत वर्धिनीच्या कामावर मनापासून प्रेम करणाऱ्या सुहृदांनी दोन्ही हातांनी भरभरून दिलेल्या आर्थिक सहाय्यामुळे पुण्याच्या मंगळवार पेठेतील एका कोपऱ्यातील गोडाऊनमध्ये केवळ १२ मुलांना निवडून सुरू झालेले हे काम आज विविध उपक्रमांच्या माध्यमातून विस्तारते आहे. वर्धिनीने काम सुरू करावे अशी नवी नवी क्षेत्रे दिसत आहेत. रौप्य महोत्सवाच्या टप्प्यावरती विस्ताराच्या अशा काही कल्पना कार्यकर्त्यांच्या मनात रूंजी घालत आहे. हा विस्तार होत असताना आणि आवश्यक ती नवीनवी कामे सुरू करीत असताना एका गोष्टीची काळजी आता प्रत्येक क्षणी घ्यावी लागत आहे. तसे करणे आवश्यकही आहे. ते म्हणजे खर्च होणाऱ्या प्रत्येक रूपयाकडे बारकाईने लक्ष. ज्या भावनेने, ज्या विश्वासाने व ज्या अपेक्षांनी वर्धिनीला देणगी मिळते त्या देणगीचा प्रत्येक रूपया हा योग्य पध्दतीनेच खर्च होतो आहे ना? या विषयीची जागरूकता असणे फार महत्त्वाचे आहे. २००१-०२ या आर्थिक वर्षाचा विचार करताएकूण खर्च झाला १८,४४,४७२.३२ रूपये या एकूण खर्चापेक्षा थोडी अधिक रक्कम देणग्या व शुल्काच्या माध्यमातून जमा होऊ शकली.




ज्या ठेवी वर्धिनीने कायमनिधीच्या स्वरूपात ठेवल्या आहेत. त्यामध्येही देणगीच्या स्वरूपात तसेच व्याज रूपाने भर पडू शकली आहे. या आधारावरच नवे प्रकल्प, नव्या योजना साकार होतील असा विश्वास आहे. एकूण झालेल्या खर्चापैकी ८३% रक्कम म्हणजे एकूण १५,३१,४२३.२४ रूपये हे उद्दिष्टपूर्ती संबंधीच्या कार्यक्रमांवर खर्च झाले तर, १७% म्हणजे रूपये ३,१३,०४९.०८ ही रक्कम व्यवस्थापकीय व इतर बाबींसाठी खर्च झाली.

आगामी वर्ष हे रौप्यमहोत्सवी वर्ष आहे या निमित्ताने वर्षभर अनेक कार्यक्रम करायचे आहेतच; तसेच निवासी प्रशिक्षण संकुलासारख्या प्रकल्पाच्या माध्यमातून शिबिरे, ग्रामविकास योजना तसेच कार्यकर्ता प्रशिक्षण वर्गासाठीचा कायमस्वरूपी प्रकल्प साकार करायचा आहे. यासाठी आपले भरभरून अर्थसहाय्य होईल, असा विश्वास वाटतो.

**महर्षी धोंडो केशव कर्वे** - या महापुरुषाने स्त्रियांच्या उध्दारासाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्च केले.